पाक्षिक


समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक २० वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ जून २०२२

# अच्छे दिन, की कच्चे दिन



पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक २० । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ जून २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, मालेगाव

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ६००/- रुपये फक्त**

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

संपादकीय : अच्छे दिन, की कच्चे दिन - ३/ दावे, प्रतिदाव्यांतील अर्धसत्य... - **भास्कर नाशिककर** - ६ / जातनिहाय जनगणना व्हायलाच हवी - **सुभाष वारे** /- १० १२/ 'द रिव्होल्ट ऑफ दी अप्पर कास्टस्' - **जीन ड्रेझ** - १३ / दिल्ली दरबार - काँग्रेसच्या चिंतनाचे फलित! - **विचक्षण बोधे** - १९ / इतना सन्नाटा क्यूं - चूप! आधी कर्तव्ये पार पाडा...! - **जयदेव डोळे** - २१ / मुस्लीम स्थळांच्या वादातून काय साध्य करणार? - **कॉ. भीमराव बनसोड** - २५ / शेतकरी पारतंत्र्य दिवस - **अमर हबीब** - २८ / विधवा प्रथा बंदी ठरावाचे वाहते सुखद वारे - **बी. व्ही. जोंधळे** - ३० / अभुतपूर्व उष्मालाटेचा महाइशारा.... - **प्रा. एच. एस. देसरडा** - ३२ / आज-कालचे प्रश्न - **पंक्चरवाला** - ३४ / ग्रंथ परिचय - ।। मस्तक उघडणाऱ्या चाव्या ।। - **इंद्रजित भालेराव** - ३७ / कविता : - **डॉ. बापू चंदनशिवे**, अहमदनगर / - **आबासाहेब पाटील**, मंगसुळी, जि. बेळगाव / - **बुद्धभूषण साळवे**, नाशिक - ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादीय

# अच्छे दिन, की कच्चे दिन

केंद्रात कधी नव्हे एवढे प्रचंड बहुमत घेऊन आलेल्या आणि सातत्याने बहुमत टिकवून ठेवलेल्या आणि विरोधी पक्षमुक्त भारताकडे निघालेल्या मोदी सरकारची आठ वर्षे मोजण्यात तसा काहीच अर्थ नाही. पाशवी बहुमत असते तेव्हा सत्ताधारी त्यांना हवे ते करत असतात. याच करण्याचा एक सिद्धांत तयार करत असतात. या आठ वर्षांची समीक्षा जर का कोणी करायची ठरवलीच, तर तो आवाजही सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचणार नाही, कारण तो इतका क्षीण असेल. तरीही समारंभप्रिय असलेल्या देशात माणसाचे, देवाचे आणि सरकारचे वाढदिवस करण्याची प्रथा चालूच असते, तर मोदी सरकारची आठवी जयंती २६ मे रोजी आली होती. थोडीफार चर्चा झाली. या चर्चेच्या काळातच अनेक धार्मिक स्थळांचे वादही उफाळून आले. लोकांचे लक्ष त्याकडे वेधले गेले. कोणते स्थळ पूर्वी हिंदू, जैन किंवा अन्य धर्मीयांचे होते, याबाबतचे उत्खनन आता सुरू आहे. ते दिल्लीपासून गावपातळीपर्यंत पोहोचले आहे. म्हणजे उंच कुतुबमीनारपासून ते सपाट प्रदेशातल्या पंढरपूरपर्यंत. गेल्या आठ वर्षांत भारतातील माणूस महा श्रद्धावान बनला आहे किंवा बनवण्यात आला आहे. आता यालाच जर कोणी सक्षम भारत, समृद्ध भारत म्हणत असतील, तर अयोध्या त्यांचे भले करो. गेल्या आठ वर्षांत सामान्य माणूस जगण्याच्या पातळीवर दुर्बल झाला. कधी महागाई, कधी बेकारी, कधी रोगाच्या साथी, आकसणाऱ्या नोकऱ्या आदी कारणांमुळे तो मेटाकुटीला आला. त्याला जगण्याच्या साधनाऐवजी श्रद्धांचे टॉनिक मोफत पुरवणाऱ्या अनेक संस्था तयार झाल्या. निरपेक्ष वृत्तीने त्याला सलाइनचे कनेक्शन जोडले गेले आहे. तो जगणे विसरतो आणि श्रद्धांवर स्वार होतो आहे. माणसाच्या मनातील श्रद्धा हाच राजकारणाचा केंद्रबिंदू बनतो आहे. अनेक जण त्यात घुसण्याचा प्रयत्न करत आहेत. कुणाला हनुमान चालिसा, कुणाला भोंगा, कुणाला दगडूशेठ, कुणाला कुतुबमीनार, कुणाला कसली तरी कबर तर कुणाला अजून काही तरी गवसते आणि त्याचे राजकारण शिजू लागते. या स्वयंपाकाला गॅसच्या शेगडीची गरज लागत नाही. फक्त भाषणावर यांचा कुकर शिट्टी वाजवतो.

सत्तेवर येताच पहिल्यांदा भारत स्वच्छ करण्याची घोषणा कारभाऱ्यांनी केली होती. विषय असा होता, की स्वच्छतेला कोणी विरोध करण्याचे कारण नाही; पण प्रश्न हा होता, की माणसाचे जगणे प्राधान्याचे होते, की स्वच्छता प्राधान्याची. कोट्यवधी स्वच्छतागृहांचे स्वागतच करता येईल; पण स्वच्छतागृहासाठी पाणी, वीज कोठून आणणार, याचा विचार आजही केला जात नाही. भाकरीच्या तुकड्यासाठी होणारे स्थलांतर कोणी रोखत नाही. स्थलांतरित आणि मूळ निवासी यांच्यातील वाढता संघर्ष कोणी



मिटवत नाही. उलट त्याचेही राजकारण बनवले जात आहे. शेवटी स्वच्छता एक संस्कृती असते, म्हटले तर मूल्य असते. कायद्याची भीती दाखवून ते साध्य करता येत नाही, तर व्यापक लोकशिक्षणाची, साक्षरतेची त्यासाठी गरज असते. शहरात खाजगी स्वच्छतागृहांची साखळी उभी राहिली. तेथे लघवीला जायचे तर पाच-दहा रुपये काढावे लागतात. ते नसतील तर लघवी रोखून धरावी लागते किंवा इथे लघवी करू नका, असे लिहिलेल्या फलकाजवळच मोकळे व्हावे लागते. शहरात किती लोकांमागे सार्वजनिक स्वच्छतागृह असावे याचा हिशेब कोणाकडेच नाही. सबब, स्वच्छ दिसू लागलेला भारत कायम स्वच्छ कसा ठेवायचा हा प्रश्न होतो. डोंगरदऱ्यात, दुर्गम भागात, आदिवासी पाड्यांवर जेथे पाण्याची टंचाई आहे, अशा ठिकाणी नव्या स्वच्छतागृहात जुना जळणफाटा ठेवला जातो आहे. हे कोणी पाहणार नाही आणि जो पाहील तो समाजद्रोही किंवा नास्तिक ठरेल.

नोटाबंदी हीसुद्धा वयाची आठ घरे पार केलेल्या सरकारची एक ऐतिहासिक देणगी आहे. खरे तर, नवे सरकार जे काही करत होतं ते ऐतिहासिकच होतं. यापूर्वी कोणी ते केले नव्हते म्हणून ऐतिहासिक. काळा पैसा खणून काढणार, गरिबांच्या नावावर तो जमा करणार, देशाला सुदृढ करणार, अशी ती घोषणा होती. लोकांना ती भावली. काळा पैसा बाहेर पडल्यावर तो कोणाच्या म्हणजे कोणत्या सामान्य माणसाच्या नावावर किती जमा होणार याची गणिते मांडली गेली. सामान्यांनीही पाठिंबा दिला. प्रत्यक्षात नोटाबंदी अयशस्वी ठरली. गेल्या आठ वर्षांत किती काळा पैसा बाहेर पडला याची आकडेवारी कोणी दिलेली नाही. रिझर्व्ह बँकेनेही हे अपयश अधोरेखित केले. ज्यांनी केले त्यांना बँकेतून बाहेर पडावे लागले. दिल्लीतल्या

कारभाऱ्याचे एक ऐतिहासिक अपयश, अशा शब्दांत शहाणा माणूस नोंद करेल; पण ते वाचणार कोण? नोटांनाच जोडून जीएसटी कराची नव्याने आकारणी करण्यात आली. राज्याला या करातून त्यांचा त्यांचा हिस्सा देण्यात येणार होता. भ्रष्टाचार थांबणे, वेळेची बचत होणे, करप्रणालीत सूलभता येणे वगैरे गोष्टी साध्य होणार होत्या. याशिवाय 'एक देश, एक कर पद्धती' अशा ऐक्य भावनेकडे जाता येणार होते. जीएसटी प्रणाली अस्तित्वातही आली आणि अनेक राज्यांकडून तक्रारी चालू झाल्या. आपल्या हिश्श्याचा वाटा केंद्राकडे थकतो आहे आणि राज्याच्या अर्थकारणावर त्याचा परिणाम होतो आहे, ही मुख्य तक्रार आहे. राहुल गांधींनी तर या टॅक्सचे वर्णन 'गब्बर सिंग टॅक्स' असे केले होते. जीएसटी परिषदेची दर महिन्याला बैठक होते आणि दरांमध्ये फेरबदल होतात. या व्यवस्थेविषयीही आता सामान्यांच्या मनात शंका निर्माण होते आहे. नेत्यांवर प्रभाव टाकून भांडवलदार काही करत नसतील काय, ही ती शंका आहे. भांडवलशाहीचे आक्रमक विस्तारीकरण पाहता कोणालाही अशी शंका येणे स्वाभाविक आहे. जसा 'एक देश, एक कर' तसा 'एक देश, एक कायदा' या तत्त्वाकडे सरकार वळले आणि मुस्लीम समाजात शेकडो वर्षांपासून अस्तित्वात असलेला तिहेरी तलाक बंद झाला. आता जर तो तसा कोणी वापरणार असेल, तर ही गोष्ट गुन्हा ठरणार आहे. मुस्लीम महिलांना त्यांच्या सन्मानाचा हक्क बहाल केला, असे सरकारने स्पष्टीकरण केले.

सगळ्यात मोठा कळीचा प्रश्न होता तो काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे ३७० वे कलम रद्द करण्याचा. त्याचे काही फायदे आणि काही तोटे होते. फाळणीच्या वेळी जी काही अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली होती, त्या पार्श्वभूमीवरचा हा कायदा होता. या कायद्यानंतरही जम्मू-काश्मीर सतत खदखदत राहिले. या कायद्याविषयी परस्परविरोधी मते असू शकतात; पण मोदी सरकारने हा कायदा रद्द केला. जम्मू आणि काश्मीर असे विभाजन केले. जम्मू पंडितांचा आणि काश्मीर बिगर पंडितांचा आहे. पंडितांचे मुस्लीम अतिरेक्यांकडून कसे हाल होतात, हे सांगणारा 'काश्मीर फाईल्स' हा चित्रपटही अलीकडे येऊन गेला, तर मोदी सरकारचा ३७० कलमाबाबतचा निर्णय ऐतिहासिक असला तरी त्याचे दीर्घकालीन परिणाम दिसण्यासाठी काही काळ वाट पाहावी लागणार आहे. नागरिकत्व कायद्यालाही सरकारने कणखरपणे हात घातला आणि ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी जे हिंदू, शीख, पारशी, ख्रिस्ती, बुद्धिस्ट लोक धार्मिक छळामुळे पाक, अफगाण किंवा बांगलादेशातून आले त्यांना नागरिकत्व बहाल करण्यात आले. फक्त यातून मुस्लिमांना वगळण्यात आले. याबाबत झालेल्या टीकेला सरकार दाद देणार नव्हते आणि झालेही तसेच. नागरिकत्व इथेच थांबत नाही, तर एनआरसी म्हणजे नॅशनल रजिस्ट्रेशन आणि सिटिझन्स म्हणजेच नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी कायदा आसाममध्ये लागू करण्यात आला. आसाममध्ये मुस्लिमांची मोठ्या प्रमाणात घुसखोरी किंवा स्थलांतर झाले आहे आणि आसामीय दुय्यम ठरत आहेत, असा तो वाद होता. आसाममध्ये हा कायदा लागू करण्यात आला आणि तो देशभर तसा लागू करण्यात येणार होता; पण तूर्त तो थांबलाय.

सरकार महाशक्तिमान आहे. भारत महाशक्तिमान बनला आहे. अच्छे दिन आले आहेत, या सर्व बाबींची पोलखोल झाली ती कोरोना काळात. एका मोठ्या महामारीला सामोरे जाताना सरकार किती दुर्बल ठरले याची प्रचीती आली. घंटानाद, मेणबत्त्या पेटवणे आणि लॉकडाऊन करणे आदी गोष्टींना दाद न देता कोरोनाने भारतात ४७ लाख नागरिकांचा बळी घेतला, असे जागतिक आरोग्य संघटना




सांगते, तर सरकार चार-पाच लाखांच्या पुढे जात नाही. लॉकडाऊन काळात लोक उपाशी मेले, रेल्वे रुळावर मेले, प्रवास करता-करता मेले, उपचार झाले नाहीत म्हणून मेले. प्रेताने भरलेली गंगा नदी याला साक्षी आहे; पण तिला बोलता येत नसल्याने आणि तिचीही स्वच्छता मोहीम सुरू झाल्याने तिची साक्ष कोणी ग्राह्य धरणार नाही. भूक, दारिद्र्य, अज्ञान, मृत्यू यांचे एक प्रचंड तांडव पाहायला मिळाले. दवाखान्यात बेड नाही, बेड असेल तर औषध नाही, औषध असेल तर डॉक्टर नाही, नोकऱ्या नाहीत, रोजगारावर प्रचंड विपरित परिणाम, अर्थव्यवस्था कोलमडलेली, असे बरेच काही देशाने अनुभवले; पण याही काळात देशात राजकारणाचे वारे वाहत होते. देश कसा वाचला, कोणी वाचवला याबाबतची चर्चा पुढेही होत राहणार आहे. कोरोनाने एक सिद्ध केले आणि ते म्हणजे भाषणातला






भारत महाबलवान आहे आणि जनता मात्र महादुर्बल आहे.

भारतात १९५० मध्ये स्थापन झालेल्या नियोजन आयोगाची जागा निती आयोगाने घेतली. म्हणजे या संस्थेचे नाव बदलून ते नॅशनल इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया (निती) असे करण्यात आले. काँग्रेसच्या काळातले विशेषतः नेहरूंच्या काळातले काहीच ठेवायचे नाही, असे धोरण जणू काही भाजपने अवलंबलेय. एकीकडे साहित्यिक, साधू-संन्याशी यांनी म. गांधी आणि नेहरूंची बदनामी करायची, गोडसेंचे गौरवीकरण करायचे, राज्यघटनेवर भगवा रंग पसरवा, अशी मागणी करायची, काहींनी स्वतःला मनुपुत्र जाहीर करायचे आणि दुसरीकडे नवा हिंदुत्वाचा इतिहास लिहीत राहायचे, असा हा मामला आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यात हस्तक्षेप करण्यात आला. जेएनयूला धर्मनिरपेक्षवादी आणि डावे, अशी शिवी देण्यात आली. तेथेही देवदेवतांचे उत्सव सुरू झाले. बहुतेक विद्यापीठांतील कुलगुरूंना संघ परिवारातून आणण्यात आले. विरोधी सरकार असलेल्या राज्यांत असेच राज्यपाल नेमून तेथील सरकारची कोंडी करण्यात आली. अनेक राज्यांत राज्यपाल विरुद्ध राज्य सरकार, अशी लढाई चालू आहे. याच काळात मॉब लिंचिंगच्या अनेक घटना घडल्या. गाईवरून अनेक हत्या झाल्या; पण दिल्लीतल्या कारभाऱ्याने कधी तोंड उघडले नाही. ते सतत जागतिक राजकारणावर बोलत असतात. राम मंदिराच्या उभारणीपुरतेच त्यांचे नवनिर्माण राहिलेले नाही, तर वीस हजार कोटी रुपये खर्च करून नवीन संसद आणि तिचा परिसर (सेंट्रल व्हिस्टा) उभा करायचा आहे. उज्ज्वला योजना म्हणजे गॅस मोफत देण्याच्या योजनेचा खूप गाजावाजा झाला आणि होतो आहे. गरिबांना मोफत गॅस, मोफत जेवण, मनिऑर्डर पाठवणे वगैरे गोष्टींना चिकटपट्ट्यासारखे महत्त्व आहे. माणूस आत्मनिर्भर झाला की त्याला या गोष्टींची गरज भासणार नाही; पण याबाबतचा विषय कोणाच्याच अजेंड्यावर नाही. अगदी विरोधकांच्याही नाही. याचना करणारे लोक कधी देशाला बलवान करू शकत नाहीत आणि देश त्यांना बलवान करू शकत नाही. फुकट गॅस ही योजना लोकप्रिय आहे आणि गॅस व त्यावर शिजवायचे अन्न विकत घेण्याची क्षमता माणसात निर्माण करणे हे धोरणात्मक आहे. देशभर असे काही फुकट देण्याची लाट सुरू आहे आणि अशा लाभार्थ्यांवरही सरासरी दररोज एक लाख रुपये कर्ज आहे, जे सरकारने काढले आहे.

शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे; पण आपण यापूर्वीच जागतिक भांडवली संस्थांशी खाजगीकरण, कंत्राटीकरण याबाबत करार केले असल्याने जो विषय अजेंड्यावर आला आहे. सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबड्या वाटाव्यात अशा अनेक शासकीय उपक्रमांची गेल्या आठ वर्षांत विक्री करण्यात आली. विक्रीतून मिळणारे पैसे, कर्ज यामुळे आपली आर्थिक प्रकृती 'इंडिया दौड रहा है' यासारखी वाटते; पण शेवटी हे हाताटीचे गाठोडे मोडून खाण्यासारखे आहे आणि ते एक दिवस संपणारही आहे. आयुष्मान भारत ही लोकप्रिय घोषणाही दात टोकरून पोट भरण्यासारखी आहे. शासनाची सामग्री किती विकणार यावरही मर्यादा येणार आहेत. लोकप्रिय सरकार नेहमी एकच धोरण राबवते आणि ते म्हणजे लोक जे मागत नाहीत ते देत राहायचे आणि जे मागतात त्याकडे पाठ फिरवायची. लोकांनी कधीच मोफत भोजन, मोफत वीज, मनिऑर्डर, गॅस मागितला नव्हता, तर ते मिळवण्याची क्षमता मागितली होती. रिकाम्या मनगटांना काम मागितले होते. महागाई कमी करा आणि जगणे सुसह्य करा, अशी मागणी केली होती; पण ती सरकार मान्य करणार नव्हते. जणू काही अन्न छात्रालये उघडून आम जनतेला जगवायचे ठरवले आहे, जगण्याची साधने देण्याचे नव्हे. लोकांनी कधीच राम जन्मभूमी बांधा आणि मशीद पाडा, असे सांगितले नव्हते. भोंगा बंद करा, अशी मागणी केली नव्हती. उत्खनन करा, असेही कधी सांगितले नव्हते. रोटी, कपडा आणि मकान मिळवण्याचे सामर्थ्य आम्हाला द्या, असेच ते सांगत राहतात; पण २०२५ पर्यंत हिंदू राष्ट्र जन्माला घालू पाहणारे नेमक्या याच गोष्टी करत नाहीत. आता सर्व काही देव पाहून घेईल, अशी लोकांची मानसिकता ते तयार करतात. गेल्या आठ वर्षांत याच गोष्टीचा मुबलक हंगाम सुरू आहे.



# दावे, प्रतिदाव्यांतील अर्धसत्य...

**भारताने दावा केलेल्या मृत्यूच्या आठपट मृत्यू झाल्याचा दावा आरोग्य संघटना करत आहे. हे खटकणारे आणि न पटणारे आहे. त्यामुळेच आपल्या आरोग्यमंत्र्यांपासून ते अनेक अग्रगण्य संस्था आणि संघटना यादेखील आरोग्य संघटनेचे दावे फेटाळून लावत आहेत. त्यासाठी सरकार देत असलेली आकडेवारी न पटणारी आहे, असे जरी म्हणत असले तरी त्यात तथ्यांश आहे. सरकारची भूमिका आणि सरकारची आकडेवारीही तपासून आलेली असल्याने ती मान्य केली पाहिजे, अशी स्थिती आहे.**

**भास्कर नाशिककर**

गेली सुमारे अडीच वर्षे ठाण मांडून बसलेल्या कोरोना किंवा कोविडने साऱ्या जगाला वेठीला धरले आहे. तीन-चार लाटा जगाच्या कानाकोपऱ्यात आल्या तरी कोरोनाची काळी छाया पाठ सोडत नाही, असे दिसते. एवढेच नव्हे लाखो लोकांना आपल्या उच्छादाने त्यांच्या आप्तेष्टांपासून कायमचे दूर नेले तरीदेखील आणखी लाट घेऊन कोरोना येईल, अशी भीतीची छाया अद्याप कायम आहे. शिवाय, कोरोनाने बाधित झालेल्यांमध्ये वाढणारे, नव्याने दिसणारा आजार तो किती रुतून बसलेला आहे, त्याने किती उच्छाद मांडला आहे, याची प्रचीती देत आहे. केवळ आरोग्यच नव्हे, तर देशादेशांतील संबंध, सहकार्य यांचे त्यानिमित्ताने नवनवे अध्याय सुरू झाले, काहींमध्ये कधी नव्हे एवढी मोठी दरी, अविश्वासाचे वातावरण कोरोनामुळे निर्माण झाले. अनेक देश आणि त्यांचे राज्यकर्ते आणि सरकारी व प्रशासकीय प्रणालीभोवती संशयाचे धुके निर्माण झाले, ते काही जाताना दिसत नाही, तसेच कोरोनाने लादलेली ठाणबंदी, त्याने अर्थकारणाला लागलेला ब्रेक, उद्योग-धंद्यांची मंदावलेली चाके आणि त्यामुळे अनेक देशांच्या अर्थकारणाची घडीच पुरती विस्कटली आहे. पर्यटन उद्योगावर अवलंबून असलेला श्रीलंकेसारखा देश कोरोना आणि रशिया-युक्रेन युद्ध आणि त्याच्या उमटलेल्या पडसादाने पुरता दिवाळखोर बनला आहे, पाकिस्तान, तुर्कस्तान त्याच वाटेने जातील, असे चित्र आहे. २०२३ मध्ये जगभरात मंदीची मोठी लाट येईल, असे भाकीत अर्थवेत्ते आणि गुंतवणूक सल्लागार व्यक्त करत आहेत. जागतिक आरोग्य संघटना या महामारीने जगात खळबळ माजवली असताना त्याचा फटका किती जणांना बसला, लसींची निर्मिती आणि वितरण इथपासून ते जगात महासाथीने किती जणांना मृत्यूने गाठले यापासून ते आगामी काळात काय उपाययोजना कराव्यात, तसेच चीनने महामारीबाबत दाखवलेला निष्काळजीपणा अशा कितीतरी बाबींसंदर्भात सूचना देत आहे. मात्र, याच संघटनेला चीनमधून बाहेर पडलेल्या कोरोना विषाणूबाबत पूर्वकल्पना देणे, इतर देशांना सावध करणे का जमले नाही. त्यांनी उदासीनता का दाखवली, तसेच

विषाणूचा नेमका स्रोत सांगण्याबाबत चालढकल केली आहे. त्याला वेसण घालण्यात अपयश आले आहे.

याच जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ किंवा हू) कोरोना आणि त्याच्या आनुषंगिक परिणामांनी झालेल्या मृत्यूची आकडेवारी प्रसिद्ध केलेली आहे. त्यांच्या अंदाजानुसार भारतात अशा प्रकारे ४७ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. या सुरुवातीच्या अंदाजानंतर त्यात त्यांनी सुधारणा करून तो ४४ लाखांवर आणलेला आहे, तर भारत सरकारने जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२१ या कालावधीत कोरोनाने ४,८१,४८६ लोकांचा मृत्यू झाला, अशी आकडेवारी सादर केली आहे. या दोन्हीमध्ये असलेले महदंतर हाच आरोग्य संघटना आणि भारत सरकार यांच्यातील संघर्षाचा आणि मतभेदाचा केंद्रबिंदू आहे. गणिती मॉडेलचा वापर करून हा अंदाज वर्तवल्याचा दावा आरोग्य संघटनेचा आहे. त्याला पुष्टी देताना संघटना काय म्हणते, ते पाहा. संघटना सांगते, की अनेक स्वतंत्ररीत्या काम करणारे संशोधक, अभ्यास संस्था, सर्वेक्षणे, प्रसिद्ध झालेले तांत्रिक पेपर्स, विविध गटांनी सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टम (सीआरएस)द्वारे संकलित केलेली माहिती, तसेच पत्रकार आणि माध्यम संस्थांचे वृत्तांत आणि हाती लागलेली माहिती या सगळ्यांच्या अभ्यासांती काढलेला निष्कर्ष म्हणजे आरोग्य संघटनेने दावा केलेला आकडा आहे. यासाठी आरोग्य संघटनेने एक्सेस 'डेथ' अशी संज्ञा वापरली आहे. यात केवळ कोरोनाने मृत्यूच नव्हे, तर आरोग्यव्यवस्थेवर ताण आल्याने उपचार न मिळू शकलेले इतर आजारांचे रुग्ण, अन्य गंभीर आजारांवर वेळेवर उपचार न मिळणे, अशा कितीतरी बाबींनी झालेले मृत्यूदेखील यात धरले आहेत. भारताने दावा केलेल्या मृत्यूच्या आठपट मृत्यू झाल्याचा दावा आरोग्य संघटना करत आहे. हे खटकणारे आणि न पटणारे आहे. त्यामुळेच आपल्या आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांच्यापासून ते अनेक अग्रगण्य संस्था आणि संघटना यादेखील आरोग्य संघटनेचे दावे फेटाळून लावत आहेत. त्यासाठी सरकार देत असलेली आकडेवारी न पटणारी आहे, असे जरी म्हणत असले तरी त्यात तथ्यांश आहे. सरकारची भूमिका आणि सरकारची आकडेवारीही तपासून आलेली असल्याने ती मान्य केली पाहिजे, अशी स्थिती आहे.



त्यामुळेच आरोग्य संघटनेच्या दाव्याबाबत सगळ्याच देशांतून संताप व्यक्त होत आहे. आरोग्य संघटना म्हणते, दहापैकी सहा मृत्यूंची नोंदच झालेली नाही. भारतापुरता विचार करायचा झाला तरी हा दावा न पटणारा आहे. आरोग्य संघटना जो दावा करत आहे, त्याबाबत देशात आलेली दुसरी लाट, तिने माजवलेला हाहाकार आणि निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीचा संदर्भ दिला जातो आहे. विशेषतः ओसंडून वाहणारी रुग्णालये, ऑक्सिजनचा निर्माण झालेला तुटवडा, रुग्णांना दाखल करून न घेणे किंवा आवारातच उपचार करणे, स्मशानभूमीत लागलेल्या रांगा आणि करावी लागलेली प्रतीक्षा, रेमडिसिविरसह अनेक जीवरक्षक औषधांचा निर्माण झालेला तुटवडा अशा कितीतरी बाबींकडे अंगुलीनिर्देश केला जातो आहे. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये गंगेवर वाहणारी प्रेतेही या दाव्यातून सुटलेली नाहीत. या सगळ्यांना समोर ठेवून आरोग्य संघटना दावा करत आहे. त्याला प्रतिवाद म्हणून भारत सरकार करत असलेला दावा पाहता, पूर्ण सत्य कुठले हा प्रश्न पडतो. त्यामुळेच सगळेच अर्धसत्य आहे. नेमकी आकडेवारी बाहेर यायला निश्चितच आणखी काही महिने किंवा वर्षे जावी लागतील, मगच वस्तुस्थिती समोर येऊ शकते, हेच सत्य आहे.

**अन्य देशांतही मृत्यूचे प्रमाण अधिक**

जागतिक आरोग्य संघटनेचा हा दावा अनेक देशांबाबतही तितकाच कठोर आहे. आग्नेय आशिया, युरोप आणि अमेरिकेत कोरोनाने मृत्यूचे प्रमाण ८४ टक्के आहे. केवळ दहा देशांत ६८ टक्के मृत्यू झाले आहेत, त्यात भारतासह अमेरिका, ब्राझील, इजिप्त, इंडोनेशिया, रशिया, दक्षिण आफ्रिका, तुर्कस्तान यांचा समावेश आहे. या सर्व सरकारांनी कोरोनाने झालेल्या मृत्यूचे जाहीर केलेले आकडे आणि जागतिक आरोग्य संघटना दावे करत असलेले आकडे यांच्यात कैकपटींचा फरक आहे.




**सरकारचे काम सुरू आहे...**

केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी अत्यंत कडक शब्दांत जागतिक आरोग्य संघटनेचा दावा फेटाळून लावला आहे. ते म्हणतात, भारताचे रजिस्ट्रार जनरल यांच्याकडे जन्म-मृत्यूच्या नोंदींवर तयार केलेला डेटा किंवा आकडेवारी उपलब्ध आहे. ती वेळोवेळी अपडेट केली जात आहे. ती आकडेवारी वापरण्याचे सोडून आरोग्य संघटना गणिती मॉडेल का वापरते, हाच खरा प्रश्न आहे. देशात १९६९ च्या कायद्यान्वये जन्म-मृत्यूच्या नोंदी केल्या जात आहेत. ही विश्वासार्ह नोंद आम्ही आरोग्य संघटनेलाही दिली आहे. तरीही




त्यांचा गणिती मॉडेलचा अट्टहास का, हाच त्यांचा प्रश्न आहे. एवढेच नव्हे आयसीएमआरचे महासंचालक बलराम भार्गव, निति आयोगाचे सदस्य व्ही.के. पॉल, एम्सचे संचालक रनदीप गुलेरिया या सगळ्यांनी आरोग्य संघटनेच्या अहवालाला आक्षेप घेतला आहे. गुलेरिया दावा करतात, की हा अहवालाच सांगीवांगी माहितीवर किंवा अनधिकृत स्रोतावर आधारित केलेला आहे. टेस्ट पॉझिटिव्हिटी रेट की ज्याचा वापर आरोग्य संघटना आकडेवारी निश्चित करताना करत आहे, हा दरदेखील देशाच्या विविध भागांत एकसारखा नाही. एवढेच नव्हे, तर आरोग्य संघटनेने निष्कर्षाप्रत येण्याकरता वापरलेला डेटा हा विविध वेबसाइट आणि बातम्यांच्या माध्यमातून आलेल्या माहितीवर बेतलेला आहे. केवळ सतरा राज्यांतील काहीशा माहितीवर निष्कर्ष काढलेला आहे. भारतासारख्या महाकाय लोकसंख्येच्या आणि भौगोलिक स्थितीच्या देशाला अशा प्रकारचे गणिती मॉडेल मुळात लागूच होऊ शकत नाही, अशीच भूमिका सरकारची आहे. त्यातही तथ्यांशाच्या बाबी खूप आहेत.

असे असूनही सरकार ज्या आकडेवारीच्या आधारावर जागतिक आरोग्य संघटनेचा दावा फेटाळत आहे, त्यातदेखील विरोधाभासाच्या बाबी काही ठिकाणी आढळत आहेत. नेमक्या त्या बाबींवरच बोट ठेवून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने ३ मे २०२२ रोजी सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टमचा (सीआरएस) अहवाल सादर केला आहे. सीआरएस २०२१ चा अहवाल यायला आणखी काही महिने किंवा वर्षही लागू शकते. २०२० मध्ये ९९.९ टक्के मृत्यूची नोंद झाल्याचा दावा सरकारचा आहे. २०१८ मध्ये हाच आकडा ८४.७ टक्के होता. शिवाय, वाढलेले मृत्यू दिसताहेत कारण त्यांच्या नोंदीत वाढ झाली, असे सरकारचे म्हणणे आहे. आंध्र प्रदेशातील एप्रिल २०२० ते जून २०२१ या पंधरा महिन्यांची नोंद मृत्यूमध्ये पन्नास टक्के वाढ दर्शविते. वैद्यकीय उपचार, मदत, मार्गदर्शनाची प्रतीक्षा करत २०१९ मध्ये ३४.५ टक्के मृत्यू झाले, तर २०२० मध्ये हाच आकडा ४५ टक्क्यांवर गेला. अशा कितीतरी स्वरूपाच्या आकडेवारीचा वापर करून सरकारवर टीकेचा सूर आळवला जात आहे.

**उपाययोजनांत आघाडी**

कोरोनाच्या दोन लाटांच्या काळात धांदलीची परिस्थिती निर्माण झाली होती. आव्हानात्मक स्थिती होती. हे जरी खरे असले तरी महामारीवर नियंत्रणासाठी सरकारने उचललेली पावले, जगाला चकित करणारा लॉकडाऊन यशस्वी करणे, अल्पावधीत शंभर कोटींवर लोकांचे लसीकरण विक्रमी वेळेत पूर्ण करणे हे आव्हान पेलून दाखवले आहे. त्याला गुण हे दिलेच पाहिजेत. कोरोनाला प्रारंभ झाला तेव्हा मर्यादित व्हेंटिलेटर, पीपीई किट, मास्क, प्रतिबंधात्मक औषधे, वैद्यकीय सेवा देण्यासाठी रुग्णालये, अशी कितीतरी साधने तुटपुंजी होती. तथापि, महामारीचा जोर वाढत असताना त्यांची वेगाने निर्मिती, उपलब्धता करून दिली गेली. कोव्हॅक्सिनच्या रूपाने देशी बनावटीची लस उपलब्ध झाली. कोविशिल्डच्या रूपाने आपण आणखी एक लस जगाला देऊ केली. एवढेच नव्हे, तर व्हॅक्सिन डिप्लोमसीद्वारे जगाला, विशेषतः आपले शेजारी देश, तसेच आशिया आणि आफ्रिकेतील देशांना मदतीचा हात देऊ केला. अशा चांगुलपणाच्या अनेक बाबी जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातील अवास्तववादी दाव्याने झाकोळल्या गेल्या आहेत. जागतिक आरोग्य संघटनाच नव्हे, तर इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशनचा (आयएचएमई) अहवाल लान्सेट या जगप्रसिद्ध नियतकालिकाने प्रसिद्ध केला. त्यातही भारत सरकारच्या दाव्याच्या कितीतरी पट अधिक मृत्यू झाल्याचा दावा केला होता.

**बोध घेणे महत्त्वाचे**

जागतिक आरोग्य संघटनेचे डायरेक्टर जनरल ट्रेडोस घैबरसस म्हणतात, जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेली आकडेवारी बोध घ्यायला अधिक उपयुक्त आहे. आगामी काळात कोरोनासारखी आपत्ती आली, तर तिला तोंड देण्यासाठी आपण अधिक सज्ज आणि सतर्क पाहिजे. त्यासाठी आरोग्यावरील खर्च, गुंतवणूक आणि सज्जता वाढवली पाहिजे. खरे तर आरोग्य संघटनेचा दावा गणिती मॉडेलवर आधारित आहे. असे कितीतरी दावे कोरोनाच्या साथीच्या काळात केले गेले. त्याचे आकडे ऐकून पोटात गोळा यायचा; पण वस्तुस्थिती काय होती, हेही सामान्य जनांच्या लक्षात आले आहे.

**मग करावे तरी काय...**

अशा स्वरूपाचे दावे-प्रतिदावे भविष्यकाळातही केले जातील. सरकारही त्यावर भूमिका मांडेल; पण शाश्वत अशा काही बाबींकडे लक्ष पाहिजे तेही खरे. त्या म्हणजे, सरकारने आपल्याकडील नोंदी, आकडेवारी ही अधिक वेगाने संकलित केली पाहिजे. ती सार्वजनिक केली पाहिजे. या प्रक्रियेत अधिकाधिक पारदर्शकता राखली पाहिजे. त्यात कोणत्याही स्वरूपाची संदिग्धता राहणार नाही, असा कटाक्ष बाळगला पाहिजे. आकडेवारीचे संकलन, विश्लेषण, त्याचे निष्कर्ष यात शास्त्रशुद्धता राखली पाहिजे. सध्या अशा स्वरूपाची व्यापक यंत्रणा सरकारकडे आहे. ती कोरोना काळात बळकट करण्यासाठी सरकारने पावलेदेखील उचलली आहेत. हीच सुधारणांची प्रक्रिया आणि वेग कायम राखत अशा स्वरूपाची डेटा संकलनाची यंत्रणा प्रभावी आणि बळकट केली पाहिजे. जेणेकरून जागतिक आरोग्य संघटना असो, नाही तर लान्सेट किंवा अन्य कोणी, असे सर्व्हे प्रसिद्ध करणारी व्यवस्था, तिच्या निष्कर्षाला सरकारी आकडेवारी सुसंगत, त्याचप्रमाणे प्रसंगी पुरून उरणारी होईल. शिवाय, जनतेचा आपल्या व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.



कोरोना काळात साऱ्या जगातच आरोग्यव्यवस्थेचे बारा वाजले, प्रमाण कमी, अधिक आहे. सर्व बाबतीत संपन्न आणि कोणत्याही आपत्तीवर सहज मात करेल, असे वाटणारी अमेरिका असो नाहीतर युरोपातील ब्रिटन, जर्मनी, इटली या सगळ्या देशांतील आरोग्यव्यवस्थेचे वाभाडे कोरोनाच्या काळात निघाले. त्या मानाने पाहिले तर आपण चांगली कामगिरी करू शकलो; पण आरोग्य यंत्रणेचे बळकटीकरण करण्याची, ही यंत्रणेचे अधिकाधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण विकेंद्रीकरण करण्याची गरजही अधोरेखित झाली आहे. आशासेविकांनी या काळात केलेली कामगिरी चकित करणारी ठरली. याच आरोग्य संघटनेने या तमाम आशासेविकांचा ग्लोबल हेल्थ लीडर पारितोषिक देऊन गौरवही केला. ही जमेची बाजू आपल्याला बळ देणारी आहे.

भारतातील कोरोनाने मृत्यूबाबतची आकडेवारी आणखी वेगवेगळ्या टप्प्यांवर आणि स्वरूपात येत आहे. जन्म-मृत्यूची नोंद ठेवणारी सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टम (सीआरएस)च्या कामगिरीत आणि कार्यपद्धतीत आणि तिच्या गतिमानतेत आणि आकडेवारीत आणखी परिणामकारकता आणण्याची गरजही यानिमित्ताने स्पष्ट झाली आहे. त्यावरही लक्ष दिले पाहिजे.

**आरोग्य संघटनेतही सुधारणा हव्यात**

या सर्व परिस्थितीत जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यपद्धतीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जे कोरडे ओढले आहेत, त्याचीदेखील दखल आरोग्य संघटनेने घेणे गरजेचे आहे. ज्या चीनमधून कोरोनाचा विषाणू साऱ्या जगभर पसरला, तेथे पाठवलेले शिष्टमंडळ विषाणू नेमका आला कोठून हे सांगण्यात आणि जगाला पटवून देण्यात ही संघटना कमी पडली. एवढेच नव्हे, तर चीनने साऱ्या जगालाच खूप उशिरा महामारीची कल्पना दिली. त्यामुळे साहजिकच आरोग्य संघटनेच्या कारभारातील उणिवाही चव्हाट्यावर आल्या. त्यात तातडीने सुधारणांची गरज आहे. भारतात कोट्यवधी लोकांना कोव्हॅक्सिनची लस दिली गेली. अनेकांना या लसीमुळे संरक्षण मिळाले, ते कोरोनाचा बळी पडण्यापासून वाचले. याच लसीला जागतिक आरोग्य संघटनेने अद्याप मान्यता दिलेली नाही. मध्यंतरी दिलेली मान्यता काढून घेतली. कारण काय तर लसीच्या परिणामकारकतेबाबत अपुरी माहिती दिली. जागतिक आरोग्य संघटनेचा हा कारभारदेखील संतापजनकच म्हटला पाहिजे. आगामी काळात अशा स्वरूपाची महामारी किंवा संसर्गजन्य आजार वाढू शकतात, हे लक्षात घेऊन साऱ्या जगाला सजग आणि सतर्क करण्यासाठी आरोग्य संघटनेने पावले उचलली पाहिजेत. अशा महामारीला दडवून ठेवणाऱ्या देशाविरोधात कारवाई केली पाहिजे. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष असताना चीनविरोधात अनेक दावे दाखल केले होते, हे आठवावे. म्हणजे, माहिती दडवून ठेवण्याचे अनर्थ लक्षात येतील. शिवाय, कोणतीही आकडेवारी प्रसिद्ध करत असतानाच विविध सरकारांची भूमिका, त्यांचे म्हणणे, त्यांची अधिकृत आकडेवारी यांचाही विचार आणि अभ्यास केला पाहिजे. नाही तर एवढ्या सगळ्या प्रयत्नांतून बाहेर येईल ते केवळ अर्धसत्यच असेल.

**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत.)**



# जातनिहाय जनगणना व्हायला हवी



**‘सब का साथ, सब का विकास’ ही घोषणा वास्तवात आणायची असेल तर कोणाची नेमकी संख्या किती आणि कोण विकासाच्या कुठल्या पायरीवर पोहोचलेय वा अडकून पडलेय हे समजायलाही जातनिहाय जनगणना आवश्यक आहे.**

**सुभाष वारे**

जातनिहाय जनगणनेची मागणी अनेक वर्षांपासून आमच्यासारखे कार्यकर्ते करत आहेत. हा मुद्दा आता पुढे सरकताना दिसत आहे, याचा आनंद आहे. बिहारमधे प्रमुख दहा राजकीय पक्षांच्या बैठकीत बिहारमधे जातनिहाय जनगणना करण्यावर एकमत झाले आहे. मुस्लीम समाजातील ओबीसी जातसमूहांचीही गणना केली जावी यावरही बिहारमधे एकमत बनते आहे, हेही स्वागतार्ह आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ओबीसी मेळाव्यात ज्येष्ठ नेते मा. शरद पवार यांनी तशी आग्रही मागणी केलेली आहे. जात जणगणनेच्या मुद्यावर केंद्र सरकारकडे निर्णायक भूमिका आहे. मात्र, २०१४ पासून केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपचा या मागणीला विरोध आहे. २०२१ च्या जनगणनेची प्रक्रिया कोरोना संकटामुळे मंदावली आहे. या जनगणनेतच जात जनगणना व्हावी, अशी आग्रही मागणी अनेक सामाजिक समूह करत असताना त्याची पूर्वतयारी मात्र ती होणार नाही, असे संकेत देत आहे. मात्र, बिहारमधे भाजपने अन्य पक्षांसोबत या मागणीला पाठिंबा दिलेला दिसत आहे.

**...म्हणून विवेकी माणसाला पुढे जाता येत नाही**

जात आणि जातीआधारित अन्याय व शोषण हे भारतीय समाजाचे वास्तव आहे. नागरिकांचा सन्मान, त्यांना उपलब्ध असणारी किंवा नसणारी जगण्याची साधने, शिक्षणाची उपलब्धता






आणि गुणवत्ता, रोजगाराची उपलब्धता आणि स्वरूप अशा सगळ्या मुद्यांना जातीआधारित शोषणाची पार्श्वभूमी असतेच. या वास्तवाला डावलून विवेकी माणसाला पुढे जाता येत नाही. अलीकडे एक वरवर भाबडा; पण अंतरंगी मतलबी सवाल अनेक जण करतात. तो म्हणजे, आपल्याला जात संपवायची आहेना, कशाला तुम्हीच सारखंसारखं जातीबद्दल बोलता? कशाला मुलांच्या शाळेतील प्रवेशाच्या वेळी जातीचा उल्लेख करून त्यांना जातीची जाणीव करून देता? अन्याय आणि शोषणावर आधारलेली जातीव्यवस्था हजारो वर्षांपासून इथे कार्यरत आहे. जातीआधारित विषमता हे आजही वास्तव आहे. लग्न ठरवताना, निवडणूक लढवताना प्रच्छन्नपणे जातव्यवहार बघायला मिळतो. जातीव्यवस्थेमुळे समाज मानसिक दृष्टीने दुभंगलेला आहे, हे खरेच. शोषित जातीही आपापसात अंतर राखून राहतात. उच्च-नीच भाव बाळगतात, हे वास्तव आहे. त्यावर उपाय शोधावेच लागतील हेही खरे; पण जातीव्यवस्थेने अनेकांना जगण्याच्या साधनांपासून वंचित ठेवले. तथाकथित विकासाच्या आधुनिक प्रक्रियेत जवळ असलेली तुटपुंजी साधनेही हिरावून घेतली जात आहेत.

**जात संपवण्यासाठीही जातीबद्दल बोलावेच लागेल**

अशा वेळी जात संपवायची आहेना? मग जातीबद्दल बोलणे बंद करा, ही भूमिका आजच्या व्यवस्थेतही जातीव्यवस्थेचे फायदे लाटणाऱ्यांच्या हिताची असते. जात कागदावर असते म्हणून टिकलेली नसते, जात खरे तर खोलवर मनात रुजलेली असते म्हणून व्यवहारात कार्यरत होत असते. एक लक्षात घेण्याची गरज आहे की, जातीचा केलेला उल्लेख प्रत्येकवेळी जातीयवादी दृष्टिकोनातूनच होत नसतो.

संपविण्यासाठी जातीव्यवस्थेचे स्वरूप आणि त्यातील शोषणव्यवस्था आधी समजून घेतली पाहिजे. ती समजून घेण्याचा एक मार्ग आहे जातीआधारित जनगणना. म्हणजेच जात संपवण्यासाठीही जातीबद्दल बोलावेच लागेल.

नोकरी आणि राजकारणातील आरक्षणाच्या विविध प्रकारच्या मागण्या वेगवेगळ्या जातसमूहांकडून आक्रमकपणे पुढे येत आहेत. त्यासाठी राज्यघटनेतील सोळाव्या कलमाचा आधार घेत रस्त्यावरच्या आणि न्यायालयातील लढाया लढल्या जात आहेत. काही समूहांना नव्याने आरक्षण हवे आहे. काही समूहांना मिळत असलेल्या आपल्या आरक्षणाचा प्रवर्ग बदलून हवा आहे. काही समूहांना मिळत असलेल्या आरक्षणाची टक्केवारी वाढवून हवी आहे, तर काही समूहांना आरक्षणांतर्गत आपल्यासाठी स्वतंत्र आरक्षण हवे आहे.

यातील काही मागण्या शोषित जातीसमूहांना एकमेकाच्या विरोधात लढायला उभ्या करत आहेत. आरक्षणाच्या विरोधात समाजाची मानसिकता बनावी यासाठी काही संघर्ष मुद्दाम छेडले जात आहेत. एकूण आरक्षणाबद्दल गोंधळाची स्थिती निर्माण व्हावी आणि त्यातून आरक्षणच नको, अशी मानसिकता बनविण्यासाठी आरक्षण

विरोधी शक्तींकडून जाणीवपूर्वक षड्यंत्र रचले जात आहे.

**वास्तव समोर आल्याने खरे गरजू समूह कळतील**

आपल्यावर अन्याय होतोय, आपण सोडून इतर सर्व जातसमूहांचे बरे चाललेय अशी भावना प्रत्येकच जातीत रुजवली जातेय. उच्चशिक्षणाची आणि चांगल्या सरकारी नोकरीची संधी हुकलेले अनेक उच्चजातीय तरुणी-तरुण आपल्या नाराजीचे मूळ आरक्षणात शोधत आहेत. राज्यघटनेच्या सोळाव्या कलमात, ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांना सरकारी नोकरीत पर्याप्त प्रतिनिधीत्व मिळालेले नाही अशा वर्गांसाठी आरक्षणाची तरतूद राज्य करू शकेल, अशी शब्दरचना आहे. यातील पर्याप्त प्रतिनिधीत्व ही शब्दरचना फार महत्त्वाची आहे, ज्याकडे कुणीच लक्ष देत नाहीये. राज्यघटनेतील सोळाव्या कलमाची तरतूद वैयक्तिक प्रश्नांची वा अडचणींची उत्तरे देत नाही, तर सरकारी नोकऱ्यांत पर्याप्त प्रतिनिधीत्व न मिळालेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांची दखल घेते आहे. भारतीय राज्यघटनेतील एक्केचाळीसावे कलम मात्र सर्वांना शिक्षण, सर्वांना रोजगार मिळालाच पाहिजे, अशी जबाबदारी राज्यव्यवस्थेवर टाकते आहे. सर्वांना शिक्षण आणि सर्वांना रोजगार यासाठी अपेक्षित आर्थिक धोरणांची दिशा एकोणचाळीसावे कलम दाखवत आहे; पण ही महत्त्वाची कलमे तरुणी-तरुणांना कुणीच समजावून सांगत नाही. सोळाव्या कलमात सांगितल्याप्रमाणे सरकारी नोकरीत पर्याप्त प्रतिनिधीत्व न मिळालेले मागासवर्ग शोधायचे, तर जातीआधारित जनगणना केली पाहिजे. कोण किती आहे? आणि कोण कुठे आहे, हे एकदा तपासून स्पष्ट झाले, तर अनेक नकली वादविवादांना उत्तरे मिळतील. वास्तव समोर आल्याने खरे गरजू समूह नीट कळतील.

**अर्थसंकल्पातील आपला हिस्सा किती?**

राज्यघटना लागू झाली त्यावर्षी म्हणजे १९५० साली तत्कालीन अर्थमंत्री जान मथाई यांनी सादर केलेला भारत सरकारचा अर्थसंकल्प साधारण ३८६ कोटी रुपयांचा होता. २०२२ च्या फेब्रुवारीत सादर झालेला भारत सरकारचा अर्थसंकल्प ३९.४४ लाख कोटी रुपयांचा आहे. भारत सरकारची खर्च करण्याची ऐपत ३८६ कोटी रुपयांवरून ३९.४४ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढलीय. त्यात कुणबी शेतकरी, शेतमजूर, असंघटित-असुरक्षित कष्टकरीवर्गाचा मोठा हिस्सा आहे. जातीव्यवस्थेने तळाच्या घटकातील मानलेल्या जातसमूहांनीच हा वर्ग मुख्यत्वे बनलेला आहे. अर्थसंकल्पातील आपला हिस्सा वर्ग म्हणून आणि मागास जातीसमूह म्हणूनही या वर्गांना मिळाला पाहिजे. कोणाचा हिस्सा किती असायला हवा, हे समजण्यासाठीही जातनिहाय जनगणना होणे गरजेचे आहे.

पंगतीला बसल्यावर वाढपी ओळखीचा असेल, तर ताटात जिलबीचा एखादा वेढा जास्तीचा पडतो, असे आपल्याकडे ग्रामीण भागात म्हणतात. सरकारच्या अर्थसंकल्पातला आपला न्याय्य हिस्सा मिळायचा, तर त्याचे वाटप ज्या लोकनियुक्त सभागृहात ठरते त्या सभागृहात आपली वेदना कळणारी माणसे असायला हवीत, अशी भावना असणे हे उचितच आहे. वेगवेगळ्या जातसमूहांनी पुढे आणलेल्या राजकीय आरक्षणाच्या मागणीची न्यायोचितता ठरवण्यासाठीही जातनिहाय जनगणना ही गरजेची ठरते.

'सब का साथ, सब का विकास' ही घोषणा वास्तवात आणायची असेल, तर कोणाची नेमकी संख्या किती आणि कोण विकासाच्या कुठल्या पायरीवर पोहोचलेय वा अडकून पडलेय हे समजायलाही जातीनिहाय जनगणना आवश्यक आहे. जातीनिहाय जनगणनेच्या महत्त्वाच्या मुद्याला तोंड फुटलेय. अनेक वर्षांपासूनची मागणी पुढे सरकण्याची शक्यता निर्माण झालीय. ती मागणी पूर्णत्वाला जाण्यासाठी सर्वांनीच या मुद्यावर बोलले आणि लिहिले पाहिजे.

**(लेखक सुराज्य सेनेचे मार्गदर्शक आहेत.)**



# 'द रिव्होल्ट ऑफ दी अप्पर कास्टस्'




**सरकारमधील सर्व महत्त्वपूर्ण पदे (पंतप्रधान, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, अनेक खाते विभाग, अनेक राज्यपाल आणि बरेच काही) संघाच्या सदस्यांनी किंवा माजी सदस्यांनी पटकावलेली आहेत. हे सर्व सदस्य हिंदू राष्ट्रवादाच्या मतप्रणालीचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. लोकशाहीविरुद्धचे उच्च जातींचे अत्यंत शांततापूर्ण असणारे हे बंड लोकशाही संस्थांवर आता अधिक प्रत्यक्ष हल्ल्याचे स्वरूप धारण करीत आहे. त्याची सुरुवात विरोधी मत व्यक्त करणाऱ्या व्यक्ती व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ल्याने झालेली आहे.**



**जीन ड्रेझ**


भारतातील हिंदू राष्ट्रवादाच्या लाटेकडे लोकशाहीच्या समता, स्वातंत्र्य व बंधुता यांसारख्या मागण्यांच्या विरुद्ध उच्च जातींनी केलेले बंड म्हणून पाहता येईल. उच्च जातींसाठी हिंदुत्वाचा प्रकल्प एक जीवरक्षक नौका आहे. कारण तो ब्राह्मण्यवादी सामाजिक संरचनेचे पुनरुज्जीवन करण्याचे वचन देतो.

भारतातील हिंदू राष्ट्रवादाच्या अलीकडील लाटेने जाती निर्मूलनाच्या चळवळीला आणि अधिक समतावादी समाजाच्या निर्मितीला खीळ घातली आहे. त्यामुळे लोकशाहीची फार मोठी पीछेहाट झाली आहे. ही पीछेहाट केवळ एक अपघात नाहीये. हिंदू राष्ट्रवादाच्या वाढीकडे लोकशाहीच्या समताधिष्ठित मागण्यांच्या विरोधात उच्च जातींचे एक बंड म्हणून पाहता येईल.

### हिंदुत्व आणि जात

ज्यास 'हिंदुत्व' म्हणूनही ओळखले जाते, अशा हिंदू राष्ट्रवादाच्या अनावश्यक कल्पनांना समजून घेणे फार कठीण नाहीये. वि.दा. सावरकरांच्या 'Essentials of Hindutva' (सावरकर, १२३) मध्ये या सगळ्या कल्पनांचे अत्यंत सुस्पष्टरीत्या स्पष्टीकरण देण्यात आले होते आणि एम.एस. गोळवलकरांसारख्या इतर प्रारंभीच्या हिंदुत्ववादी विचारवंतांनी या कल्पनांचा अधिक तपशील दिला होता, तर मूळ कल्पना अशी आहे, की भारत हा 'हिंदू'साठी आहे. 'हिंदू' या शब्दाची व्यापकपणे व्याख्या करताना ती तंतोतंत धार्मिक संबंधाने न करता सांस्कृतिक संबंधाने केली गेली. या व्याख्येत शीख, बौद्ध आणि जैन यांना अंतर्भूत केले; परंतु ख्रिश्चन






उत्तर ध्रुव हा स्थिर नाही आणि फार अगोदर तो त्या जगाच्या भागामध्ये होता, ज्याला आज आपण बिहार किंवा ओरिसा म्हणतो;... नंतर तो उत्तरपूर्व दिशेला सरकला आणि नंतर काही वेळेला पश्चिमेकडे, काही वेळेला उत्तरेकडे त्याची हालचाल झाली व आजच्या ठिकाणी ते आले... आम्ही सर्व जण याठिकाणीच होतो आणि आर्क्टिक भागाने आपल्याला सोडले आणि त्याच्या नागमोडी रेषेत उत्तरेकडे गेले (गोळवलकर, १९३९ : पान – ८).

उत्तर ध्रुवाच्या 'नागमोडी वाटचाली'त आर्य लोक त्याठिकाणी कसे राहू शकले, याचा खुलासा गोळवलकरांनी केला नाही.

सगळ्या हिंदूंची 'एकच भाषा' होती या विचित्र दाण्याची वकिली करण्यासाठी त्यांनी तशाच प्रकारचे अवास्तव युक्तिवाद केले.

हिंदुत्व प्रकल्प पारंपरिक सामाजिक व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचा एक प्रयत्न आहे. या पारंपरिक सामाजिकव्यवस्थेचे नाते सर्वसामान्य संस्कृतीशी आहे, जी सगळ्या हिंदूंना कथितपणे बांधून ठेवते. अशा दृष्टिकोनातूनदेखील या हिंदुत्व प्रकल्पाकडे पाहता येणे शक्य आहे. जातीय व्यवस्था किंवा किमान वर्णव्यवस्था (समाजाचे चारस्तरीय विभाजन) ही या सामाजिकव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. उदाहरणार्थ, गोळवलकर त्यांच्या 'We or Our Nationhood Defined' या पुस्तकात स्पष्टपणे म्हणतात, की 'समाजाची हिंदू चौकट' ही 'वर्ण आणि आश्रम यांनी वैशिष्ट्यीकृत' झाली आहे (गोळवलकर १९३९, पान ५४). हा मुद्दा हिंदुत्वाच्या पायाभूत पुस्तकांपैकी एक असलेल्या 'Bunch of Thoughts' या पुस्तकात विस्तृतपणे आला आहे. या पुस्तकात गोळवलकर ही 'आमच्या देशाच्या अलौकिकतेचा' भाग आहे. राम माधव जातीवर भाष्य करताना त्यांची जी एक प्रमाण दृष्टी आहे ती याठिकाणी व्यक्त झाली आहे. त्यांच्या मते, जात ही खरी समस्या नाहीये, तर जातीयवाद ही खरी समस्या आहे. उत्तर प्रदेशामधील बीजेपी सरकारचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तीन वर्षांपूर्वी एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीमध्ये यापेक्षाही उघड विधान केले होते. गोळवलकरांसारखेच ते म्हणाले, की जात 'समाजाचे सुव्यवस्थितपणे नियोजन करण्याची' एक पद्धती होती. ते म्हणाले, 'नांगर शेतामध्ये नांगरणी करून शेत ज्या पद्धतीने सुसंघटित व सुव्यवस्थित ठेवतो अगदी त्याचप्रमाणे जाती हिंदू समाजात भूमिका बजावत असतात... जाती चांगल्या आहेत; परंतु जातीयवाद चांगला नाही...'[२]

या मुद्याकडे वेगळ्या कोनातून पाहिले असता हिंदुत्व मतप्रणालीधारकांना एका मूलभूत समस्येला सामोरे जावे लागते. जातीने विभाजित झालेल्या समाजाला एकत्रित कसे आणायचे? तर त्याला उत्तर असे आहे, की जातीला एक विभाजित करणारी संस्था म्हणून पुढे न आणता तिला एक एकत्रित करणारी संस्था म्हणून पुढे आणावयाचे.[३] अर्थात, ही एक कल्पना विशेषाधिकार नसलेल्या जातींना आकृष्ट करणारी नाहीये आणि कदाचित त्यामुळेच योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या मुलाखतीमध्ये सांगितल्याप्रमाणे ही गोष्ट क्वचितच फार उघडपणे बोलली जाते. सर्वसाधारणपणे हिंदुत्ववादी नेते जातीयव्यवस्थेबद्दल बोलण्यापासून दूरच राहतात; परंतु त्यांच्या या मौनामध्ये या जातीयव्यवस्थेला मूकसंमती दिल्याचे दिसते. त्यांच्यापैकी काही अगदी बरोबर मोजण्याएवढ्या नेत्यांनी कोणत्याही



स्तरावर जातीय व्यवस्थेविरुद्ध बोलल्याचे आढळून येते.

काही वेळेला हिंदुत्ववादी नेते अशी छाप पाडण्याचा प्रयत्न करतात, की ते जातीला विरोध करत असतात. कारण ते अस्पृश्यतेविरुद्ध बोलतात किंवा तशी कृती करतात. स्वतः सावरकर अस्पृश्यतेविरुद्ध होते आणि अगदी त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रारंभीच्या अस्पृश्यतेविरुद्धच्या सविनय कायदेभंगाच्या कार्याला पाठिंबा दिला होता. सावरकरांनी डॉ. आंबेडकरांच्या महाड येथील सत्याग्रहाला पाठिंबा दिला होता (Zelliott २०१३, पान ८०); परंतु अस्पृश्यतेला विरोध करणे हे कधीही जातीयव्यवस्थेला विरोध करण्यासारखे असत नाही. भारतातील उच्च जातींमध्ये अस्पृश्यतेला विरोध करत जातीयव्यवस्थेची बाजू घेण्याची फार दीर्घ परंपरा राहिलेली आहे. त्यास अलीकडील जातीयवादाचे विकृत रूप म्हणून नेहमीच बेदखल केले गेले आहे.[४]

**अनिश्चित सत्ता**

हिंदुत्व प्रकल्प उच्च जातींसाठी लाभदायी व्यवहार आहे. कारण तो त्यांना वरचे स्थान मिळवून देणाऱ्या पारंपरिक सामाजिकव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याच्या गोष्टींची अतिशय परिणामकारकपणे बाजू मांडतो. एखाद्याच्या अपेक्षेप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा खासकरून उच्च जातींमध्ये लोकप्रिय आहे. योगायोगाने आरएसएसचे सगळे संस्थापक हे ब्राह्मण होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सगळे प्रमुख (अपवाद राजेंद्रसिंग हे राजपूत होते.) हे ब्राह्मणच होते आणि हिंदुत्ववादी चळवळीचे इतर सर्व महत्त्वपूर्ण नेते - सावरकर, हेडगेवार, गोळवलकर, नथूराम गोडसे, श्यामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाल उपाध्याय, मोहन भागवत, राम माधव इत्यादी - हे सगळे ब्राह्मण आहेत. अर्थात, कालौघात संघाने त्याचा प्रवास उच्च जातींच्या पल्याड विस्तारला आहे; परंतु उच्च जाती हाच त्याचा सर्वांत जास्त निष्ठावान आणि विश्वासार्ह असा पाया राहिलेला आहे.५ वास्तविकपणे हिंदुत्व हे उच्च जातींसाठी एक प्रकारची जीवरक्षक बोट बनलेली आहे. कारण भारताच्या स्वातंत्र्यानंतर या उच्च जातींची सर्वश्रेष्ठता धोक्यात आली. अर्थात, कमी-अधिक प्रमाणात स्वातंत्र्योत्तर कालावधीत या उच्च जातींनी त्यांची सत्ता आणि विशेषाधिकार अबाधित ठेवण्यामध्ये यश मिळवले आहे. उदाहरणादाखल सन २०१५ मध्ये अलाहाबाद शहरात एक सर्वेक्षण करण्यात आले होते. विद्यापीठीय प्राध्यापक-अधिकारी, वकिलांचे मंडळ, मुद्रण संघ, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारपदांच्या जागा, व्यापारी संघाचे नेते, अशासकीय संघटनांचे प्रमुख व अशा इतर संघटनांमधील 'अधिकारी आणि प्रभावाची पदे' यांचे सर्वेक्षण केल्यानंतर आम्हाला हे लक्षात आले, की उत्तर प्रदेशातील लोकसंख्येमध्ये केवळ १६ टक्के वाटा असलेल्या उच्च जातीमधील ७५ टक्के लोकांनी अधिकार आणि प्रभावाची पदे बळकावलेली होती.६ अधिकार आणि प्रभावाची पदे यापैकी निम्मी पदे ब्राह्मण आणि कायस्थांनी पटकावलेली होती. गमतीची गोष्ट अशी, की हे असंतुलन सरकारी क्षेत्रापेक्षा व्यापारी संघटना, अशासकीय संघटना आणि मुद्रण संघासारख्या नागरी संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. अलाहाबाद हे अर्थात, केवळ एक शहर आहे; परंतु अशा इतर अनेक संशोधनाने हे दाखवून दिले आहे, की माध्यम क्षेत्रामध्ये, कॉर्पोरेट मंडळांमध्ये, क्रिकेट संघांमध्ये, वरिष्ठ प्रशासकीय पदे आणि अशाच इतर संघटनांमध्ये सातत्याने उच्च जातींचे वर्चस्व राहत आलेले आहे. उच्च जातींच्या वर्चस्वाचे असे अनुरूप नमुने अशा अभ्यासाने निदर्शनास आणून दिले आहे.

असे असले तरीही, उच्च जातीचे जहाज अनेक बाजूंनी गळायला लागले आहे. उदाहरणार्थ, एके काळी शिक्षण हे उच्च जातींचे एक प्रतिरूप एकाधिकारशाहीचे क्षेत्र होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभास साक्षरता हे ब्राह्मण पुरुषांमधील एक तत्त्व होते; परंतु दलितांमध्ये साक्षरता अगदीच शून्याच्या पातळीवर होती.७ अगदी आजही शिक्षणव्यवस्थेत निश्चितपणे असमानता आणि विषमता मोठ्या प्रमाणावर आहे; परंतु किमान दलित विद्यार्थी सरकारी शाळेत उच्च जातींच्या मुला-मुलींना मिळणारा दर्जा स्वतःलाही मिळावा यावर दावा करू शकतात. सगळ्या जातींमधील मुले-मुली शाळेत मध्यान्ह भोजन एकत्रित बसून करतात. सरकारचा हा उपक्रम अनेक उच्च जातीय पालकांच्या गळी उतरला नाही (ड्रेस, २०१७). अलीकडेच अनेक राज्यांमधील शाळांतील मध्यान्ह भोजनामध्ये अंड्यांचा समावेश केला तेव्हा उच्च जातीय शाकाहारी लोकांनी मोठा गदारोळ केला होता.[८] त्यांच्या प्रभावाखाली भाजपशासित अनेक राज्ये शालेय मध्यान्ह भोजनामध्ये अंड्यांचा समावेश करण्यास विरोध करत आहेत.

शालेय शिक्षणव्यवस्था सार्वजनिक जीवनाचे असे एकच उदाहरण आहे, जिथे उच्च जातींना काही सत्ता आणि विशेषाधिकार यांचे समाईकीकरण निरुपायाने स्वीकारावेच लागले आहे. निवडणूक प्रणाली हे असेच एक दुसरे उदाहरण आहे. एकदा डॉ. आंबेडकर

असे म्हणाले होते, की ‘प्रौढ मताधिकार आणि वारंवार होणाऱ्या निवडणुका सत्ता गाजवणाऱ्या वर्गाला अधिकार आणि सत्तेच्या ठिकाणी जाण्यापासून रोखू शकत नाहीत’ (आंबेडकर, १९४५, पान २०८). लोकसभेचे उच्च जातींचे प्रतिनिधित्वाचे प्रमाण अधिकचे असेलही; परंतु त्यातील त्यांचा वाटा २९ टक्के असा बेताचा राहिलेला आहे. त्याच्या अगदी उलट समाजातील सत्ता आणि प्रभावाच्या पदांमध्ये उच्च जातींचे खूपच जास्त वर्चस्व राहिलेले दिसते (त्रिवेदी, २०१९).

स्थानिक पातळीवरसुद्धा पंचायत राज संस्था आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व स्त्रियांसाठी असलेल्या राखीव जागांनी राजकारणावरील उच्च जातींची पकड ढिली केली आहे. अगदी त्याचप्रमाणे न्यायालयीनव्यवस्थेने वेळोवेळी उच्च जातींच्या मनमानी सत्तेवर निर्बंध घातले आहेत. उदाहरणार्थ, जमीन बळकावणे, वेठबिगारी मजूर आणि अस्पृश्यता यासंदर्भात न्यायालयांनी कडक आदेश दिलेले आहेत. कायद्यासमोरील समानतेच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अनुभव येण्यास आणखी खूप अवकाश लागणार आहे.

किमान ग्रामीण भागामध्ये काही आर्थिक बदलांनी उच्च जातींच्या सामर्थ्यशाली स्थानाला सुरुंग लावला आहे. अनेक वर्षांपूर्वी पश्चिम उत्तर प्रदेशातील मोरादाबाद जिल्ह्यात पालनपूरमध्ये मला या प्रक्रियेचे लक्षणीय उदाहरण पाहावयास मिळाले. जेव्हा आम्ही तुलनात्मकदृष्ट्या शिक्षित रहिवाशी मानसिंह (नाव बदलले आहे.) यांना अलीकडील आर्थिक आणि सामाजिक बदलाबद्दल त्यांची कल्पना लिहून काढण्यास सांगितले, तेव्हा त्यांनी पुढीलप्रमाणे लिहिले (सन १९८३ च्या शेवटी) :

१. उच्च जातींपेक्षा खालच्या जाती चांगले जीवन जगत आहेत. त्यामुळे खालच्या जातींबद्दल वरच्या जातीतील लोकांच्या मनात प्रचंड द्वेष आणि मत्सर आहे.
२. खालच्या जातीमध्ये खूप जलद गतीने शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.
३. एकंदरीत आपण म्हणू शकतो, की निम्न जाती वर जात आहेत आणि उच्च जाती खाली येत आहेत. कारण आधुनिक समाजात निम्न जातींची आर्थिक परिस्थिती ही वरिष्ठ जातींपेक्षा सुधारलेली दिसत आहे.

‘निम्न जाती’ म्हणजे कोणत्या जाती हे जोपर्यंत मला समजले नाही तोपर्यंत मला याचा अर्थ समजला नाही. मानसिंहला दलित असे म्हणायचे नव्हते, तर त्याने स्वतःच्या जातीचा दलित म्हणून उल्लेख केला होता. त्याची जात मुराओ होती. मुराओ उत्तर प्रदेशातील इतर मागास वर्गातील एक जात आहे. या धाग्याच्या आधाराने त्याने जे लिहिले त्याचा मला अर्थ कळला होता आणि ते खरोखर आमच्या संशोधन निष्कर्षाशी मिळतेजुळते होते. जमीनदारीच्या निर्मूलनानंतर आणि हरित क्रांतीनंतर उत्तर प्रदेशातील उच्च जातीय ठाकूरांपेक्षा शेती करणाऱ्या मुराओ जातीने सातत्याने स्वतःची प्रगती केली. ते भौतिकदृष्ट्या समृद्ध झाले. पारंपारिक रीतीने ठाकूर नांगराला हात लावत नाहीत. ते संकेतास धरून नाही; परंतु आज ठाकूरदेखील स्वतःची आळशी जमीनदाराची प्रतिमा जपण्यासाठी संघर्ष करीत आहेत. मुराओ जातीच्या शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतात भरपूर कूपनलिका घेऊन बहुविध पिके घेण्यास सुरुवात केली आहे, तसेच





ते आणखी जास्त जमीन खरेदी करत आहेत. मानसिंह हे ध्वनित करतात, की शिक्षणामध्येदेखील मुराओ ठाकूरांच्या बरोबरीने येण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे ठाकूर मुराओबद्दलचा राग लपवू शकले नाहीत. पालनपूर हे केवळ एक उदाहरण आहे; परंतु अनेक खेड्यांच्या अभ्यासातून अशाच प्रकारचे नमुने निरीक्षणामध्ये येत आहेत.९ मला असे सुचवायचे नाही, की स्वातंत्र्योत्तर भारतात उच्च जातींची तुलनात्मक आर्थिक घसरण ही काही स्वातंत्र्योत्तर भारतातील वैश्विक नमुना नाही; परंतु किमान हा एक सर्वसाधारण नमुना असल्याचे दिसते.

थोडक्यात, जरी उच्च जातींचे आर्थिक आणि सामाजिक जीवनाच्या अनेक पैलूंवर नियंत्रण असले तरी काही क्षेत्रांत त्यांचे वर्चस्व कमी होत आहे किंवा ते वर्चस्व गमविण्याच्या धोकाक्षेत्रात आहेत. उच्च जातींच्या विशेषाधिकारांचा ऱ्हास तुलनात्मकदृष्ट्या कमी असला तरी तो खूप मोठा असल्याचे दिसते.

**पलटवार**

अलीकडील दशकांमध्ये उच्च जातीय विशेषाधिकारांना सगळ्या



मार्गांनी आव्हान दिले आहे. उच्च जातींनी निम्न जातींच्या शैक्षणिक आरक्षणास आणि सार्वजनिक रोजगारामधील आरक्षणास अत्यंत तीव्रपणे नापसंती दर्शवली आहे. आरक्षण धोरणांनी उच्च जातींच्या किती शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधी कमी केल्या, हे स्पष्ट झालेले नाहीये.

आरक्षणाच्या तत्त्वांची संपूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाहीये. अशी अंमलबजावणी अजूनही कोसो दूर आहे आणि ही तत्त्वे प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातच लागू होतात. निःसंशयपणे या धोरणांनी उच्च जातींमध्ये असा एक सर्वसाधारण समज तयार केला आहे, की त्यांचे व्यवसाय आणि पदव्या या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांकडून हिसकावून घेतल्या जात आहेत. १०

सन १९८० मध्ये व्ही. पी. सिंग सरकारने ओबीसींच्या आरक्षणावरील मंडल आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याचे ठरविल्यानंतर तात्काळ बीजेपीचे पुनरुज्जीवन होण्यास सुरुवात झाली. याने केवळ हिंदू समाजाच्या विभागणीलाच धोका निर्माण केला नाही (उच्च जाती प्रचंड धुमसत होत्या), तर त्याने बीजेपीपासून ओबीसींना वेगळे पाडण्याचा धोका निर्माण केला. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ओबीसींची संख्या ४० टक्के एवढी आहे. उच्च जातींनी मंडल आयोगाच्या शिफारशींना विरोध केला. एल.के. अडवाणींची अयोध्या रथयात्रा आणि त्यानंतरच्या झालेल्या घटनांनी (६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यात आली) 'जातीय' संकटाला दुसरीकडे वळविण्यास मदत केली आणि बीजेपी व उच्च जातींच्या नेतृत्वाखाली मुस्लीमविरोधी विचार मंचावर हिंदूंना पुन्हा एकत्रित केले.

हिंदुत्वाचे हे अत्यंत लक्षणीय उदाहरण आहे. ज्याने उच्च जातींना त्यांच्या विशेषाधिकाराला निर्माण झालेल्या धोक्याला प्रत्युत्तर देण्यास सक्षम केले आणि त्याचे हिंदू समाजावरील नियंत्रण अधोरेखित केले. खरोखर हेच हिंदुत्व चळवळीचे सर्वांत मुख्य असे कार्य आहे. या चळवळीचे संभाव्य शत्रू हे केवळ मुस्लीम नाहीयेत, तर त्यामध्ये ख्रिश्चन, दलित, आदिवासी, कम्युनिस्ट, धर्मनिरपेक्षवादी, विवेकवादी, स्त्रीवादी. थोडक्यात, ब्राह्मण्यवादी सामाजिक व्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाच्या मार्गात अडथळा म्हणून जे कोणी उभे राहतील, ते सर्व या चळवळीचे संभाव्य शत्रू आहेत. जरी यास बहुसंख्याकांची चळवळ म्हटले जात असले, तरी त्यास अत्याचारी अल्पसंख्याकांची चळवळ असे कदाचित त्याचे अधिक चांगल्या प्रकारे वर्णन केले जाऊ शकते.

हिंदुत्व चळवळीच्या या अर्थनिरूपणाला एक संभाव्य आक्षेप (किंवा खरं तर अलीकडील काळात त्याची झालेली वेगवान वाढ) हा आहे, की दलित या चळवळीला मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहेत. तथापि, या आक्षेपाला प्रत्युत्तर देणे सहजसोपे आहे. १) अनेक दलित संघास किंवा हिंदुत्व मतप्रणालीस पाठिंबा देत आहेत, हे संशयास्पद आहे. सन २०१९ च्या सार्वजनिक निवडणुकीत अनेकांनी बीजेपीला मतदान केले होते; परंतु त्याचा अर्थ त्यांनी





हिंदुत्वाला पाठिंबा दिला असा काढणे चुकीचा आहे. बीजेपीला मतदान करण्यामागची अनेक संभाव्य कारणे आहेत. २) हिंदुत्ववादी मतप्रणालीस मानत नसले तरी हिंदुत्ववादी चळवळीचे काही पैलू दलितांना आकृष्ट करण्याची दाट शक्यता आहे. उदाहरणार्थ, संघाने देशात शाळेचे व्यापक जाळे उभारले आहे व त्यासाठी ते प्रसिद्ध झाले आहेत. शिवाय संघाने त्याच्या इतर प्रकारच्या सामाजिक कामातून वंचित समूहात स्वतःचा लौकिक वाढवला आहे. संघाच्या या सगळ्या कामाचा फोकस हा नेहमीच विशेषाधिकार नसलेल्या समूहावर राहिलेला आहे. ३) संघाने दलितांचा पाठिंबा मिळवण्यासाठी स्वतःचा सरधोपट मार्ग सोडून केवळ सामाजिक कार्यामधूनच नव्हे, तर खोटा प्रचार केला. अशा खोट्या प्रचाराची सुरुवात करताना त्यांनी डॉ. आंबेडकरांना स्वतःच्या कंपूत ओढले आहे. वस्तुनिष्ठपणे बोलायचे तर हिंदुत्व आणि आंबेडकर यांना एकत्रित आणणारा कोणताही संभाव्य विचार मंच नाहीये. तरीही संघ दररोज कोणत्या ना कोणत्या मार्गाने आंबेडकर आमचेच आहेत, असा दावा करत असतो. शेवटी असा युक्तिवाद करता येईल, की जरी हिंदुत्व जाती निर्मूलनाची भूमिका घेत नसले तरी त्याचा जातीबद्दलचा दृष्टिकोन आणि त्याची कृती हा आजच्या जातीयव्यवस्थेपेक्षा कमी अत्याचारी आहे. काही दलितांना असे वाटते, की त्यांना व्यापक सामाजिक पातळीवर जी वागणूक मिळते त्याच्यापेक्षाही चांगली वागणूक संघामध्ये मिळते. संघाच्या एका सहानुभूतिधारकाने म्हटले आहे : ''हिंदूत्व आणि समान हिंदू अस्मितेचं वचन याने नेहमीच खूप मोठ्या प्रमाणावर दलितांना आणि ओबीसी जातींना आकर्षित केले. कारण ते त्यांना दुर्बल जातीच्या अरुंद अस्तितेमधून मुक्त करण्याचे आणि त्यांना एका सशक्त हिंदू समाजात प्रवेश देण्याचे वचन देते'' (सिंग, २०१९).

आता हा वेगळा मुद्दा आहे, की त्याचे हे 'वचन' नेहमीच एक मृगजळ म्हणून सिद्ध झालेले आहे. भंवर मेघवंशी यांचे एक दलित म्हणून संघामधील त्यांचे अनुभव उद्बोधन करणारे उदाहरण आहे (मेघवंशी, २०२०).

अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे, हिंदू राष्ट्रवादाच्या उद्याचा बीजेपीच्या सार्वत्रिक निवडणुकीतील यशासोबत घोटाळा करू नये. त्या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. असे असले तरी, सन २०१९ च्या संसदीय निवडणुकीतील बीजेपीचा दूरगामी विजय हा संघासाठीसुद्धा फार मोठा आहे. सरकारमधील सर्व महत्त्वपूर्ण पदे (पंतप्रधान, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, अनेक खाते विभाग, अनेक राज्यपाल आणि बरेच काही) संघाच्या सदस्यांनी किंवा माजी सदस्यांनी पटकावलेली आहेत. हे सर्व सदस्य हिंदू राष्ट्रवादाच्या मतप्रणालीचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. लोकशाहीविरुद्धचे उच्च जातींचे अत्यंत शांततापूर्ण असणारे हे बंड लोकशाही संस्थांवर आता अधिक प्रत्यक्ष हल्ल्याचे स्वरूप धारण करीत आहे. त्याची सुरुवात विरोधी मत व्यक्त करणाऱ्या व्यक्ती व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ल्याने झालेली आहे. लोकशाहीची माघार आणि जातीचा चिवटपणा हे दोघेही एकमेकांवर पोसले जाण्याच्या संकटात आहेत.

●●●

**(लेखक रांची विद्यापीठात अभ्यागत प्राध्यापक आहेत.)**

**अनुवाद : राजक्रांती वलसे,**
**सहयोगी प्राध्यापक, बद्रीनाथ बारवाले महाविद्यालय,**
**जालना – ४३१ २१३**



# काँग्रेसच्या चिंतनाचे फलित!

**चिंतन शिबिराच्या अखेरच्या दिवशी केलेल्या भाषणात, देशाच्या राजकारणात काँग्रेसची गरज काय, हे पटवून देण्याचा प्रयत्न माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांनी केला. केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपविरोधात दोन हात करण्याची ताकद फक्त काँग्रेसमध्ये आहे. भाजपविरोधात लढण्याची वैचारिक भूमिका आणि स्पष्टताही काँग्रेसकडेच आहे. प्रादेशिक पक्ष हे एखाद्या विशिष्ट जातीचे पक्ष असतात, त्यांच्याकडे राष्ट्रीय स्तरावर भाजपला पराभूत करण्याची ताकद नाही, वैचारिक पाठबळ नाही, असा युक्तिवाद राहुल गांधी यांनी केला.**

**विचक्षण बोधे**

उदयपूरमध्ये झालेले काँग्रेसचे चिंतन शिबिर आगामी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा भाग असल्याचे पक्षाचे नेते सांगत होते; पण भाजपच्या पराभवासाठी आखलेल्या संभाव्य रणनीतीत काही प्रश्न मात्र तसेच कायम राहिले. मग तीन दिवसांच्या चर्चेतून काय साधले?

प्रत्येक चिंतनातून अपेक्षित फळ मिळतेच असे नाही; पण वेळोवेळी चिंतन करून नजीकच्या भविष्यातील मार्ग निश्चित करावा लागतो. काँग्रेस पक्षाच्या उदयपूरमध्ये झालेल्या चिंतन शिबिरातून भाजपविरोधातील लढाई अधिक टोकदार कशी करायची याचे स्पष्ट उत्तर पक्षाच्या कार्यकर्त्यांना मिळाले नसले तरी, त्यानिमित्ताने झालेली चर्चा ही महत्त्वाची होती. तीन दिवस झालेल्या विविध बैठकांमध्ये काँग्रेसच्या राजकीय भूमिकेकडे सर्वाधिक लक्ष वेधले गेले होते. भाजपविरोधात देशस्तरावर संघर्ष करण्यासाठी नितांत गरजेची असलेली वैचारिक स्पष्टता हे शिबिर देऊ शकेल, तसेच भाजपविरोधी आघाडीच्या नेतृत्वाचा प्रश्नही निकालात निघेल, असे वाटले होते; पण दोन्ही मुद्द्यांचे धागे तसेच लटकत राहिले असले, तरी हे मुद्दे चर्चेत आले, हे मात्र खरे!

चिंतन शिबिराच्या अखेरच्या दिवशी माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणात, देशाच्या राजकारणात काँग्रेसची गरज काय, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपविरोधात दोन हात करण्याची ताकद फक्त काँग्रेसमध्ये आहे. भाजपविरोधात लढण्याची वैचारिक भूमिका आणि स्पष्टताही काँग्रेसकडेच आहे. प्रादेशिक पक्ष हे एखाद्या विशिष्ट जातीचे पक्ष असतात, त्यांच्याकडे राष्ट्रीय स्तरावर भाजपला पराभूत करण्याची ताकद नाही, वैचारिक पाठबळ नाही, असा युक्तिवाद राहुल गांधी यांनी केला. या युक्तिवादामध्ये काँग्रेसच्या अनेक भूमिका दडलेल्या आहेत. खरेतर काँग्रेसची इतकी दुरवस्था झाली आहे, की लोकसभेत विरोधी पक्षनेते पद मिळण्याइतकेही खासदार या राष्ट्रीय पक्षाला निवडून आणता

आलेले नाहीत. छत्तीसगढ आणि राजस्थान ही केवळ दोन राज्ये काँग्रेसकडे उरली आहेत. उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा कसा फज्जा उडाला, हे सर्वांनी पाहिलेले आहे आणि तरीही काँग्रेसला बिगरभाजप राजकीय अवकाशामध्ये केंद्रस्थानी राहायचे आहे. काँग्रेसने स्वबळावर लोकसभा निवडणूक लढवण्याची भाषा सोडून दिली असली तरी, भाजपविरोधातील संभाव्य महाआघाडीचे नेतृत्व करण्याचे स्वप्न काँग्रेस बघत असल्याचे दिसते. निदान राहुल गांधी यांच्या विधानांवरून तरी तसे ध्वनित होते.

**प्रादेशिक पक्षांचे महत्त्व**

तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी वा तेलंगणा राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव आदी काही प्रादेशिक पक्षांच्या प्रमुखांना काँग्रेसला वगळून बिगरभाजप महाआघाडी बनवण्याची इच्छा असली तरी, ते शक्य होणार नाही. त्यामागील कारणे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्पष्ट केलेली आहेत. काँग्रेस कमकुवत झाला असला तरी राष्ट्रीय पक्ष आहे आणि आताही या पक्षाला १९-२१ टक्के मते मिळतात. त्यामुळे भाजपविरोधातील महाआघाडी काँग्रेसला बरोबर घेऊनच करावी लागेल; पण या संभाव्य महाआघाडीचे नेतृत्व करण्याइतकी ताकद काँग्रेसकडे आहे का? राहुल गांधी यांनी लंडनमध्ये दिलेल्या व्याख्यानामध्ये केलेली चूक चिंतन शिबिरातील भाषणात सुधारण्याचा प्रयत्न केलेला दिसला. प्रादेशिक पक्षांचे स्वतःचे अस्तित्व आहे आणि काँग्रेसला आपले नेतृत्व या पक्षांवर लादण्याची इच्छा नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. कुठलाही एक प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय स्तरावर भाजपचा पराभव करू शकत नाही; पण आपापल्या राज्यामध्ये प्रादेशिक पक्षांनी भाजपचा अश्वमेध अडवलेला आहे. चोवीस तास निवडणुकीच्या मूडमध्ये असलेल्या भाजपची राज्या-राज्यांमध्ये भगवा फडकावण्याची मनीषा प्रादेशिक पक्षांमुळे पूर्ण होऊ शकत नाही. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तामीळनाडू, केरळ, दिल्ली, पंजाब, झारखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची सत्ता आहे. काँग्रेसला राष्ट्रीय स्तरावर न जमलेली भाजपला रोखण्याची किमया प्रादेशिक पक्षांनी वेगवेगळ्या राज्यांमध्ये करून दाखवलेली आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचा समावेश असलेल्या आघाडीचे नेतृत्व काँग्रेसला करता येईल का, हा कळीचा प्रश्न होता.

**'यूपीए'चे काय करणार?**

चिंतन शिबिराच्या पश्चात भाजपविरोधी आघाडीशी संबंधित आणखी एक मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. संयुक्त पुरोगामी आघाडीची (यूपीए) फेररचना करण्याची गरज निर्माण झाल्याचे सातत्याने सांगितले जात आहे. 'यूपीए'चे अध्यक्षपद शरद पवारांकडे सोपवले जावे, असे सुचवले जात आहे. भाजपविरोधातील संभाव्य महाआघाडीतील पक्षांना काँग्रेसचे नेतृत्व मान्य नसेल तर, 'यूपीए'चे अध्यक्षपद सोनिया गांधींऐवजी अन्य परिपक्व नेत्याकडे देऊन काँग्रेसने भाजपला पराभूत करण्यावर लक्ष केंद्रित करावे. उत्तर भारतात राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगढ, अशा काही राज्यांमध्ये काँग्रेसला भाजपविरोधात थेट लढाई लढावी लागेल, तिथे प्रादेशिक पक्ष नाहीत. या राज्यांतील लोकसभेच्या सुमारे दोनशे जागांपैकी अधिकाधिक जागांवर काँग्रेस भाजपला पराभूत करू



शकला तर, २०२४ मधील लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे चित्र बदलू शकेल. दोन वर्षांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपला २०१९ मधील यशाची अपेक्षा आणि खात्री आहे; पण राज्या-राज्यांतील प्रादेशिक पक्ष आणि थेट लढाईत काँग्रेसने यश मिळवले, तर भाजपच्या अपेक्षांचा फुगा फुटू शकेल. काँग्रेसच्या चिंतन शिबिरातील प्रादेशिक पक्षांकडे बघण्याचा साशंक दृष्टिकोन आगामी लोकसभा निवडणुकीत किती उपयोगी पडेल, हाही प्रश्न निर्माण होतो.

**वैचारिक स्पष्टता कुठे?**

भाजपविरोधात लढण्याची वैचारिक स्पष्टता काँग्रेसकडे असल्याचे राहुल गांधी यांचे म्हणणे होते; पण भाजपविरोधात कोणत्या वैचारिक स्पष्टतेने लढणार याचे विवेचन त्यांच्या भाषणात सापडले नाही. खरे तर या मुद्यावरून काँग्रेस पक्षात मतभेद आहेत, तसे नसते तर, केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतल्यानंतर काँग्रेसने नेमकी कोणती भूमिका घ्यावी यावरून पक्षात वाद झाला नसता. चिंतन शिबिरात भाजपच्या कडव्या हिंदुत्वाला सौम्य हिंदुत्वाने प्रत्युत्तर द्यावे, की नको यावर काथ्याकूट झाला; पण त्यावर निर्णय घेतला गेला नाही. हिंदुत्वाच्या मुद्यावर लोक भाजपला मते देत असतील, तर काँग्रेसनेही याच मार्गाचा अवलंब केला पाहिजे, असा मतप्रवाह पक्षात दिसतो. आम आदमी पक्षाने दिल्लीत सौम्य हिंदुत्वाचा प्रयोग केला होता, मग काँग्रेसने का करू नये, असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. लोकसभा वा विधानसभेच्या निवडणुका आल्या, की राहुल गांधींपासून काँग्रेसचे अनेक नेते मंदिरांच्या फेऱ्या मारताना दिसतात, पूजाअर्चा करतात. भाजपमधील कुठल्याही नेत्याइतके आपणही हिंदू धर्माचे पालन करतो, देव मानतो, कर्मकांड करतो, असे त्यांना दाखवायचे असते. मध्य प्रदेशमध्ये कमलनाथ या मार्गाने पुढे जात असल्याचे सांगितले जाते. कमलनाथ यांच्या लाभा-नुकसानीचे गणित काहीही असो, देशस्तरावरील सुमारे पाचशे पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या चिंतन शिबिरात भाजपविरोधात कोणत्या विचारांनी लोकांना आकर्षित करायचे आणि मते मागायची याची दिशा देणे हे नेतृत्वाचे कर्तव्य होते. प्रादेशिक पक्षांकडे निव्वळ निवडणूक **(उर्वरित पान...२४ वर)**

# चूप! आधी कर्तव्ये पार पाडा...!

**प्रश्न विचारायचा अधिकार संघात कोणालाही नाही. अधिकार बौद्धिक बळ देतो. बरोबरीची शक्यता निर्माण करतो. त्यामुळे अधिकाराची बातच बंद! गप्प राहणे आणि सांगितले ते मुकाट पाळणे, हा संघाचा खाक्या. संशय आणि अभिव्यक्ती यांचा फार दाट संबंध. शंका आणि वाचा यांचे अतूट नाते; पण कर्तव्य म्हणजे मार्गनिश्चिती. ती कशी काय त्यागायची? सबब यशाचे शिखर गाठायचे असेल तर निमूट कर्तव्य करीत राहा, अशी लालूच भोळ्याभाबड्यांना दाखवली जाते. आपण करतो ती देशसेवा आहे, असा या भाबड्यांचा समजही तयार केला जातो.**



जयदेव डोळे


प्रोफेसर नरेंद्र मोदी रोज किमान तीन-चार लेक्चर्स देतात. समोर कोणी असो, त्यांचे लेक्चर कायम देशासाठी झोडलेले असते. पंतप्रधान म्हणून तो त्यांचा अधिकार आहे. किंबहुना त्यांचे ते कर्तव्य आहे. भाषण देणे हा जसा संविधानाने त्यांना दिलेला अधिकार आहे, तसा भाषण देणे हेही त्यांचेच कर्तव्य असल्याचा अधिकार त्यांनी स्वतःहून आपल्याकडे घेतला आहे. म्हणजे अधिकार आणि कर्तव्य एकाच मुखातून प्रकट होत राहते आणि त्यांचा अधिकार रोज आपल्याला किमान चारदा तरी बघायला मिळतो. अधिकार आणि कर्तव्य यांचे ऐक्य प्रोफेसर साहेबांनी अलीकडेच उघड केले. त्यांना कोणी तरी एक ज्येष्ठ विरोधी पक्षनेते भेटले. ते मोदींना म्हणाले, की मतदारांनी तुम्हाला दोनदा लागोपाठ संधी दिली देशाची सेवा करायची. (तेव्हा आता पुरे... असेही ते म्हणाले असतील) हा किस्सा सांगून मोदी म्हणाले, की अजून खूप कामे बाकी आहेत. दिलेली आश्वासने पूर्ण करायची आहेत. (तेव्हा माझी इच्छा पुन्हा पंतप्रधान व्हायची आहे, असे त्यांनी सुचवले) त्यामुळे सत्ता असेल तर आणि ती हवी असेल तर कर्तव्ये पूर्ण करण्यासाठी अधिकार पाहिजे, असा दावा करता येतो हे आपण पाहिले.



**विद्यापीठे वैचारिक मतभेदांचे आखाडे होता कामा नयेत**

अगदी मोदींसारखेच विचार त्यांचे गुजराती मित्र, सहकारी आणि नेते अमित शाह यांनी मांडले. १९ मार्च रोजी शाहजींना दिल्ली विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात लेक्चर द्यायला बोलावले होते. त्यामुळे क्षणात प्रोफेसरकीचा अवतार धारण करून शाहजी बोलले, की विद्यापीठे वैचारिक मतभेदांचे आखाडे होता कामा नयेत. आपल्या हक्कांसाठी प्रसंगी हिंसाचारही करू, असे भारताचे तत्त्वज्ञान सांगत नाही. कर्तव्ये पूर्ण न करता मागण्यासारखे अधिकारच नाहीत. भारतात एक नवी चळवळ सुरू झाली असून

तीत आपल्या हक्कांच्या मागण्यांसाठी लोक अव्यवस्था निर्माण करीत आहेत. राज्यघटनेने सर्वांना हक्क दिलेले आहेत; पण हक्कांसोबत घटनेने काही कर्तव्येही करायला सांगितली आहेत. म्हणून कर्तव्यांची पूर्तता केल्यावाचून आपण हक्कांची मागणी करू शकत नाही. २०१४ पासून देशात जे परिवर्तन युग सुरू झाले आहे, त्याचे दिल्ली विद्यापीठाने वाहक व्हावे वगैरे वगैरे.



**मानवी हक्कांचा संघर्ष भरकटलेला!**

हक्कांची मागणी करणाऱ्यांना गप्प बसायला सांगणे आणि त्यांच्यावर काही-काही आरोप करणे हा सर्वच सत्ताधाऱ्यांचा दावा असतो. संघाच्या मुशीमधून बाहेर पडलेले शाह तो करणारच. हक्क आणि कर्तव्ये यांची सांगड घालताना त्यांनी ईशान्येकडील काही राज्यांत अधूनमधून होणाऱ्या मागण्यांची आणि त्यावेळी होणाऱ्या हिंसाचाराची सांगड घातली. सशस्त्र सैनिक दलाचा कायदा ईशान्येच्या काही राज्यांमधून गृहखात्याने हटवला आहे. पूर्णपणे नाही. हे सांगताना शाह यांनी अधिकारांच्या मागण्या करतेवेळी हिंसाचार उसळून जे मरतात त्यांनाही मानवी हक्क लागू असतोच की, असे सांगून मानवी हक्कांचा संघर्ष कसा भरकटलेला आहे, हे ठसवू पाहिले. मानवी हक्कांना जोडूनच कर्तव्येही असतात, हे त्यांनी जोर देऊन सांगितले.

**उर्मट सत्ताधारी, बेजबाबदार राज्यकर्त्यांचा मानसशास्त्रीय डावपेच**

दुसऱ्यांकडे बोट करताना तीन बोटे आपल्याकडेही असतात, हे लक्षात घ्या, असा एक बावळट, बालिश दावा खूप जण करतात. आपल्यावरची जबाबदारी झटकून टाकून, तुम्हीसुद्धा तितकेच जबाबदार आहात, असे सुचवायचा हा एक कांगावा असतो. आरोप वा तक्रार करणारा माझ्यासारखाच लबाड आहे, असाही या बोटांच्या संख्येमागचा उद्देश असतो. प्रत्येक सत्ताधारी अशा पद्धतीने आरोप करणाऱ्यांची तोंडे बंद करू पाहत असतात. अमित शाह तेच करीत आहेत. येथे आरोपींच्या जागी हक्क मागणारे नागरिक आहेत. नागरिक म्हणून हक्क मागताना प्रत्येकाने आपण आपली कर्तव्ये काय पार पाडली याचा आधी विचार करावा, मगच बोलावे, अशी ताकीद शाह देत आहेत. आम्ही तुमचे हक्क ओरबाडतो, हिरावतो, हिसकावतो असे म्हणणारे तुम्ही कोण? आधी या देशासाठी तुम्ही काय दिले ते सांगा. मग आम्ही तुमच्या हक्कांचा विचार करू अशी हिशेबी, सौदेबाज भाषा शाह करीत आहेत. कर्तव्यही नाही अन् फुकट हक्क मागता? त्यापेक्षा तोंड गप्प का ठेवत नाही, अशी सरळसरळ आज्ञा गृहमंत्री देत आहेत. उर्मट सत्ताधारी आणि बेजबाबदार राज्यकर्ते यांची अशी नळावरच्या भांडणासारखी भाषा असते. आपली कुचराई, कमतरता व कारस्थान उघडे पडू नये म्हणून 'आधी तुम्ही काय केले ते सांगा' असा परतफेडीचा हा एक डाव आहे. आपणच प्रश्नांची सरबत्ती केली, की आपल्याला प्रश्न करणारे आपोआप मागे हटतात, असा हा एक मानसशास्त्रीय डावपेच आहे. भाजपच्या पत्रकार परिषदांमधला हा एक नेहमीचा अनुभव आहे. पत्रकारांनी विचारलेला प्रश्न काँग्रेसला विचारा किंवा त्यांच्या कारकीर्दीत तुम्ही किती वेळा विचारला, असे प्रत्येक वेळा म्हणत राहिले, की पत्रकारही कंटाळतात. आपण कधी विचारला का तसा प्रश्न, असा स्वतःच स्वतःला प्रश्न करतात. भाजपच्या काळातल्या महागाईचा मुद्दा काढला, की तेव्हाची महागाई नाही का आठवत, असा प्रतिप्रश्न करायचा. झाले! पुढची सारी झाडाझडती थांबते. पत्रकार चुप्प बसतात.

**कर्तव्यभावना अदृश्य**

ज्या संविधानाचा दाखला गृहमंत्री देतात त्यात मूलभूत अधिकार आधी सांगितलेले आहेत. राज्यघटनेच्या चौथ्या भागात मूलभूत कर्तव्ये दिलेली आहेत. प्रत्येक भारतीयासाठी ती असल्याने गृहमंत्री त्यात आलेच. नवव्या क्रमांकावर सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि हिंसेला नकार याविषयी बजावण्यात आले आहे. क्रमांक पाचचे कर्तव्य धर्म, भाषा, प्रदेश यांचे वा अन्य भेद ओलांडून सलोखा व बंधुभाव निर्माण करायला सांगणारे आहे. शाह यांची अनेक जाहीर भाषणे या कर्तव्याशी इमान राखणारी असतात का, हे त्यांनीच स्वतःशी 'मन की बात' करून सांगावे. धर्मराज्य हा तर भाजपची मातृसंख्या रा.स्व. संघ हिचा जाहीर कार्यक्रम. भाजपने अयोध्या, काशी, मथुरा यांचा धडाका लावून कार्यक्रमाची

अंमलबजावणी सुरू केली आहे. नागरिकत्वाचा अधिकार शाबीत करायला लावून शाह कोणते कर्तव्य पार पाडीत आहेत, ते काही सांगत नाहीत. हिंसाचार कोणी करू नये हे खरेच. कारण त्याने नुकसान दोन्हीकडचे होते. पण हिंसा करायला प्रवृत्त करणारे प्रशिक्षण कर्नाटकात बजरंग दलाच्या देखरेखीत एका शैक्षणिक संस्थेत कसे काय पार पडले? संयोजकांवर थातूरमातूर कारवाई तर केली अन् कारवाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला का बरे तिथून हलवले? स्वकीयांचा हिंसाचार अथवा हिंसक विचार शाह यांना नेहमीच मौनात टाकतो. त्यांनी कधी झुंडबळींचा, चर्चवरच्या हल्ल्यांचा, जय श्रीराम म्हणायला लावून केलेल्या मारझोडीचा, दलितांवर होणाऱ्या अत्याचारांचा जाहीर निषेध केला का? दिल्लीतल्या दंगलीची चौकशी आणि पोलिसांची त्याबाबतची कारवाई पक्षपाती असल्याचे न्यायालयात उघड झाले. तेव्हा शाह यांना कर्तव्याची जाण का बरे झाली नाही?

शाह यांच्या गुजरातमध्ये गेल्या काही महिन्यांत हजारो कोटी रुपयांच्या मादक पदार्थांची तस्करी झाली. केवढे तरी मादक पदार्थ सापडले; पण एकाचाही मूळ मालक कोण, त्याचा पत्ता लागला नाही. कर्तव्यभावना बहुधा अदृश्य झाली ज्यांना या भानगडीची माहिती होती त्या सर्वांची.

**स्वतंत्र होणे हे प्रत्येक परतंत्र मनुष्याचे परमकर्तव्य**

आता हक्क आणि कर्तव्य यांचा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा संबंध काय ते पाहायला हवे. आपण ब्रिटिशांचे गुलाम असताना प्रत्येकाचे कर्तव्य होते, की देशाला स्वतंत्र करावे. गुलामीचे जगणे कोणाला आवडते? एवढे मोठे संघटन असूनही या संघाचे कर्तव्य नव्हते का स्वातंत्र्य चळवळीत उतरायचे? समजा समाजवाद्यांशी अन् काँग्रेसशी जमत नव्हते, तर स्वतःची एखादी स्वातंत्र्य चळवळ उभी करणे चालले असते. तेही नाही. स्वातंत्र्य असणे हा मानवाचा एक मूलभूत हक्क आहे. त्याचबरोबर स्वतंत्र होणे हे प्रत्येक परतंत्र मनुष्याचे परमकर्तव्य आहे; पण संघ ना त्या स्वातंत्र्याच्या चळवळीत, ना हक्काच्या, ना कर्तव्याच्या पालनात कुठे. डॉ. हेडगेवारांचे नाव तेवढे पुरते त्याला; परंतु स्वातंत्र्याची इतकी अवहेलना आणि त्याचा तिरस्कार संघाने का केला?

**सदोदित कर्तव्य केले पाहिजे, असा संघाचा धोशा**

शाहांच्या मुखातून संघच व्यक्त होत आहे. कसा? कर्तव्यांची तुलना हक्क व अधिकार यांच्याशी कोण करते? या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत, हे काय शाहांना कळत नाही; परंतु ते कायम बोलत राहणार. याचे कारण संघाची स्वातंत्र्याची, हक्कांची व समतेची कल्पना यात दडली आहे. एकदा का स्वातंत्र्य मान्य केले, की त्यापुढचे बंधुता व समता हे तत्त्व समोर येऊन उभे राहते, हे संघ १९२५ पासून जाणतो. फ्रेंच क्रांती, अमेरिका क्रांती, औद्योगिक क्रांती, साम्यवादी क्रांती या साऱ्या घडामोडी १९२५ पूर्वीच्या असून त्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता यांसह लोकशाही, अधिकार, प्रतिष्ठा आदी तत्त्वेही गुंतलेली होती. संघ स्वातंत्र्य चळवळीत सामील न होण्याचे कारण या साऱ्या तत्त्वांचा अंगीकार त्याला करावा लागला असता, हे आहे. त्याचा चातुर्वर्ण्य, जातिसंस्था व धर्मसंस्था यावरचा विश्वास मग डळमळला असता. गौतम बुद्धांमुळे या साऱ्या गोष्टी खचल्या होत्या. हिंदू धर्माचा आधार मोडकळला होता; पण ब्राह्मणी धर्माने जोर लावून बौद्ध तत्त्वांचा प्रतिकार केला आणि ती देशाबाहेर घालवली. पुन्हा तीच वेळ गांधींच्या नेतृत्वाखालच्या चळवळीत दिसताच संघाने ब्राह्मणी धर्माच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न म्हणून समता, बंधुता, स्वातंत्र्य, हक्क आदींचा उच्चारही करणे टाळले. संघाचे १९२५ नंतरचे मौन या कारणांसाठी आहे. चातुर्वर्ण्य म्हणजे कर्तव्याचा मूलमंत्र. जातिव्यवस्था म्हणजे कर्तव्याचे आज्ञापालन. तिथे अधिकारांचा प्रश्न येईलच कसा? म्हणून संघ आणि संघाचे प्रचारक सदोदित कर्तव्य करा, कर्तव्य केले पाहिजे, असा धोशा लावत असतात.

**...म्हणून कर्तव्य हे आखीव व पूर्वनियोजित असते**

आणखी संघाची अडचण काय? एकीकडे स्वतःसाठी स्वयंसेवक म्हणवून घ्यायचे आणि दुसरीकडे कर्तव्य, कर्तव्य असे म्हणत राहायचे! स्वयंसेवा व कर्तव्य या दोन बाबी एकमेकींच्या पूर्ण विरोधात असतात. स्वयंसेवक म्हणजे कोण? जी स्वेच्छेने, स्वप्रेरणेने व आवडीने कोणत्याही कामात सहभगी होते ती व्यक्ती. सक्ती नाही वा जबरदस्ती नाही, अशा प्रकारचे काम म्हणजे स्वयंसेवा. कर्तव्य म्हणजे काय? जे काम बंधनकारक, सक्तीचे आणि अपरिहार्य आहे ते. आवड, निवड अथवा इच्छा यांचा त्यात संबंधच येत नसतो. म्हणून कर्तव्य हे आखीव तसेच पूर्वनियोजित असते. जणू यंत्रामधला एक भाग. त्याला सुटकाच नाही. कर्तव्य अनिवार्यही असते. कारण योजना व व्यवस्था या संघाच्या आवडीच्या शब्दांनुसार ते ठरलेले असते. संघ स्वतःच्या कार्यास ईश्वरी कार्य, परमेश्वरी संकेत, दैवी इच्छा, अशा शब्दांनी उगाच उदात्त ठरवत नाही. पारलौकिक आधार घेऊन कर्तव्याविषयी भय निर्माण केले की बस्स! नाही तरी भारतीय माणसाची परलोक, दिव्य शक्ती, नियती, कर्म, नशीब यांवर जबर श्रद्धा. तीच वेगळ्या प्रकारे राष्ट्र, मां भारती, देश इत्यादी शब्दांसाठी वळवली, की आल्याच सगळ्यांच्या मुंड्या हातात. देवांनी सांगितलेली कामे कर्तव्येच म्हणून पाळायची, असा संघाचा पवित्रा असतो. या साऱ्या प्रकरणात हक्क येतात कुठे?

**परंपरागत व्यवसायांपासून असंख्य जातींची सुटका**

हक्क व अधिकार यांची मागणी प्रत्येक जण करू लागला तर जातिव्यवस्था खिळखिळी होऊन मोडून पडणार, हे या जातिपूजकांना ठाऊक आहे. हिंदू धर्मच अशाने संपून जाईल. जातिखेरीज हिंदू धर्माची वेगळी ओळख काय? त्यामुळे हिंदुत्ववादी कोण आहेत, या प्रश्नाचे उत्तर जातिसंस्थेचा कट्टर पाठीराखा, पुरस्कर्ता आणि रक्षण म्हणजे हिंदुत्ववादी! जात व त्या जातीला दिलेले काम म्हणजेच कर्तव्यभावना आणि कर्तव्यपरायणता!! जातीची ओळख तिला सोपवलेल्या कर्तव्यानेच होते. सबब, आपापले कर्तव्य करीत राहणे म्हणजेच हिंदू धर्मपरंपरा जोपासत राहणे इतका साधा सोपा हा सांगावा आहे. तुमचे कर्तव्य करीत राहा, उगाच इतडे तिकडे नाक खुपसू नका, असे सांगणे म्हणजेच हक्कांची भाषा आणि अधिकाराचा उच्चार करीत जाऊ नका हे बिंबवणे. १९८९ साली पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी मंडल आयोगाचा स्वीकार करीत असल्याची घोषणा करताच भाजपने

त्यांच्या सरकारचा पाठिंबा का काढून घेतला? अभाविप, भाजयुमो या संघाच्या संघटना रस्त्यावर का उतरल्या? त्यावेळी संघाची हीच तर भीती होती ना, की या मध्यम जाती आता सत्ताधारी बनून आपला हिंदू धर्म बिलबिलीत करून टाकतील! मंडल आयोगामुळे परंपरागत व्यवसायांपासून असंख्य जातींची सुटका झाली. त्यांना राजकीय-आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक सत्ता मिळू लागली. कल्याणसिंह, उभा भारती, गोपीनाथ मुंडे, एकनाथ खडसे इत्यादी नेत्यांना भाजपने सत्तेत बसवून आपला विरोध घटवला; परंतु हे करता-करता या ओबीसी पलटणीला ब्राह्मण्याविरुद्ध न बोलायची आणि फुले-शाहू-आंबेडकर या जाती विध्वंसकांचा अनुयायी न होण्याची शपथच घातली! आज भारतीय राजकारणात ओबीसींना भाजप आधार वाटतो. याचे कारण सत्तेच्या राजकारणात दलित जातींचे वर्चस्व आणि अस्तित्व कमी करणे हेच एकमात्र आहे. दलित जाती त्यांच्या 'कर्तव्या'पासून मुक्त होऊ पाहत असताना म्हणजे आपली पारंपरिक गलिच्छ कामे सोडून अन्य सन्मानजनक व्यवसाय करण्याच्या त्या तयारीत असताना केवळ अधिकारांची भाषा न करण्याबद्दल गृहमंत्री इशारा देतात, याचा अर्थ आता संघाला झाले तेवढे हक्कसंक्रमण पुरे झाले, असे वाटू लागले आहे. हक्क आदिवासींना सोडा, दलित जातींनाही अद्याप पुरेसे मिळू लागले नसताना कर्तव्यभावना चेतवण्याचे गमक काय? गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, हरयाणा, पंजाब आदी राज्यांमधून जवळपास दर आठवड्याला दलितांच्या छळाच्या घटना घडतात. त्या काय सहज घडतात? गावागावांत अजूनही 'आपल्या अवकातीत राहा' अशी ताकीद देणारे कोण आहेत नि ती कोणाला दिली जात असते, माहीत आहे का?

**...म्हणूनच संघात संशयाला, पृच्छेला, प्रश्नाला स्थान नाही**

कर्तव्य म्हणजे झापड. त्यानुसार चालत राहायचे. प्रश्न विचारायचा नाही. कर्तव्यभावना संशयाला जागा देत नाही म्हणत जो शंका विचारेल, साशंक होईल तो कर्तव्य पार पाडू शकत नाही. म्हणूनच संघात संशयाला, पृच्छेला, प्रश्नाला स्थान नाही. ते नाही म्हणून मान नाही. जी व्यक्ती संघात प्रश्न मांडते आणि त्याचा निपटारा मागते, ती संघात टिकत नाही. सर्व प्रकारच्या चिकित्सेला, चौकशांना आणि जिज्ञासेला शाखेमधून हद्दपार व्हावे लागते. प्रश्न विचारायचा अधिकार संघात कोणालाही नाही. अधिकार बौद्धिक बळ देतो. बरोबरीची शक्यता निर्माण करतो. त्यामुळे अधिकाराची बातच बंद! गप्प राहणे आणि सांगितले ते मुकाट पाळणे, हा संघाचा खाक्या. संशय आणि अभिव्यक्ती यांचा फार दाट संबंध. शंका आणि वाचा यांचे अतूट नाते; पण कर्तव्य म्हणजे मार्गनिश्चिती. ती कशी काय त्यागायची? सबब यशाचे शिखर गाठायचे असेल तर निमूट कर्तव्य करीत राहा, अशी लालूच भोळ्याभाबड्यांना दाखवली जाते. आपण करतो ती देशसेवा आहे, असा या भाबड्यांचा समजही तयार केला जातो.

राबराब राबले तरी या भाबड्यांना शिखर काही गाठता येत नाही. एखादा मोदी मूळच्यांना मागे ढकलून जसा आधी मुख्यमंत्री होतो व नंतर पंतप्रधान, तसा कर्तव्यपरायणांचा अपमान होतो. तक्रार तरी कुणाकडे अन् कशी करायची? न बोलता, न कण्हता कर्तव्य करीत राहिल्यावर बोंबलायची सवयच नाहीशी झालेली असते! अशी सवय हरवून गेलेल्यांचा मुकाटपणा म्हणजे इतना सन्नाटा! वोह क्यूं छाया हुआ है, समझ गये ना आप? ●●●

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

पान २० वरुन

# काँग्रेसच्या चिंतनाचे फलित!

जिंकण्याचे तंत्र असेल; पण राष्ट्रीय स्तरावर काँग्रेसकडे भाजपच्या हिंदुत्वाला पर्याय देण्यासाठी नेमका कोणता विचार आहे, हे स्पष्ट न होताच पदाधिकारी परत गेले. काँग्रेसच्या पाठीवर इतिहासाचे आणि चुकांचे ओझे आहे आणि काँग्रेसचे नेते त्याच चुका पुन्हा-पुन्हा करतात. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांनी, 'वृक्ष उन्मळून पडतात तेव्हा भूकंप होतात', असे राजीव गांधी यांनी केलेल्या वादग्रस्त विधानांचा संदर्भ देत ट्वीट केले होते. आपण कोणते ट्वीट केले, त्याचा अर्थ काय, याचेही भान अधीर रंजन यांना राहिले नाही. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये दिल्लीत शीखविरोधी हत्याकांड झाले, त्यावेळी या हत्याकांडाचे अप्रत्यक्ष समर्थन करणारे हे विधान राजीव गांधी यांनी केले होते. हे इतिहासातील चुकांचे ओझे घेऊन आणि त्यातून काहीही न शिकता काँग्रेसला भाजपविरोधात लढायचे आहे! मुस्लीम अनुनय करणारा पक्ष, असे काँग्रेसबद्दलचे चित्र लोकांच्या मनावर बिंबवण्यात, बहुसंख्याकांच्या राजकारणाच्या आधारे ध्रुवीकरण करण्यात भाजप यशस्वी झाला आहे. मग, भाजपच्या विरोधात काँग्रेस लोकांपर्यंत कोणते मुद्दे घेऊन जाणार, हे अजून स्पष्ट झालेले नाही. काँग्रेस लोकांपासून तुडलेला आहे, हे मान्य केले पाहिजे, अशी कबुली राहुल गांधी यांनी दिली आहे. निव्वळ पक्ष संघटना कमकुवत झाल्याने काँग्रेस पक्ष लोकांपासून दूर गेला असे नव्हे, तर पक्षाकडे लोकांना देण्यासाठी ठाम वैचारिक भूमिका नाही हेही महत्त्वाचे कारण आहे. यंदा २ ऑक्टोबर रोजी (गांधी जयंती) काँग्रेस 'भारत जोडो' यात्रा काढणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून काँग्रेस पुन्हा लोकांशी आपली नाळ जोडण्याचा प्रयत्न करणार आहे. या यात्रेत कदाचित काँग्रेसची भूमिका अधिक स्पष्ट होऊ शकेल. लोकसभा निवडणुकीसाठी दोन वर्षांचा कालावधी बाकी आहे. या काळात काँग्रेसने गांभीर्याने लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित मतदार पुन्हा सकारात्मक प्रतिसाद देऊ शकतील. ●●●

# मुस्लीम स्थळांच्या वादातून काय साध्य करणार ?

**आपल्या देशात बाबरी मशिदीसंबंधाचा वाद भाजपचे त्या वेळचे अध्यक्ष लालकृष्ण अडवाणी यांच्यामार्फतीने चालू असताना, त्या वेळेस केंद्रात सत्तेत असलेल्या काँग्रेस पक्षाच्या पंतप्रधान नरसिंह राव सरकारने पुढाकार घेऊन अयोध्येतील बाबरी मशीद प्रकरण वगळता (कारण ते स्वातंत्र्यपूर्व काळातील न्यायप्रविष्ट प्रकरण असल्यामुळे) उर्वरित जी काही मंदिरे, मशिदी यांच्या भानगडी असतील त्यामध्ये १५ ऑगस्ट १९४७ यादिवशी जी स्थिती असेल तीच पुढे कायम राहील, असा कायदा संसदेने संमत केला आहे.**



**कॉ. भीमराव बनसोड**

देशात सध्या ज्ञानवापी मशिदीचे प्रकरण सर्वच प्रसारमाध्यमांतून गाजवण्यात येत आहे. ही ज्ञानवापी मशीद नसून खरेतर ते शिवालय आहे, असे एका हिंदुत्ववादी गटाचे म्हणणे आहे. याबाबतचे प्रकरण वाराणसीच्या स्थानिक कोर्टात चालू आहे. सदरील कोर्टाने या मशिदीचे सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार त्याचे सर्वेक्षण झाले आहे आणि त्याचा अहवालही मा. कोर्टाकडे सादर करण्यात आला आहे. त्यासाठी जो आयोग नेमला होता त्या आयोगातील हिंदुत्ववादी सदस्यांनी या मशिदीतील वजू करण्याचा पाण्याचा साठा असलेल्या तलावामध्ये शिवाचे लिंग आढळले असल्याचा दावा केला आहे. वाराणसी कोर्टाने सदरील जागेला ताबडतोब सील करून तेथे कोणीही जाऊ नये व त्या जागेला अथवा लिंगाला नुकसान पोहोचवू नये, असा आदेश दिला आहे. याविरोधात मुस्लीम पक्ष घेणाऱ्याचे म्हणणे असे आहे, की ती पिंड किंवा शिवलिंग नसून तो पाण्याचा फवारा आहे. तो फार जुन्या काळातील असल्याने काहीसा मोडकळीस आल्यामुळे हिंदू पक्षकारांना तो शिवलिंग असल्याचे भासत असला तरी तो पाण्याचा फवाराच आहे, असा त्यांचा दावा आहे. या आयोगातील एका हिंदू पक्ष सदस्याने मा. कोर्टापुढे अहवाल सादर होण्याच्या अगोदरच त्याच्या एका सहकाऱ्यामार्फत याबाबतचे फुटेज बाहेर लीक केले होते. त्यामुळे त्याचे सदस्यत्व मा. कोर्टाने रद्द केले आहे. आता फवारा की शिवलिंग हा वाद न्यायालयात चालू आहे. एकंदरीत हे प्रकरण चालू असतानाच देशभरातील विविध ठिकाणी इतिहासकाळात मुस्लिमांनी मंदिरे पाडून मशिदी बनविल्या असल्याचे दावे ठिकठिकाणी करण्यात येत आहेत.

**पाण्याचे कारंजी उडविण्याचा शौक**

ज्ञानवापी मशिदीबद्दल बोलायचे झाल्यास तो पाण्याचा फवारा असण्याचीच शक्यता जास्त आहे. कारण ते मुस्लिमांचे वजू करण्याचे



ठिकाण म्हणजे नमाज अदा करण्यापूर्वी हात, पाय, तोंड धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे ठिकाण होय. अशा पाण्याच्या ठिकाणी पूर्वीच्या काळी पाण्याचा फवारा असणे सहज शक्य आहे. ही बाब ज्यांनी मुस्लिमांची ऐतिहासिक ठिकाणे पाहिली असतील त्यांच्या सहज ध्यानात येऊ शकते. पूर्वीच्या मोगल व इतरही मुस्लीम राजेरजवाड्यांना, सरदारांना बागबगीचाचा व त्यामध्ये पाणी खेळवण्याचा, पाण्याचे कारंजी उडविण्याचा शौक होता, हे सर्वविदित आहे. असे पाण्याचे फवारे अगदी आग्र्याच्या ताजमहालापासून तर औरंगाबादच्या बीबी का मकबरा, पाणचक्की केवळ इतकेच नव्हे, तर काश्मीरच्या मुगल गार्डनमध्येसुद्धा पाहायला मिळू शकते. अर्थात, यातील विविध आकारांचे व डिझाइनचे असलेले बरेचसे फवारे आता बंद पडलेले, नादुरुस्त अवस्थेत आहेत, ही वस्तुस्थिती आहे; पण हिंदू पक्षकारांना मुस्लिमांविरोधात काहीतरी कुरापत काढायचीच असल्यामुळे त्यांना हा फवारा शिवलिंगासारखा दिसत असणे साहजिक आहे.

**हाही कुरापतीचाच एक भाग!**

याच ज्ञानवापी मशिदीसंबंधाने पाच महिलांनी आम्हाला तेथे

शृंगारगौरी देवीची पूजा करण्याची परवानगी देण्यात यावी, असेही प्रकरण स्थानिक कोर्टात दाखल केले आहे. हाही त्या कुरापतीचाच एक भाग आहे. त्याबद्दलही सुनावणी सुरू आहे. असे एकीकडे ज्ञानवापी मशिदीबद्दल ते मंदिर असल्याचे व तेथे आम्हाला पूजा-अर्चा करू देण्याचा, मुस्लिमांना तेथे जाण्यास मज्जाव करण्याचा आदेश मा. कोर्टाने द्यावा, यासारखी प्रकरणे नंतर दाखल झालेली आहेत. मा. कोर्टाने मुस्लिमांना मशिदीत जाण्यास, तेथे वजू करण्यास व नमाज पडण्यासाठी अद्यापपर्यंत तरी प्रतिबंध केलेला नाही, ही एक समाधानाची बाब म्हणता येईल.

**मलाली जुमा मशिदीच्या परिसरात १४४ कलम**

एकीकडे ज्ञानवापीचे हे प्रकरण चालू असताना केवळ दुसरीकडे नव्हे, तर चहूकडेच मुस्लिमांची देशातील जी-जी म्हणून ठिकाणे आहेत, त्या ठिकाणांवर पूर्वी मंदिरे होती व ती मंदिरे पाडून तेथे मशिदी अथवा इतर बाबी मुस्लीम राज्यकर्त्यांनी बनविल्या आहेत, असा हिंदुत्ववादी गटांकडून, त्यांच्याच तथाकथित इतिहासकाराकडून दावा करण्यात येत आहे. उदा. कुतुबमीनार मुस्लिमांनी बांधलेला असला तरी त्या परिसरात पूर्वी अनेक मंदिरे होती. त्या मंदिरांना पाडून त्याठिकाणी कुतुबमीनार बनविण्यात आला आहे. तेव्हा तेथे आम्हाला आता पूजा-अर्चा करण्याची परवानगी द्यावी, असा जसा खटला दाखल करण्यात आला आहे, तसाच ताजमहाल हा शहाजहाने बांधलेला नसून तो त्यापूर्वीच राजपूत राजा जयसिंह यांनी बांधलेला तेजोमहाल आहे, असाही वाद उपस्थित करण्यात आला आहे. त्याचबरोबर मथुरा येथील कृष्ण मंदिर हेही त्यांनी वादाचा विषय केलेला आहे. दिल्लीतील जामा मशिदीच्या खाली हिंदू देवी-देवतांचे अवशेष सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे तिथे उत्खनन करण्याची परवानगी मिळावी, असे पत्र हिंदू महासभेने लिहिले आहे. कर्नाटकमधील बंगळुरू येथील मलाली जुमा मशिदीच्या खाली मंदिराचे अवशेष मिळाले आहेत, असा दावा करून विश्व हिंदू परिषदेने तेथे पूजा-अर्चा करण्यास सुरुवात केली होती. तेथील वातावरण तणावग्रस्त होते. परिसरात १४४ कलम लावण्यात आले. एकंदरीत काय तर जेथे-जेथे मुस्लिमांची ऐतिहासिक ठिकाणे अथवा मशिदी असतील त्या-त्या ठिकाणी पूर्वी हिंदूंची मंदिरे होती व ती आता हिंदूंच्या ताब्यात देण्यात यावीत, असा एकंदर या सर्व खटल्यांचा, दाव्यांचा सूर आहे.

**...अशा प्रकारच्या दाव्यांना जणू काही पेवच फुटले आहे**

खरे तर, ज्यावेळी आपल्या देशात बाबरी मशिदीसंबंधाचा वाद भाजपचे त्या वेळचे अध्यक्ष लालकृष्ण अडवाणी यांच्यामार्फतीने चालू असताना, त्या वेळेस केंद्रात सत्तेत असलेल्या काँग्रेस पक्षाच्या पंतप्रधान नरसिंह राव सरकारने पुढाकार घेऊन अयोध्येतील बाबरी मशीद प्रकरण वगळता (कारण ते स्वातंत्र्यपूर्व काळातील न्यायप्रविष्ट प्रकरण असल्यामुळे) उर्वरित जी काही मंदिरे, मशिदी यांच्या भानगडी असतील त्यामध्ये १५ ऑगस्ट १९४७ यादिवशी जी स्थिती असेल तीच पुढे कायम राहील, असा कायदा संसदेने संमत केला आहे. या कायद्याचा आधार घेऊन मा. सुप्रीम कोर्ट अशा सर्व उर्वरित प्रकरणांना न्यायप्रविष्ट करण्यास मज्जाव करू शकले असते; परंतु माननीय सुप्रीम कोर्टाने असे काही केले नाही. उलट त्यांचे असे म्हणणे आहे, की हा कायदा असला तरी त्यात अशा बाबींचे सर्वेक्षण करू नये, त्याची पाहणी करू नये, त्यासाठी आयोग नेमू नये, असे या कायद्यात कुठेही म्हटलेले नाही. म्हणून आम्ही सर्वेक्षणाची, त्याच्या अहवालाची परवानगी दिलेली आहे. मा. सुप्रीम कोर्टाच्या अशा दृष्टिकोनामुळे या प्रकारच्या दाव्यांना जणू काही पेवच फुटले आहे व त्या-त्या ठिकाणचे स्थानिक कोर्ट अशी प्रकरणे दाखल करून त्यावर सुनावण्या घेत आहे.

त्यामुळे या बाबीचा फायदा मुस्लिमांमधील धर्मांध ओवेसीसारख्यांचे नेतृत्व असलेल्या एआयएमआयएमसारख्या संघटनेला होत आहे. कारण उत्तर प्रदेशमधील हे ज्ञानवापीचे प्रकरण असले तरी तेथील मुस्लिमांनी बीजेपीच्या विरोधात म्हणून समाजवादी पार्टीला मतदान केले होते. तरीही समाजवादी पक्ष व त्याचे अखिलेश यादवसारखे नेतृत्व या प्रकरणांमध्ये एक प्रकारे मूग गिळून गप्प बसले आहे. एकेकाळी समाजवादी पक्षाचे महत्त्वाचे (मुस्लीम) नेते असलेले, मुलायम सिंग व नंतर अखिलेश यादव यांचे उजवे हात समजले जाणारे व नुकतेच सुप्रीम कोर्टाने दिलेल्या जामिनामुळे कैदेतून बाहेर आलेले आजम खानसारखे नेतेही समाजवादी पक्षाच्या नेतृत्वावर नाराज आहेत. अशा परिस्थितीत एमआयएमसारख्या संघटनेला त्याचा फायदा मिळणे स्वाभाविक आहे. ते सदरील कायद्याच्या आधारावर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दृष्टिकोना-बद्दल उघडपणे बोलत आहेत व त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. अशा सगळ्या बाबी बीजेपीलाही हव्या आहेत. कारण याचा अप्रत्यक्षपणे फायदा हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरणासाठी त्यांनाच होत आहे.

**...तर ती भारतीय संविधानाविरुद्धची कृती होईल**

आता ही गोष्ट सत्य आहे, की गत इतिहासकाळात भारतावरील वेगवेगळ्या आक्रमकांनी किंवा मग येथेच वरचढ ठरलेल्या त्या काळातील राज्यकर्त्यांनी, मग ते येथे स्थायिक झालेले असोत वा नसोत, त्यांनी मंदिरांची, विहारांची नासधूस आर्थिक कारणाने किंवा मग धार्मिक उन्मादाने केलेली आहे. या ऐतिहासिक सत्य घटना म्हणून आपणाला मान्य कराव्या लागतील; पण मग आता त्याचे काय करायचे? गत इतिहासकाळातील जुने मुडदे उकरून काढून सद्यःस्थितीतील त्या राज्यकर्त्या धर्मीय लोकांचे आता मुडदे पाडायचे काय? हा त्यावरील इलाज नक्कीच नाही. हे अमानवी, अमानुष कृत्य ठरेल. ती सध्याच्या कायदा व सुव्यवस्थेच्या, तसेच भारतीय संविधानाविरुद्धची कृती होईल.

कारण याच न्यायाने पाहायचे झाल्यास वंचित बहुजन आघाडीचे ॲड. बाळासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे सम्राट अशोकाच्या काळात बांधलेले बौद्ध विहार कुठे गेले? असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कारण एकेकाळी भारतात बौद्धधर्म हा मोठ्या प्रमाणात होता. त्याची विहारे देशभर पसरलेली होती. अगदी पूर्वी ज्याला गांधार देश म्हटले जात होते, अशा आताच्या अफगाणिस्तानापर्यंतसुद्धा ती होती. हे ऐतिहासिक सत्य आहे. मग या विहारांना नंतर सत्तेत आलेल्या तथाकथित हिंदू राजांनी उद्ध्वस्त केले आहे व या विहारांच्या ठिकाणी मंदिरे बांधलेली आहेत, हेसुद्धा ऐतिहासिक सत्य आहे. सम्राट अशोक, राजा कनिष्क यांच्यानंतर सत्तेत आलेल्या तथाकथित हिंदुत्ववाद्यांनी विहारे नष्ट केली आहेत व त्यावर मंदिरे उभारली आहेत, तेव्हा मग ती सर्व विहारे बौद्धांच्या ताब्यात देण्यात

येतील काय?

**हिंदुत्ववादी लोक देशाचे संविधानही मानणारे नाहीत**

तेव्हा थोडक्यात सांगायचा मुद्दा हा, की इतिहासकाळात होऊन गेले ते झाले. आता मेलेले मुडदे उकरून काढून नव्याने मुस्लिमांचे अथवा दलितांचे मुडदे पाडण्यात काहीही अर्थ नाही व तसे होऊ नये याच कारणाने काँग्रेस सरकारने (ते धर्मनिरपेक्ष असो किंवा नसो; पण ते सर्वधर्मसमभाव मानणारे असल्यानेच त्यांनी) १९९१ साली प्रार्थनास्थळ (विशेष तरतुदी) अधिनियम १९९१ हा कायदा केला होता व या कायद्याला धरूनच सर्व गोष्टी व्हायला पाहिजेत; परंतु या कायद्यास त्यावेळी विरोध करणाऱ्या भाजपच्या उमा भारतींसारख्या लोकांचे आता म्हणणे असे आहे, की कायदे काय, ते काळानुरूप बदलत असतात. तेव्हा हा कायदासुद्धा आता बदलण्यात यावा, अशीही मागणी या तथाकथित हिंदुत्ववादी लोकांनी केलेली आहे. खरे तर, हे लोक केवळ हा कायदाच नव्हे, तर देशाचे संविधानही मानणारे नाहीत. तेव्हा पुढे चालून हे कायदेही बदलतील, संविधानही बदलतील, असा धोका भारतीय जनतेपुढे निर्माण झाला आहे.

**'यह तो अभी झांकी है, काशी, मथुरा बाकी है ।'**

बरे एखाद्या ठिकाणच्या या बाबी मान्य केल्या. उदाहरणार्थ. भोंगा वाजवणे बंद केले किंवा मग हिजाब घालणे बंद केले, तर अशी प्रकरणे थांबतील काय? मुळीच नाही. एक झाले की दुसरे, दुसरे झाले की तिसरे, चौथे याप्रमाणे त्यांनी एक प्रकारे मुस्लिमांविरुद्धची प्रकरणे उकरण्याचा सपाटाच सुरू केला आहे, असे दिसते. अयोध्या-बाबरी मशिदीसंबंधाने त्यांची घोषणाच आहे, की 'यह तो अभी झांकी है, काशी, मथुरा बाकी है।' या घोषणेला धरूनच भाजप, आरएसएसच्या हालचाली चालू आहेत. याला कुठेतरी पायबंद घालावा म्हणूनच १९९१ सालचा प्रार्थनास्थळ (विशेष तरतुदी) अधिनियम १९९१ हा कायदा झालेला आहे, हे आपण विसरता कामा नये.

**मुस्लीमांना जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात येत आहे**

सध्याची शासकीय यंत्रणा मा. कोर्टाचा आदेश मानायला तयार नाही. त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करणे टाळत असल्याचेच दिसते. याचा संकेत त्यांनी दिल्ली येथील जहांगीरपुरी येथील बुलडोझरच्या साह्याने मुस्लीम समुदायाची घरे पाडण्यासाठी जी स्थगिती मा. सुप्रीम कोर्टाने दिली होती, त्या स्थगिती आदेशाकडे दुर्लक्ष करून, दोन तासांपर्यंत मुस्लिमांची घरे पाडण्याचे काम चालूच ठेवले होते, यावरून मिळते. त्याचबरोबर या जातीय, धर्मांध शक्तींनी रामनवमीच्या, हनुमान जयंतीच्या निमित्ताने मुस्लिमांच्या मशिदींपुढून सशस्त्र मिरवणुका काढल्या. मुस्लिमांविरोधात घोषणा दिल्या. त्यांच्या मशिदींमध्ये घुसून तेथे भगवा झेंडा फडकवला. अशी अनेक प्रकरणे देशात घडलेली आहेत. या सगळ्या प्रकारांमध्ये त्या-त्या ठिकाणची पोलीस यंत्रणा उपस्थित असतानाही त्यांनी या तथाकथित हिंदुत्ववाद्यांना प्रतिबंध करण्याचा पाहिजे तसा प्रयत्न केला नाही, हेही दिसून येते. किंबहुना, ते या सगळ्या झुंडशाहीचा भाग आहेत की काय, अशी शंका यावी, असा त्यांचा व्यवहार झालेला आहे. अशा परिस्थितीत जो पीडित मुस्लीम समुदाय आहे त्याने थोडाही विरोध केला, तरी त्याला दंगलीचे स्वरूप देऊन या मुस्लीम समुदायाच्या लोकांनाच पोलीस अटक करतात. त्यांच्यावरच खटले दाखल



करतात व त्यांचीच घरे अतिक्रमणाच्या नावाखाली प्रशासकीय यंत्रणेमार्फत बुलडोझर लावून पाडण्यात येतात. यावरून मुस्लीम समुदायाला जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात येत आहे, हे उघड आहे.

त्यामुळे पोलीस यंत्रणाही आपल्या समुदायाला लक्ष्य करीत आहे, हे या समुदायाच्या लक्षात आल्यामुळे आसाममधील नवगाव जिल्ह्यातील सलोनाबोरी या गावातील समुदायाने त्यांचा एक माणूस पोलीस कस्टडीत मारून टाकल्यामुळे तेथील पोलीस स्टेशन जाळून टाकले. मग या पीडिताच्या पत्नी, मुले व इतरही नातेवाइकांना यूएपीए कायद्याखाली अटक करण्यात आली. त्यांच्यासह जे लोक या समुदायात होते त्या समुदायातील लोकांची घरे कोर्टाचा आदेश नसतानाही, स्वतः प्रशासकीय यंत्रणेने अतिक्रमणाच्या नावाखाली बुलडोझर लावून पाडलेली आहेत. तेव्हा एक प्रकारे या शासकीय यंत्रणेने कायदा आपल्या हातातच घेतला आहे. त्यासाठी आरोपीवर आरोप ठेवणे, त्याचा न्यायालयात खटला दाखल करणे, त्यासाठी पुरावे गोळा करणे व ते आरोप सिद्ध करून तसा कोर्टाचा निकाल घेणे, या सर्व बाबींना फाटा देऊन स्वतःच आरोपीला शिक्षा देऊन टाकणे, असा खाक्या आता भाजपची सत्ता असलेल्या राज्य सरकारांनी व त्या-त्या ठिकाणच्या पोलीस यंत्रणेने अवलंबलेला आहे. यासाठी ते कोर्टाच्या निकालाची वाट पाहत बसत नाहीत.

**मुस्लिमांच्या व्यापक नरसंहाराची पूर्वतयारी तर नव्हे ना?**

त्यांनी असे बुलडोझर लावून घरे पाडण्याचे प्रकार करोली (राजस्थान), खरगोन आणि बडवानी (मध्य प्रदेश), बडोदा आणि हिंमतनगर (गुजरात), हुबळी (कर्नाटक), कर्नाल (आंध्र प्रदेश), मुजफ्फरपूर (बिहार), लोहरदगा (झारखंड) आणि जहांगीरपुरी (दिल्ली) वगैरे ठिकाणीसुद्धा केलेले आहेत. खरे तर, राजस्थानमध्ये काँग्रेसचे सरकार असताना असे व्हायला नको होते; पण तेथील काँग्रेस सरकारही हतबल झाले आहे की काय? असा प्रश्न निर्माण होतो.

वरीलप्रमाणे काशी, मथुरेपासून तर आता अजमेरपर्यंत मुस्लिमांची म्हणून जी जी प्रार्थनास्थळे किंवा मग ऐतिहासिक ठिकाणे ही हिंदूंचीच असल्याचा दावा करणे, त्यासाठीचे प्रकरणे न्यायालयात दाखल करणे, न्यायालयानेसुद्धा उपरोक्त कायदा झाला असतानाही त्या कायद्याची दखल न घेता, अशा दाव्यांची दखल घेऊन सर्वेक्षण करणे, वरीलप्रमाणे मुस्लीम समुदायांच्या घरादारांवर बुलडोझर चालविणे, (पूर्वीच्या काळी याला घरदारांवरून नांगर फिरविणे असे म्हणत) तशी कार्यवाही म्हणजे यापूर्वी धर्म संसदेत जाहीर केलेल्या आगामी काळातील मुस्लिमांच्या व्यापक नरसंहाराची पूर्वतयारी तर नव्हे ना. ●●●

**(लेखक कामगार चळवळीतील कार्यकर्ते आहेत.)**



# शेतकरी पारतंत्र्य दिवस

**सीलिंग, आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण हे तीन कायदे लागू राहिल्यामुळे शेतकऱ्यांची वाताहत झाली. १८ जून ५१ रोजी झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीमुळे हे कायदे राबविता आले. सुमारे चार लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली म्हणून १८ जून हा दिवस किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने शेतकरी पारतंत्र्य दिवस म्हणून पाळला जातो.**



**अमर हबीब**

आपण ज्या महात्म्यांचा आदर करतो, त्यांची पुस्तके वाचत नाहीत, त्यांच्या वचनांचे आचरण करीत नाहीत. ज्या ग्रंथांबद्दल श्रद्धाभाव असतो, ती आपण वाचलेली नसतात. अनेक धर्मांच्या अनुयायांमध्ये त्यांच्या धर्मग्रंथांचे अध्ययन केलेले अभावानेच दिसून येतात; पण त्या महात्म्यांबद्दल किंवा धर्मग्रंथांबद्दल कोणी ब्र काढला, तर त्यांचे अनुयायी अक्षरश: तुटून पडतात. धर्मग्रंथ आणि महात्मे यांच्याबाबत जी विसंगती दिसून येते, तशीच विसंगती भारतीय राज्यघटनेबद्दलदेखील दिसू लागली आहे. घटना आणि कायद्याचे काही कळत नसले तरी 'खबरदार' वगैरे भाषा वापरली जाते. या श्रद्धाभावाचा अनेक जण गैरफायदा घेतात.

मी एका सभेत लोकांना विचारले, की 'तुमच्या पैकी किती जणांनी भारतीय राज्यघटना वाचली आहे, कृपया हात वर करा.' कोणाचाच हात वर झाला नाही. मला वाटले, विचारण्यात काही चुकले असेल म्हणून लोकांच्या लक्षात आले नसेल. पुन्हा विचारले, तरी कोणीच हात वर केला नाही. मी प्रश्नात दुरुस्ती केली व विचारले, की तुमच्यापैकी किती जणांनी भारतीय राज्यघटनेचे पुस्तक पाहिले आहे? दोन जणांचे हात वर झाले. चौकशी केली तर कळले, की ते दोघे वकील आहेत आणि भारतीय राज्यघटना त्यांच्या अभ्यासक्रमात होती. ती अभ्यासक्रमात नसती तर किती जणांनी अभ्यासली असती कोणास ठाऊक?

'घटना बचाव' करणाऱ्यांची मी काही व्याख्याने ऐकली. त्यात ते घटनापीठाने तयार केलेल्या घटनेची माहिती देतात. त्याचा गुणगौरव करतात; पण मला प्रश्न पडतो की, घटनापीठाने तयार करून दिलेले संविधान आज जसेच्या तसे राहिले आहे का? त्यात काही बदल झाले नाहीत का? (१९५१ ते २०२० पर्यंत १०४ घटनादुरुस्त्या झाल्या. त्यांनी घटनेत ३७३ बदल झाले.) हे बदल योग्य होते का? केलेल्या बदलामुळे मूळ घटना बळकट झाली का दुबळी झाली? भारतीय नागरिकांवर या घटनादुरुस्त्यांचा काय परिणाम झाला? याच्याबद्दल ते अवाक्षार काढीत नाहीत. मूळ संविधानाचा सन्मान जरूर करू. कारण ते स्वातंत्र्य आंदोलनातील योद्ध्यांनी तयार केले, या देशाला मिळालेले ते पहिले संविधान आहे. पहिल्यांदा देशातील नागरिकांना अनेक अधिकार या घटनेने दिले. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही; पण गेल्या सत्तर वर्षांत केलेल्या घटनादुरुस्त्यांनी मूळ घटनेचा श्वास कोंडला गेला, हेही सांगायला हवे की नाही? आज एवढ्या वर्षांनंतर घटनेबद्दल बोलायचे असेल, तर घटनादुरुस्त्यांचा आढावा घेणे अनिवार्य आहे आणि तुम्ही तो घेत नसाल तर काही तरी असे लपवीत आहात, जे कोणाच्या तरी फायद्याचे आहे. असा अर्थ काढावा लागेल. तुम्ही नव्या पिढीची दिशाभूल करीत आहात, असा

आरोप तुमच्यावर ठेवता येईल.

**पहिली घटनादुरुस्ती**

आपली घटना तयार करायला साधारणपणे तीन वर्षे लागली. २६ जानेवारी १९५० ला ती देशाने स्वीकारली. तीन वर्षे प्रदीर्घ चर्चा करून संविधान तयार करणारे घटनापीठ हेच आमचे हंगामी पार्लमेंट होते. तेव्हा प्रौढ मतदानावर आधारित निवडणूक झालेली नव्हती. ती काही महिन्यांत होणार होती. राज्यसभा अजून अस्तित्वात आलेली नाही. थोडे थांबा, असे अनेक मान्यवरांनी सुचवून पाहिले; पण काही परिणाम झाला नाही. हंगामी संसदेने अवघ्या दीडच वर्षात म्हणजे १८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती केली. या दुरुस्तीने आपल्या घटनेवर मोठा आघात झाला. जाणकार मानतात, की या दुरुस्तीने नवी घटनाच साकार झाली. अनुच्छेद ३१ ए व बी जोडण्यात आले. त्यानुसार नवे ९ वे परिशिष्ट तयार करण्यात आले. मूळ घटनेत आठच परिशिष्टे होती. ३१ बी मध्ये म्हटले आहे, की या ९ व्या परिशिष्टात ज्या कायद्यांचा समावेश केला जाईल, ते कायदे न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर राहतील. 'काही कायदे न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर राहतील' यासाठी पहिली घटनादुरुस्ती करण्यात आली. लोकांच्या स्वातंत्र्याची कक्षा वाढविण्यासाठी पहिली घटनादुरुस्ती झाली नाही. अनुच्छेद-३२ नुसार न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यालाच या दुरुस्तीने निष्प्रभ करून टाकले. थोडक्यात असे, की घटनेत असे एक नवे परिशिष्ट जोडण्यात आले, की ज्यात टाकलेल्या कायद्यांविरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही. या दुरुस्तीने संसद, कार्यसमिती व न्यायालय यांचे संतुलन बिघडवून टाकले. त्याचबरोबर या दुरुस्तीमुळे नागरीकांच्या नैसर्गिक अधिकाराचे हनन झाले.

**शेतकऱ्यांना न्यायालयाची दारे का बंद करण्यात आली?**

या घटनादुरुस्तीचे औचित्य आणि वैधतेविषयी कायदा आणि घटनातज्ज्ञ भाष्य करतील. मी एक कार्यकर्ता आहे. तब्बल सत्तर वर्षांनंतर पाहताना मला जे काय दिसते, तेवढेच मी सांगू शकतो. परिशिष्ट ९ मध्ये आज २८४ कायदे आहेत. त्यापैकी सुमारे अडीचशे कायदे थेट शेती आणि शेतकऱ्यांशी निगडित आहेत. उरलेल्यांपैकी बहुतेक कायद्यांचा शेती आणि शेतकऱ्यांशी संबंध येतो. असे का योगायोगाने होते? शेती आणि शेतकऱ्यांशी संबंधित कायदेच तेवढे या परिशिष्टात का आले? शेतकऱ्यांना न्यायालयाची दारे का बंद करण्यात आली? हे काही गफलतीने झाले नसून जाणून बुजून झाले आहे, असे मला वाटते.

ही घटनादुरुस्ती करताना तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'ही व्यवस्था फक्त या १३ कायद्यांसाठी केली जात आहे.' असे म्हटले होते. संसदेत जाहीर आश्वासन दिले होते; पण पंडित नेहरू यांच्या हयातीत म्हणजे १९६४ पर्यंत या परिशिष्टात सुमारे ६० कायदे समाविष्ट करण्यात आले होते. पुढच्या पंतप्रधानांचे विचारायलाच नको. त्यांना आयता तयार पिंजरा मिळाला होता. शेतकऱ्यांचे कायदे या पिंजऱ्यात टाकायचा त्यांनी सपाटाच लावला.

सीलिंग म्हणजे कमाल शेतजमीन धारणा कायदा. या कायद्यात कमाल धारणेची मर्यादा फक्त शेतजमिनीवर टाकली आहे. अन्य जमिनीवर नाही. हा कायदा शेतकरी आणि इतर व्यावसायिक यात उघड पक्षपात करतो. समान संधी, व्यवसाय स्वातंत्र्य, मालमत्तेचा अधिकार नाकारणारा हा कायदा आहे. संविधानाच्या मूळ सिद्धांताच्या विरुद्ध असूनही इतके दिवस तो कायम राहिला. कारण तो परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आला होता. त्यांच्या विरुद्ध न्यायालयात जाण्यास बंदी घालण्यात आली. परिणाम काय झाला? शेतजमिनीवर सीलिंग लावल्यामुळे कल्पक उद्योजक व व्यावसायिकांनी शेतीकडे पाठ केली. शेतकऱ्यांच्या कंपन्या तयार होऊ शकल्या नाहीत, शेतीत भांडवल आटले व नवी गुंतवणूक थांबली. जमिनीचे लहान-लहान तुकडे झाले. शेतजमिनींचा आकार इतका लहान झाला, की त्यावर गुजराण करणेदेखील अशक्य झाले. शेवटी शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या. एवढे अनर्थ करणारा हा कायदा टिकून राहिला. त्याचे एकमेव कारण परिशिष्ट-९ आणि पहिली घटना दुरुस्ती हे आहे.

आवश्यक वस्तू कायदा १९५५ देखील एक घटना दुरुस्ती करूनच आला. १९७६ साली इंदिरा गांधी सरकारने तो परिशिष्ट-९ मध्ये टाकला. हा कायदा शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी वापरण्यात आला. एवढेच नव्हे, तर हा कायदा लायसन्स, परमिट आणि कोटा राज निर्माण करणारा आहे. सरकारी नोकरांच्या भ्रष्टाचाराची जननी आहे. या कायद्यामुळे शासन पोषित राजकीय संस्कृती तयार झाली. या कायद्यामुळे ग्रामीण भागात कारखानदारी सुरू होऊ शकली नाही. शेतकऱ्यांना मूल्यवृद्धीचा व किसानपुत्रांना रोजगाराचा लाभ मिळू शकला नाही. व्यवसाय स्वातंत्र्यावर उघड हल्ला चढवणारा हा कायदादेखील परिशिष्ट-९ मुळेच सरकारला बिनधास्तपणे वापरता आला.

**सीलिंग, आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण हे कायदे म्हणजे विषारी साप**

घटनाकारांनी मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून दिला होता. सरकारला त्याची अडचण वाटत होती. सरकारला जमीन अधिग्रहण करण्याचा निर्विघ्न अधिकार हवा होता. सीलिंग, आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण हे तीन कायदे विषारी साप आहेत. या सापांची अनेक पिले आहेत. परिशिष्ट-९ हे या विषारी सापांचे आश्रयस्थान आहे. वारूळ आणि साप, असे त्यांचे नाते आहे. मुळात साप मारायचे आहेत म्हणून वारूळ उद्ध्वस्त करायचे आहे. शेतकरीविरोधी नरभक्षी कायदे हे लक्ष्य आहे.

हे कायदे लागू राहिल्यामुळे शेतकऱ्यांची वाताहत झाली. १८ जून ५१ रोजी झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीमुळे हे कायदे राबविता आले. सुमारे चार लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली म्हणून १८ जून हा दिवस किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने शेतकरी पारतंत्र्य दिवस म्हणून पाळला जातो. पहिल्यांदा २०१८ साली मुंबईला पहिला कार्यक्रम झाला. नंतरच्या वर्षी पुण्यात झाला. २०२० ला लॉकडाऊन असल्यामुळे कार्यक्रम होऊ शकला नाही. २०२१ साली ऑनलाइन कार्यक्रम झाला. २०२२ ला स्वातंत्र्यतावादी शेतकरी नेत्यांच्या उपस्थितीत पुण्यात पदयात्रा व वैयक्तिकरीत्या किसानपुत्र काळ्या फिती लावून हा दिवस स्थानिक पातळीवर यशस्वी करणार आहेत.

**(लेखक किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते असून ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**



# विधवा प्रथा बंदी ठरावाचे वाहते सुखद वारे

**हेरवाड ग्रामपंचायतीचा विधवा प्रथा बंदीचा ठराव इतका सामाजिकदृष्ट्या दूरगामी ठरला, की महाराष्ट्र सरकारच्या ग्रामीण विकास विभागाने राज्यातील २७ हजारांवरील ग्रामपंचायतींनी विधवा प्रथा बंदीचा ठराव संमत करावा, अशी सूचना दिली.**



बी.व्ही. जोंधळे

हिंदू धर्म रूढी-परंपरेने स्त्रियांना जे दुय्यम स्थान देऊन व कायमच त्यांना मानवी अधिकार नाकारून जे नरकतुल्य जीवन त्यांच्या भाळी मारले होते, त्याविरुद्ध समाजसुधारकांनी बंड करून स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचे अधिकार मिळवून देण्यासाठी प्रखर संघर्ष केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीशूद्रांना गुलाम करणाऱ्या मनुस्मृतीचे दहन करतानाच स्त्रियांना बरोबरीच्या नात्याने जगण्याचे स्वातंत्र्य मिळवून देणारे हिंदू कोड बिल तयार केले. रूढी-परंपरावादी सनातन्यांच्या बुरसटलेल्या मानसिक विरोधामुळे हिंदू कोड बिल बाबासाहेबांच्या हयातीत संमत होऊ शकले नाही; पण कालांतराने काळाची गरज म्हणून हिंदू कोड बिलातील तरतुदी सरकारला स्वीकाराव्या लागल्या. महात्मा ज्योतीराव फुल्यांनी तर स्त्रीमुक्तीसाठी जे क्रांतिकार्य केले, त्यामुळे स्त्रिया शिकू लागल्या. मोठ्या पदावर जाऊन विराजमान झाल्या. फुले दाम्पत्याने स्त्रीशूद्रांसाठी शाळा काढल्या. केशवपनाच्या दुष्ट, निर्दयी नि राक्षसी चालीविरुद्ध नाभिकांचा संप घडवून आणून केशवपनाची माणुसकीशून्य प्रथा बंद पाडली. कुमारिका-विधवा महिलांचे शारीरिक शोषण झालेल्या गर्भवती महिलांना आधार देण्यासाठी आश्रम उभारून त्यांना आधार दिला.

**अमानुष रूढी-परंपरा अजूनही जिवंत**

डॉ. रखमाबाई राऊत, पंडिता रमाबाईंनी बालविवाहाविरुद्ध आवाज उठविला. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेविरुद्ध आवाज उठवून सतीप्रथा बंद पाडली. सतीप्रथा बंद पडल्यावर जिवंत मरण टाळणाऱ्या विधवांचा प्रश्न जेव्हा निर्माण झाला, तेव्हा-तेव्हा बंगालमध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा विवाह घडून यावेत, यासाठी प्रयत्न केले. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीच १८५५ मध्ये विधवा विवाहांना मान्यता देण्यासाठी ब्रिटिश सरकारसमोर दाखल केलेल्या याचिकेवर एक जनमत चाचणी घेण्यात आली होती. या त्यांच्या याचिकेच्या बाजूने अवघे एक मत पडले होते,

तर विरोधात बारा मतांची नोंद झाली होती. यासंदर्भात याचिकेचे विधेयकात रूपांतर करणारे जे.पी. ग्रांट म्हणाले होते, विधवा विवाह हवेत म्हणणाऱ्या सुधारणेच्या बाजूने पाच हजार मते पडलीत, हेच खरे जनमत आहे. कारण प्रत्येकाला सुख, समाधान नि स्थैर्य हवे आहे. तात्पर्य, स्त्रियांना गुलाम करून त्यांना पशुतुल्य वागणूक देणाऱ्या अनेक अडथळ्यांच्या शर्यती पार करत स्त्रिमुक्तीच्या–महिला सन्मानाच्या चळवळी वाटचाल करीत आल्या; पण असे असूनही स्त्रियांना गुलाम करणाऱ्या काही अमानुष रूढी–परंपरा अजूनही जिवंत आहेत. त्यातीलच एक म्हणजे विधवा प्रथा होय.

**विधवा प्रथांना मूठमाती देण्याचा ठराव संमत**

एखाद्या स्त्रीचा पती नैसर्गिकरीत्या, एखाद्या साथरोगात वा अपघातात मृत्यू पावला असेल, तर त्यात त्या बिचाऱ्या महिलेचा काहीही दोष नसतो; पण पती मृत्यूनंतर तिला जी विधवा म्हणून भावनाशून्य वागणूक मिळते, ती माणूस म्हणून स्त्रीचे हृदय छिन्न–विछिन्न करणारी असते. पती निधनानंतर तिच्या गळ्यातील काळी पोत तोडून टाकणे, तिच्या हातातील बांगड्या फोडून टाकणे, तिच्या कपाळाचे कुंकू पुसून टाकणे, पायातील जोडवे काढून घेणे व तिला विद्रूप रूप देणे यांसारखी माणुसकीशून्यता दुसरी कुठलीही असू शकत नाही. इतकेच नव्हे, तर तिला सार्वजनिक कार्यक्रमात न बोलावणे, तिची हेटाळणी करणे यात आपण स्त्रीमनाचा अपमान नि उपमर्द करून तिच्या मनावर निर्दय जखमा करीत आहोत, याचेही संवेदनाशून्य समाजाला भान नसते यास काय म्हणावे? माणुसकी की माणुसकीशून्यता? खरे तर, स्त्री ही लग्नापूर्वीसुद्धा कपाळावर कुंकू लावीतच असते. गळ्यात माळ घालतच असते. वेणी–फणी करीतच असते. साजशृंगार करीतच असते. मग असे काय घडते, की लग्नापूर्वी स्त्रियांच्या सौंदर्योपासनेला मान्यता देणारा समाज स्त्रीच्या पती निधनानंतर तिच्या कपाळाचे कुंकू पुसून तिच्या हातातील हिरवा चुडा फोडून, तिच्या गळ्यातील काळी पोत तोडून, तिच्या पायातील जोडवे काढून तिला विद्रूप करतो? रूढी–परंपरा म्हणून की पती निधनानंतर तिचा अन्य पुरुषाशी संबंध येऊ नये म्हणून? कसेही असले तरी हे निसर्गाला व माणुसकीला धरून नाही, हेच खरे नाही काय? पण काही का असेना फुले–शाहू–आंबेडकरांच्या सुधारणावादाचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात विधवा प्रथेला मूठमाती देण्याचे वारे वाहत आहे, ही एक सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाबच म्हणावी लागेल. विधवा प्रथेला मूठमाती देण्याची सुरुवात आधी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्याच्या हेरवाड आणि नंतर जिथे राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी ऐतिहासिक अस्पृश्यता परिषद घेतली त्या हातकणंगले तालुक्यातील माणगाव ग्रामपंचायतीने विधवा प्रथांना मूठमाती देण्याचा ठराव संमत केला. पाठोपाठ नागपूरजवळच्या बनवाडी गावात तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष अंत्यविधीच्या वेळी एका स्त्रीच्या पती निधनानंतर तिच्या कपाळचे कुंकू पुसणे, हातातल्या बांगड्या फोडणे हा अमानुष प्रकार थांबविला.

**विधवा प्रथा बंदीची देशपातळीवर दखल**

विधवा प्रथेला मूठमाती देण्याचा जो क्रांतिकारी ठराव हेरवाड ग्रामपंचायतीने संमत केला त्याचे खरे श्रेय करमाळा (जि. सोलापूर) येथील महात्मा फुले सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रमोद झिंजाडे यांना आहे. त्यांनी हेरवाडचे सरपंच सुरगोंडा पाटील यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना विधवा प्रथा नष्ट करण्याचे महत्त्व समजाऊन सांगितले. या विषयावर ग्रामस्थांशी खूप चर्चा झाली. हेरवाडच्या ग्रामपंचायत सदस्यांना विधवा प्रथा नष्ट करण्याचे महत्त्व पटले व अखेर ४ मे २००२ रोजी गावसभेत विधवा प्रथा बंदीचा विषय चर्चेसाठी ठेवण्यात आला. ग्रामपंचायत सदस्या मुक्ता संजय पुजारी यांनी विधवा प्रथा बंदीचा ठराव मांडला. या ठरावास सुजाता केशव गुरव यांनी अनुमोदन दिल्यावर विधवा प्रथा बंदीचा ठराव संमत झाला. ठराव संमत होत असताना आपण फार मोठे सुधारणावादी पाऊल उचलीत आहोत, याची साधी कल्पनाही हेरवाडच्या ग्रामपंचायत सदस्यांना नव्हती; पण हेरवाडच्या ग्रामपंचायतीच्या विधवा प्रथा बंद ठरावाची दखल जेव्हा देशपातळीवर घेण्यात आली, तेव्हा आपण किती मोठे परिवर्तनवादी पाऊल उचचले आहे, याची जाणीव होऊन हेरवाड ग्रामपंचायतीच्या सरपंच सदस्यांना आनंद वाटला नसेल तर नवलच!

हेरवाड ग्रामपंचायतीचा विधवा प्रथा बंदीचा ठराव इतका सामाजिकदृष्ट्या दूरगामी ठरला, की महाराष्ट्र सरकारच्या ग्रामीण विकास विभागाने राज्यातील २७ हजारांवरील ग्रामपंचायतींनी विधवा प्रथा बंदीचा ठराव संमत करावा, अशी सूचना दिली. यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी निर्णायक भूमिका वठविली, हे विशेष. त्यांनी राज्याचे ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी हेरवाडच्या धर्तीवर ठराव घ्यावा, अशी सूचना केली व मंत्रालयाने ती मान्य केली.

**विधवा प्रथा बंदीकडे परिवर्तनवादी, सामाजिक चळवळीचे**

हेरवाड ग्रामपंचायतीने विधवा प्रथा बंदीच्या विरोधात ठराव करून एक परिवर्तनवादी वाट तयार केली आहे. सरकारही सक्रिय झाले आहे. उद्या गावोगाव विधवा प्रथा बंदीचे ठरावही होतील. चांगली गोष्ट आहे; पण एवढ्याने भागणार नाही, तर विधवा प्रथा समाजातून समूळ नष्ट करण्यासाठी भरीव प्रयत्न करावे लागतील. महाराष्ट्रास एक सामाजिक परिवर्तनाची उत्तुंग परंपरा लाभली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक परिवर्तनासाठी–स्त्रीमुक्तीसाठी रक्त आटविले आहे. त्याची सुमधुर फळे आज आपण चाखत आहोत. महर्षी केशव धोंडो कर्वे, गोपाळ गणेश आगरकर ते यशवंतराव चव्हाण, शरद पवार व खूपशा स्त्रीनेत्यांनी महिला सबलीकरणासाठी भरीव योगदान दिले आहे. विधवांच्या सबलीकरणावरही भर दिला आहे. आंतरजातीय विवाह, पुनर्विवाह, विधवा विवाहांचाही आपल्या समाजाने संथगतीने का असेना; पण अंगीकार केला आहे. मात्र सामाजिक परिवर्तनाच्या या प्रक्रियेत विधवा प्रथा बंदीकडे महाराष्ट्रातील परिवर्तनवादी, सामाजिक चळवळीचे दुर्लक्षच झाले आहे. हेरवाडच्या ग्रामपंचायतीने विधवा प्रथा बंदीचा ठराव करून एक क्रांतिकारी पायवाट तयार केली आहे. या पायवाटेवरून चालून विधवा प्रथा बंदीचा परिवर्तनवादी व स्त्रीसन्मानाचा एक मूलगामी सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी सर्वांनीच सक्रिय झाले पाहिजे, यासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्यांबरोबरच सरकारची भूमिका निर्णायक ठरेल. ●●●

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# अभूतपूर्व उष्मालाटेचा महाइशारा....

**हवामान अरिष्टाच्या बहुआयामी धोक्यातून कायमस्वरूपी सुटकेसाठी गांधीप्रणीत स्वदेशी, स्वावलंबनाचा विकेंद्रित स्थानिक संसाधने व श्रमशक्ती आधारित मार्ग अवलंब करणे हाच समतामूलक शाश्वत विकासाचा ठोस पर्याय आहे, भारताला व जगाला हवामान अरिष्ट व अस्तित्व संकटापासून वाचविण्याचा.**



**प्रा. एच.एम. देसरडा**

औद्योगिक क्रांतीनंतर सुरू झालेल्या जीवाश्म इंधन आधारित ऊर्जा, वाहतूक, उत्पादन, उपभोगादी विकासप्रणाली व जीवनशैलीमुळे कार्बन उत्सर्जन जलद वेगाने होऊ लागले. भोगवादी वाढवृद्धीसाठी नवनवीन वस्तू व सेवांच्या अफाट उत्पादनामुळे सीमित संसाधनांचे अचाट दाहन होऊ लागले. सोबतच प्रचंड धूळ, धूर, निर्माल्य, विषारी वायू वातावरणात सर्रास सोडले व ते पसरून हवा, पाणी, अन्नश्रृंखला प्रदूषित व विषाक्त होते. परिणामी मानवी आरोग्य, जीवसृष्टीचे स्थैर्य व संतुलन बाधित होत असून, नाना प्रकारचे संसर्गजन्य रोग व कोरोनासारख्या महामारीचे संकट ओढवले. थोडक्यात, ज्याला हरितगृह वायू (ग्रीन हाउस गॅसेस) म्हणतात त्याचे संकट अवघ्या जगाला भेडसावत असून, परिणामी होत असलेल्या जागतिक तापमान वाढीमुळे (ग्लोबल वॉर्मिंग) मानवासह समस्त जीवसृष्टी व पृथ्वीच्या सुरक्षेला महाधोका निर्माण झाला. खरं तर अस्तित्व संकटच आ वासून आहे...

**मानवाचा निसर्गावर अवास्तव हस्तक्षेप**

निसर्गव्यवस्थेतील परस्परावलंबी, कोट्यवधी वर्षात उत्क्रांत झालेल्या विलक्षण चपखल, स्वयंचलित रचनेत मानवाने निसर्गावर हुकमत गाजविण्याच्या अट्टहासापायी जो अनाठायी, अविवेकी व अवास्तव हस्तक्षेप केला, त्यामुळे आजचे हवामान अरिष्ट ओढवले आहे. निसर्ग आपल्या पद्धतीने याबाबत संकेत, इशारे देत असतो, प्रसंगी तो उत्पात स्वरूपात प्रगट होतो. तथापि, सत्ताधीशांनी तंत्रज्ञानाचा कैफ चढवून, विकासाचा (?) दर्प मिरवून याकडे साफ दुर्लक्ष केले. बुद्धापासून रस्कीन, थोरो, टालस्टॉय ते गांधींसारखे तत्त्वचिंतक, तसेच वैज्ञानिक, साहित्यिक, कलावंत या निरर्थक वाढवृद्धीच्या धोक्याबाबत बजावत आले आहेत. मात्र, हावहव्यासापोटी जगभरच्या तमाम अभिजन महाजनांनी याकडे पाठ फिरवली. विकासाच्या गोंडस नावाने पाश्चात्त्य राष्ट्रांनी जगाला दाखवलेल्या औद्योगिक मार्गाने भारतासह बहुसंख्य देश आगेकूच करत आज उष्मालाट, उत्पाद व महामारीने घेरले गेले आहे. सोबतच ज्या जीवाश्म इंधन (कोळसा, तेल, वायू) अतिवापर, अवलंबनामुळे हे संकट ओढवले. त्याच्याच अधिसत्तेसाठी, त्याच साधनस्रोतांच्या माजावर रशियाने युक्रेनचे उद्ध्वस्तीकरण राजरोस चालवले आहे. हे आहे खरे कारण आजच्या भारतासह दक्षिण आशिया व जगातील भयावह उष्मा लाटेचे (हीटव्हेज)!

उपरिनिर्दिष्ट पार्श्वभूमी व परिप्रेक्ष नीट लक्षात घेतल्याखेरीज आजच्या तापमानवाढीचे त्याच्या सत्ताकारण, आर्थिक राजकारणाचे इंगित उलगडणार नाही; इत्यर्थ कळणार नाही. अन्यथा, निसर्गचक्र म्हणत निमूटपणे सर्व काही सहन करत राहावे लागेल! अर्थात याचे, भक्तभोगी आहेत ते गोरगरीब श्रमजीवी. ज्यांना आजही ४० ते ४५



अंश सेल्सिअसमध्ये तडफडत, जिवाची लाही-लाही होत असताना काम करावे लागते. करेकोई, भरे कोई...

**उष्म्यामुळे पिकांवर प्रतिकूल परिणाम!**

एप्रिल २०२२ महिन्यातील उत्तरपाश्चिमात्य व मध्यभारतातील तापमान गत १२२ वर्षांत सर्वाधिक होते. भारतीय हवामान खात्याच्या वृत्तानुसार उत्तर व पश्चिम भारतातील तापमानाचा पारा असाच चढा राहील व अधिक उष्मालाटा येतील. जेव्हा कमाल उष्मा ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असेल आणि सामान्य तापमान सरासरीच्या साडेचार अंश जास्त होते, त्यास उष्मालाट म्हटले जाते. अतिउष्मालाट ती असते जेव्हा ते सरासरीच्या ६ अंशापेक्षा अधिक असेल. अलीकडे हे प्रकर्षाने अनुभवास येत आहे. प्रस्तुत लेखक एप्रिल महिन्यात शीमला येथे भारतीय उच्च अध्ययन संस्थेत होते

(गंमत म्हणजे तेथूनच हवामान खाते पुण्यात स्थलांतरित झाले म्हणून 'शीमला ऑफिस' ओळख पडली) तेथील शेतकरी व शास्त्रज्ञ यंदा मार्च-एप्रिलमध्ये पाऊस (जो हिमाचल राज्यात २०० मि.मी. होतो) तो न झाल्यामुळे हिमाचलपर्वत रांगेच्या टापूत उष्मा खूप वाढला, पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. सबब वेगाने तापती पृथ्वी म्हणजे अवकाळी पर्जन्यघटना, तसेच पर्जन्यात मोठा खंड अगर शुष्क काळात अंतर वाढणे हे आहे.

**...तोवर कोळसा व तेल सर्रास वापरले जाईल**

संयुक्तराष्ट्राने आयोजित ग्लासगो, हवामान परिषदेच्या उंबरठ्यावर व त्यानंतर आयपीसीसीचे जे तीन अत्यंत शास्त्रशुद्ध व तथात्मक अहवाल प्रसिद्ध झाले त्यांनी तापमान वाढ दीड अंश सेल्सिअस (औद्योगिक क्रांतीच्या काळानंतरची वाढ) पर्यंत मर्यादित ठेवले गेले नाही, तर काय उत्पाद घडू शकतात, याचा इशारा नि:संदिग्ध शब्दांत दिला आहे. वास्तविक पाहता २०२१ अखेरपर्यंत ते १.१ अंशानी वाढले. म्हणजे आता फक्त ०.४ टक्के उत्सर्जनाला अवकाशात सामावले जाऊ शकते. मात्र, सध्या उत्सर्जन असेच चालू राहिले, तर येत्या दोन दशकांत तो अवकाश संपूर्ण व्यापला जाईल. मग त्यानंतर जे अनर्थ ओढवतील त्याची कल्पनाच भयावह आहे!

तात्पर्य, जीवाश्म इंधनाच्या बेछूट वापरावर आधारित विकासप्रणाली व जीवनशैलीला सोकावलेल्या पाश्चात्त्य व त्याचे अकारण अंधानुकरण करणाऱ्या भारतासारख्या विकसनशील देशाला या इंधन विळख्यातून सुटका करून घेणे हे आजमितीला जगासमोरील अव्वल आव्हान आहे. त्यासोबतच जगामध्ये अणुबाँबसह अद्ययावत शस्त्रास्त्र उत्पादन थांबवणे ही मानवी हक्क, तसेच वसुंधरेच्या रक्षणासाठी अत्यावश्यक बाब बनली आहे. रशियाने युक्रेनवर केलेले आक्रमण मानवजातीला कलंक आहे. भारताने या प्रश्नावर घेतलेली तटस्थ (!) अथवा 'वार्तालाप' करा हा सल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. महात्मा गांधींच्या देशाने सत्य आणि अहिंसेच्या बाजूने उभे राहून खरोखरीचे विश्वगुरू व्हावयास हवे. अन्यथा, मोदीजींच्या ताज्या युरोप दौऱ्याच्या सर्व बड्या बाता ही शहामृगी वृत्तीच म्हणावी लागेल! यासंदर्भात हेदेखील बारकाईने ध्यानी घेतले पाहिजे, की भारत हा जगात चीन व अमेरिकेनंतर तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक कर्ब उत्सर्जन करणारा देश आहे. मात्र, ग्लासगोयेथील 'पंचामृतात' 'पंतप्रधानांनी जीवाश्म इंधन वापर बंद करण्याचे वर्ष २०७० म्हटले आहे. याचा अर्थ तोवर कोळसा व तेल सर्रास वापरले जाईल, याबाबत अमेरिकेची स्वत: घोषित सीमा २०५०, तर चीनची २०६० आहे! मेरा भारत महान!!

**विकास नावाचा फाफटपसारा कशासाठी, कुणासाठी?**

खरं तर लवकरात लवकर कोळसा व तेल वापर (जे दोन्ही आम्ही आयात करतो) येत्या दहा वर्षांत थांबवणे भारताच्या देशहिताचे होईल. उष्मालाटेचा भारताच्या शेती, आरोग्य व एकंदर पर्यावरणावर होणारा महाभयंकर प्रतिकूल परिणाम लक्षात घेता आपण सत्त्वर पर्यायी, खरोखरीचा आत्मनिर्भर, स्वदेशी व स्वावलंबी मार्ग अखत्यार केला पाहिजे. त्यात या शंभर कोटी (होय, एक अब्ज) श्रमजीवी भारतीयांचे हित आहे. येथे हे स्मरण करावे, ज्या कष्टकऱ्यांना या ४० अंशाच्या रखरखत्या उन्हात काम करावेच लागते, त्यांच्यापैकी बहुसंख्याकांच्या घरात साधा पंखादेखील नाही, की त्यांना प्यायला पुरेसे व शुद्ध पाणीदेखील मिळत नाही. या ढळढळीत वास्तवाला निदान या उष्मालाटेत तरी लक्षात घ्यावे! अखेर शेवटी हा सर्व विकास नावाचा फाफटपसारा आहे तरी कशासाठी, कुणासाठी? पंतप्रधान मोदी यांनी नुकतीच या प्रश्नावर बैठक घेतली, बघूया, काय निर्णय घेते सरकार...

यासंदर्भात एका अत्यंत महत्त्वपूर्ण वस्तुस्थितीचे भान राखले पाहिजे, की भारतात शीत कटिबंधातील देशाएवढी कृत्रिम ऊर्जा लागत नाही. एकतर आपल्याकडे जी उणीपुरी एक अब्ज काम करू शकणारी श्रमशक्ती येतील ३०-४० वर्षे उपलब्ध आहे आणि दुसरे आपली जी जैवविविधता आहे, फार मोठे पशुधन आहे, त्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने सांगड घालून प्रतिकूल हवामान चक्रातून भारताला स्वत:चा बचाव करणे शक्य आहे. अर्थात, याचा योग्य प्रकारे वापर करण्यासाठी विनाशकारी वाढवृद्धीचा औद्योगिक व शहरीकरणाच्या मार्गापासून फारकत घेत पर्यायी, खराखुरा विकेंद्रित, श्रमप्रधान, निसर्गस्नेही विकासच नव्हे तर पर्यायी समाजरचना आणि परिस्थितीकी संस्कृती (इकॉलॉजिकल सिव्हिलायझेशन) उभी करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. आता केवळ सरकारे बदलणे पुरेसे नाही, व्यवस्था परिवर्तन हीच मुख्य दिशादृष्टी हवी.

भारताने जलद गतीने आधुनिक औद्यागिक राष्ट्र उभारणीसाठी नेहरूंच्या नेतृत्वाखाली जे पश्चिमेचे विकासप्रारूप अवलंब केले ते जीवाश्मइंधन ऊर्जासघन (फॉसील फ्यूअल) असून त्याने आर्थिक परावलंबन तर वाढवलेच. मात्र, सोबतच ते कार्बनसघन, विनाशकारी असून त्याने हे तापमानवाढ संकट ओढवले आहे. २०२१-२२ आर्थिक वर्षात पेट्रोलियम पदार्थाच्या आयातीवर भारताला १७२ अब्ज डॉलर (जवळपास १३ लाख कोटी रुपये) मोजावे लागले. कोळसा आयातदेखील मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. जी आर्थिक अडचण व धोका आहे, ती संधीदेखील आहे.

**अस्सल भारतीय जीवनपद्धती अवलंब करावी**

तापमान वाढ, हवामान अरिष्ट, उष्मालाटादी समस्यांचा सम्यकपणे विचार करून भारताने प्रचलित वाढवृद्धी प्रारूपाला सत्त्व सोडचिठ्ठी देणे अत्यावश्यक आहे. मात्र, पंतप्रधान मोदी आत्मनिर्भरतेचा जयघोष, तसेच नवीनीकृत (सौर व अन्य स्रोताधारित) ऊर्जेचा डंका पिटत असले तरी विद्युत मोटारी, इथेनॉल इत्यादी पर्यायदेखील वाटतात तेवढे सोपे, सुरक्षित व शीघ्रतेने अमलात येणारे नक्कीच नाहीत. खराखुरा अंतिम पर्याय आपल्या गरजा सीमित करणे, जीवनाची गुणवत्ता व नीतिमत्ता उंचावून सर्वांना पुरेसे मात्र चैनचंगळ अजिबात नको, अशी अस्सल भारतीय जीवनपद्धती अवलंब करावी.

सारांश, हवामान अरिष्टाच्या बहुआयामी धोक्यातून कायमस्वरूपी सुटकेसाठी गांधीप्रणीत स्वदेशी, स्वावलंबनाचा विकेंद्रित स्थानिक संसाधने व श्रमशक्ती आधारित मार्ग अवलंब करणे हाच समतामूलक शाश्वत विकासाचा ठोस पर्याय आहे, भारताला व जगाला हवामान अरिष्ट व अस्तित्व संकटापासून वाचविण्याचा..... ●●●

**(लेखक महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य व महात्मा गांधी मिशन विद्यापीठात सुप्रतिष्ठ प्राध्यापक आहेत.)**

# चला तर संभाजीराजे आता स्वराज्याची बांधणी करणार

पा अखेर कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराज यांचे वारसदार संभाजीराजे यांनी राज्यसभा निवडणुकीतून माघार घेतली आणि महाराष्ट्रात स्वराज्य बांधणीसाठीचे रणशिंगही फुंकले. ज्या शिवसेनेच्या मदतीने ते निवडणूक लढवणार होते तिने राजेंना शिवसेनेत येण्याची अट घातली होती. राजेंनी ती बाणेदारपणाने अमान्य केली. राजकीय पक्षांचा अनुभव त्यांना चांगला नसावा. यापूर्वी ते राष्ट्रवादीत होते. निवडणूक लढवून ते पराभूत झाले होते. त्यापूर्वी त्यांचे वडील अल्पकाळासाठी शिवसेनेत गेले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हयातीतील ही गोष्ट. त्यानंतर भाजपने पुरस्कृत उमेदवार म्हणून राजेंना राज्यसभेत पाठवले. यावेळी त्यांना अपक्ष म्हणून लढायचे होते; पण तुम्ही कसेही लढला तरी मते लागतात. जी राजकीय पक्षांकडे असतात. पक्षांनी ठरविल्याशिवाय अशा निवडणुका लढता येत नाहीत. जिंकताही येत नाहीत. आम्ही एकदा छत्रपतींच्या वारसदारांना राज्यसभेत पाठवले. आता शिवसेनेने आणि महाविकास आघाडीने ती जबाबदारी घ्यावी, असे भाजपने जाहीर केले. आघाडीतील महत्त्वाच्या घटकांनी आपला चेंडू शिवसेनेच्या दरबारात टोलवला. राजे आमच्या पक्षात येत असतील आणि शिवबंधन बांधत असतील, तर आम्ही त्यांना निवडून आणू, असे शिवसेनेने म्हटले. एक राजकीय पक्ष म्हणून शिवसेनेने जशी भूमिका घ्यायला हवी होती, तशी ती घेतलीही असेल. या सर्व टोलवाटोलवीत अपक्ष उमेदवार म्हणून बिनविरोध विजयी होण्याचे राजेंचे स्वप्न लटकतच राहिले. सकल मराठा समाजाने त्यांच्यासाठी रान उठवले होते. जर असे घडले नाही, तर हा समाज माफ करणार नाही, अशा टोकाच्या भावनाही व्यक्त झाल्या. हे सर्व चालू होते ते लोकशाहीत; पण लोकशाही समजून घ्यायला भावनेने भरलेले समाजमन तयार नव्हते. आपल्याकडे बऱ्याच वेळेला असेही घडते, की आपल्याला लोकशाहीही हवी असते आणि राजेरजवडेही हवे असतात. या दोन्हींचा मेळ कसा घालायचा. कारण या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी आहेत. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपल्याकडे तीन-चारशे संस्थाने होती. ती खालसा झाल्यानंतर अनेक राजवाड्यांचे वारसदार निवडून येत आहेत. काही मुख्यमंत्री तर काही पंतप्रधान झाले. लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेतून ते निवडून येतात. काही जण पराभूतही झाले आहेत. अनेक जण सध्या संसदेत आणि विधानसभेत आहेत. महाराष्ट्रापुरते बोलायचे, तर सातारा, कागल, अशा अनेक घराण्यांतून तिथल्या-तिथल्या वारसदारांनी प्रतिनिधित्व केले आहे. कागल संस्थानातील विक्रमसिंह घाटगे हरले होते आणि अगदी अलीकडे साताराचे उदयनराजेही हरले आहेत. ज्यांना मावळे



म्हटले जाते त्यांच्याकडून हा पराभव झाला होता. लोकशाहीत हे सारे चालतच असते. बडोदा, जयपूर, म्हैसूर, इंदौर आदी महाराष्ट्राबाहेरील अनेक घराण्यांची नावे घेता येतील. आपल्याकडे ७५ वर्षे लोकशाही असली तरी तिच्यावरील राजेशाहीची सावली अद्याप कमी झालेली नाही. लोकप्रबोधन जसे होईल तशी ही सावली कमी होणार की नाही, हे ठरणार आहे.

संभाजीराजे आता स्वराज्याची बांधणी करणार आहेत. त्यातून नेमके कोणते स्वराज्य आणि अजून काय बाहेर पडणार हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. कदाचित मराठा आरक्षणाचा विषय धसास लावण्याच्या प्रयत्नात ते नेते होतील. कदाचित विधानसभेच्या सर्व जागा लढवतील किंवा राजकीय दबावगट म्हणूनही स्वतःला पुढे आणतील. राजकारणात कोणत्याही गोष्टीचे नेमके भाकीत करता येत नाही. राजर्षी शाहू महाराज यांना लोकशाहीचा प्रचंड कळवळा होता. त्यांच्या हयातीत जेथे जेथे निवडणुका होत तेथे-तेथे ते रयतेला प्रोत्साहन देऊन निवडणुका लढवण्यास सांगत. कामगार व सर्वच जनतेने लवकर शहाणे होऊन स्वतःच्या हातात सत्ता घ्यावी आणि मला वानप्रस्थाश्रमात पाठवावे, असेही ते सांगत. लोकशाही आणि जनतेच्या हातात सत्ता देण्याविषयी अशी क्रांतिकारी भूमिका तत्कालीन कोणी संस्थानिकाने घेतली होती काय, हे सांगता येणार नाही. संभाजीराजे यांच्या खांद्यावर या एका क्रांतिकारी परंपरेचा झेंडा आहे. तो ते कसा वापरतात, कधी वापरतात आणि त्यांचे चाहते काय

भूमिका घेतात, हे २०२४ सालापर्यंत ठरणार आहे. कारण त्यानंतर निवडणुका येणार आहेत.

## चला तर आता महिलांना देहविक्रय करण्याचा अधिकार...

सज्ञान असलेल्या आणि स्वसंमतीने देहविक्रय करू पाहणाऱ्या महिलांना असे करण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होणार आहे. देशातील वरच्या न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. नव्या भांडवलशाही व्यवस्थेत असे घडणारच होते. जगात अनेक ठिकाणी वेश्या व्यवसायाला म्हणजेच महिलांनी आपला अख्खा देह विकण्याला मान्यता आहे. चारित्र्याच्या, शीलाच्या पलीकडे जाऊन त्या-त्या सरकारने हा निर्णय घेतला आहे. काही छोट्या देशांची अर्थव्यवस्थाच स्कीनमधून म्हणजे चामडी विकण्याच्या व्यवसायातून तयार होते. रशियामध्ये साम्यवादी शासनव्यवस्था कोसळल्यानंतर तेथील हजारो मुली वेश्या व्यवसायासाठी देशाबाहेर पडल्या. थायलँड, नेपाळ आदी देश जे या व्यवसायात कुख्यात होते त्यांना या तरूणींनी हरवले. युरोपमध्ये अनेक ठिकाणी वेश्या व्यवसायाला स्वातंत्र्य असल्याने तेथे 'लाइव्ह सेक्श शो' चालतात. भारतात वेश्या व्यवसाय काही कमी नाही. भूक, परंपरा, देव यांच्या नावाने येथे हजारो वेश्या तयार होतात. जगातले एक मोठे मार्केट म्हणून मुंबईची याबाबत ओळख आहे. हे जरी खरे असले तरी या व्यवसायाला कायद्याचे बंधन होते. वेश्या व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही महिलांना पोलीस कधीही उचलून पोलीस ठाण्यात किंवा सुधारगृहात डांबून ठेवू शकत होते. पोलीस, गुंड, दहशत यांची टांगती तलवार घेऊनच अनेक महिला वेश्या व्यवसाय करत होत्या. सर्वोच्च न्यायालयाने या तलवारीला हात घातला आणि ती फेकून दिली. राज्यघटनेतील सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकाराचा आधार घेत न्यायालयाने हा निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे; पण हेही खरे आहे, की अशा निकालावर मोकळेपणाने चर्चा करता येत नाही. याविषयी न्यायालयाला धन्यवाद द्यावे लागतील.

देहविक्रयाला वैध ठरवताना चार गोष्टीही सांगितल्या आहेत. १) देहविक्रय करणाऱ्या महिलांना अटक करता येणार नाही. त्यांचा छळ करता येणार नाही. स्वसंमतीने शरीरसंबंध ठेवण्याचा अधिकार महिलांना आहे. २) देहविक्रय करणाऱ्या महिलांच्या मुलांना आईपासून वेगळे करू नये. ३) देहविक्रयाच्या गुन्ह्यात कंडोमसारखी साधने पुरावा म्हणून ग्राह्य धरू नयेत. ४) देहविक्रय करणाऱ्या महिलांची ओळख उघड होणार नाही, अशा प्रकारे वार्तांकन प्रसारमाध्यमांनी करावे. अन्यही काही गोष्टी आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत वेश्यांच्या आणि अन्य महिलांच्या संघटना चालवणाऱ्यांनी केले आहे. त्याचे स्वागत करावे.

आता या निकालानंतरही काही प्रश्न तयार होतील. देहविक्रय करून जगण्याला सन्मानाचे जगणे म्हणता येईल काय? हे खरे असेल, तर अख्खा देह विकून सन्मान मिळवता येतो, असे म्हणायचे काय? मुळात देह विकून जगण्याची वेळ का येते आणि तसे घडू नये यासाठी व्यवस्था काही करू शकणार नाही काय? देह म्हणजे व्यक्तीची खासगी मालमत्ता आहे, असे म्हणता येईल काय? चारित्र्य, शील, मूल्य या गोष्टी थोडा वेळ बाजूला ठेवल्या तरी देह विकणारा माणूस आणि तो विकत घेणारा माणूस, असे चित्र तयार होणार नाही काय? देह माझा आहे, मी त्याचे काहीही करेन, असा आग्रह धरणारा समाज सुरूप असू शकतो काय? केवळ स्वसंमती हा निकष लावला, तर त्याचा अन्य काही गोष्टींसाठी दुरुपयोग होणार नाही काय? वेश्या व्यवसायाला कायदेशीर मान्यता देण्याऐवजी असे जगच तयार होणार नाही, याची काळजी घेता येणार नाही काय? अनेक प्रश्न निर्माण होतात आणि त्यावर मोकळेपणाने चर्चा व्हायला हवी. देहविक्रय करण्यात कोणती प्रतिष्ठा दडून बसलीय, यावरही चर्चा करावी लागेल. नव्या भांडवलशाहीत महिलेचेच नव्हे, तर एकूणच माणसाचेही वस्तूकरण



होत आहे. माणूस एक वस्तू आहे आणि या वस्तूचे बाजारात काहीही करावे, अशी भूमिका सुंदर अशा मनुष्यप्राण्याविषयी घेता येईल काय? वेश्या व्यवसाय असावा की नसावा, याविषयी खूप जुना वाद आहे. समाजात नैतिकता टिकून राहावी यासाठी वेश्या व्यवसाय आवश्यक आहे, असे म्हणणारे आहेत आणि नैतिकतेसाठी काही बायांनाच बळी द्यायचे का, असा प्रश्न विचारणारेही आहेत. येत्या काळात ही चर्चा वाढत जाईल किंवा मागास चर्चा म्हणून ती दूर फेकलीही जाईल. ज्या समाजात मोठ्या प्रमाणात देहविक्रय करणाऱ्या महिला तयार होतात त्या समाजाला कसला समाज म्हणायचे, हा तर कळीचा प्रश्न उरतोच. वेश्या व्यवसायात अडकलेल्या महिलांनी बाहेर पडावे आणि कष्ट करून चांगले जीवन जगावे, असे राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत होते. अनेक महिला परिषदा आणि कामाटपुऱ्यातील महिलांसमोरही त्यांनी आपले विचार

मांडले होते; पण आता ‘स्वेच्छा’ धाक प्रभावी झाल्याचे दिसतो. या स्वेच्छेतून काय काय घडेल, ते सांगता येत नाही. रूपकुंवर स्वेच्छेनेच सती गेली, असे सांगणारा एक घटक आपल्याकडे आजही आहेच.

## नव्या धार्मिक वादाचा केंद्रबिंदू बनणार ज्ञानवापी मशीद

मशिदीला जोडून आलेल्या ज्ञानवापी या शब्दाचा अर्थ ज्ञानाचा साठा, ज्ञानाचा तलाव किंवा सागर असा होतो. बाबरी मशिदीनंतर वादात अडकलेल्या या मशिदीमध्ये गोड पाण्याने भरलेली एक विहीर आहे आणि तिचे पाणी पवित्र मानले जाते. अर्थात, आपल्याकडे बहुतेक जलाशयाचे साठे, नद्या यातील पाणी पवित्रच मानले जाते म्हणून तर काही नद्यांच्या काठावर कुंभमेळे भरतात आणि पवित्र पाण्यात डुबकी मारून पापमुक्त होण्याचा प्रयत्न होत असतो, तर ही ज्ञानवापी मशीद म्हणजे हिंदूंचे प्राचीन मंदिर आहे आणि ते त्यांच्या ताब्यात द्यावे यासाठी अनेक वर्षे सुरू असलेला वाद आता ऐरणीवर आला आहे. कुतुबमीनारसह अनेक वास्तू ज्यात ताजमहालाचाही समावेश आहे, त्या वादात म्हणजे धार्मिक वादात अडकल्या आहेत किंवा अडकवल्या जात आहेत. हिंदू राष्ट्रच येणार असल्याने या वादाला आणि त्यावरील तोडग्याला आणि त्यासाठीच्या संघर्षाला महत्त्व प्राप्त होते. हे महत्त्व स्वाभाविकच राजकारणाला आणि हिंदुत्वाला मोठी रसद पुरवत असते. आताही तसेच होत आहे आणि ठिकठिकाणी त्याचे पडसाद उमटणार आहेत.

जम्मू-काश्मीरचे विभाजन, तीन वेळा तलाक म्हणण्याचा कायदा, नागरिकत्व, गोमाहात्म्य, बुरखा, भोंगा अशी अनेक रूपे धारण करत आता ज्ञानवापीपर्यंत ते पोहोचले आहे. देशात अनेक ठिकाणी मुस्लिमांच्या काळात तयार झालेल्या वास्तू आहेत; पण त्या हिंदूंच्या वास्तू पाडून तयार केल्या गेल्या, असा दावा असल्याने कोर्टात त्यांच्यावर सुनावणी सुरू आहे. खरे तर, भारताच्या धार्मिक इतिहासात एक धर्म विरुद्ध दुसरा धर्म, असे अनेक संघर्ष झाले आहेत. हिंदू विरुद्ध जैन, जैन विरुद्ध बुद्धिस्ट, हे दोन्ही धर्म विरुद्ध बुद्धिस्ट, हिंदू विरुद्ध मुस्लीम, हिंदू विरुद्ध ख्रिस्ती, असे ते संघर्ष आहेत. प्रत्येक संघर्षात कुणी तरी काही तरी गमावते आणि कुणी तरी काही तरी कमावते. बौद्ध संस्कृतीवर केवळ मुस्लिमांनीच हल्ला केला असे नाही, तर भारतातील अनेक धर्मांनी हल्ले केले आहेत. मुस्लिमांनी या सर्व धर्मांवर हल्ले केले आहेत. महम्मद घोरीपासून ते सुरू होतात आणि औरंगजेबापर्यंत येऊन थांबतात. अशी अनेक धर्मस्थळे आहेत, की त्यांच्यावर वारंवार हल्ले झाले आहेत. ज्ञानवापी मशीद त्यापैकी एक.

ज्ञानवापीबाबतचा वाद तसा नवा नाही. तो चारशे वर्षांपासून सुरू होतो. कोर्टाद्वारे अनेक आदेश निघाले. अनेक अहवाल तयार झाले. हिंदूंच्या मते, मंदिर तोडून तेथे मशीद बांधण्यात आली आहे. मंदिराचे अनेक अवशेष तेथे आहेत. स्वतः शंकरानेच लिंगपूजा करण्यासाठी तेथे पवित्र पाण्याची विहीर निर्माण केली होती. मशिदीच्या तळघरातही हिंदू धर्माच्या देवाचे अवशेष आहेत.

हिंदूंची मागणी आहे, की मंदिर पाडून मशीद बनवली आहे. आमचे मंदिर आम्हाला द्या. मुस्लिमांनी आपल्या बाजूनेही काही



पुरावे दिले आहेत. मशिदीत ज्या गोष्टीला हिंदू लिंग समजतात ते मुस्लीम परंपरेतील दुसरेच काही सांगतात आणि चार-पाचशे वर्षांहून अधिक काळ आमचे येथे धार्मिक कार्यक्रम होतात आणि १९३७ मध्ये इंग्रज सरकारच्या कोर्टानेच आम्हाला नमाज अदा करण्याचा अधिकार दिला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर न्यायालयाने दोन वेळा सर्व्हे करून घेतला. आता मुख्य निकालाकडे नजरा लागल्या आहेत. कोर्टाचा निकाल काहीही लागो; पण हिंदू आता या स्थळावरील हक्क सोडून देण्याची शक्यताच नाही.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे, की प्राचीन काळातील हे सर्व वाद उकरून त्यांना धार्मिक संघर्षाचे साधन बनवायचे काय, भारतात गुलाम घराण्याच्या राजवटीपासून सुरुवात होते. अकरा-बाराव्या शतकापासून या राजवटी येतात. खूप कमी वेळा धार्मिक आणि बहुतेक वेळा राजकीय संघर्ष होतो. या सर्व संघर्षामागे आजच्या पिढीचे काही देणे-घेणे नाही. अनेक वर्षे या दोन्हीही धर्मीयांनी धार्मिक, सामाजिक सलोखा टिकवण्याचे काम केले आहे; पण आता धार्मिकता हेच उभय बाजूंसाठी राजकारणात एक कारण बनले आहे. या संघर्षातून काही पोटसंघर्षही सुरू होणार आहेत. ज्ञानवापी जशी हिंदूंची तसे पंढरपूर बौद्धांचे, इथपर्यंत हे वाद वाढत जाणार आहेत. उद्या जैनधर्मीयही त्यात उडी मारतील. कारण त्यांचीही अनेक धर्मस्थळे पाडली गेली आहेत. या सर्वांमध्ये कलह सुरू झाला, तर तो कोणत्याच धार्मिक व सामाजिक सलोख्याला परवडणारा नाहीय. धार्मिक उन्माद वाढवण्यासाठी भूतकाळाचा आणि त्यातील मुक्या वास्तूंचा वापर होता कामा नये. सामान्य माणसाने याचा विचार अधिक करायला हवा. कारण अशा संघर्षात त्यांचीच होरपळ होत असते.

**– पंक्चरवाला**

# ॥ मस्तक उडवणाऱ्या चाव्या ॥

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे ‘चाव्या’ नावाचे भन्नाट पुस्तक वाचले. तसे ते ४० वर्षांपूर्वी प्रथम प्रकाशित झाले तेव्हाही वाचले होतच; पण तेव्हा मी एक भाबडा वाचक होतो आणि चित्रे यांचा एकमेव कवितासंग्रह तेव्हा प्रकाशित झालेला होता. त्यातल्या कविता मला अजिबात समजल्या नव्हत्या. त्यामुळे तेव्हाचे माझे या पुस्तकाचे वाचन म्हणजे पालथ्या घड्यावर ओतलेले पाणी होते.




इंद्रजित भालेराव

नंतर चित्रे यांच्या समग्र कवितांचे खंड प्रकाशित झाले आणि महत्त्वाचे म्हणजे ‘पुन्हा तुकाराम’ या पुस्तकामुळे आणि त्या पुस्तकाच्या इंग्रजी अवतारामुळे चित्रे आणि ‘तुकाराम’ यांना दिगंत कीर्ती मिळाली. अर्थात, हे पुस्तक प्रकाशित झाल्या-झाल्या मी विकत घेऊन वाचले होते. परभणीत त्याच्या दहा प्रती मागवल्या होत्या. तोपर्यंत त्याचा गाजावाजा झालेला नव्हता. पुढे चित्रे यांची ओळख आणि भेटही झाली. माझ्या ‘आम्ही काबाडाचे धनी’ या दीर्घकवितेला त्यांची मनमुराद दादही मिळाली.

‘चाव्या’ पुस्तक हाती आले ते परवा वाल्मीक वाघमारे या औरंगाबादच्या मित्राच्या दुकानात पुस्तके विकत घेताना. ही नवी आवृत्ती सुमतीबाई लांडे यांच्या शब्दालय प्रकाशनाने प्रकाशित केलेली आहे. पहिली आवृत्ती अशोक शहाणे यांच्या प्रास प्रकाशनाने पुस्तिकेच्या स्वरूपात काढली होती. चित्रे यांची कविता आणि तुकाराम वगळता बहुतेक पुस्तके अत्यंत चांगल्या स्वरूपात सुमतीबाई यांनीच प्रकाशित केलेली आहेत. त्यात ‘ऑर्फीयस’ हा कथासंग्रह आहे. ‘अगतिकांचे जागतिकीकरण’, ‘तुकोबांचे वैकुंठगमन’, ‘तिरकस आणि चौकस’, ‘प्रत्यय आणि व्यत्यय’ ही वैचारिक पुस्तके आहेत. साहित्य आणि अस्तित्वभान या समीक्षाग्रंथाचे दोन खंड आहेत. या सगळ्या कामासाठी मराठी वाचक सुमतीबाईंचे कायम ऋणी राहतील.

### चित्रे टागोरांपेक्षाही चित्रपट कलेत एक पाऊल पुढे

‘चाव्या’ या पुस्तकाचे लेखन केले तेव्हा चित्रे चाळिशीत होते, याचा पुरावा या लेखनातच मिळतो. तोपर्यंत सगळे जग फिरून आपल्या बुद्धिकौशल्याच्या बळावर युरोपियनांसाठी लेखनाच्या कार्यशाळा घेऊन, तिथे जगभरातल्या प्रतिभावंतांसोबत काम




करून ते महाराष्ट्रात परत आलेले होते. मराठी लेखकात समग्र कलांची जाण असलेला आणि जगभरात मान्यता मिळवलेला, सर्व कलाक्षेत्रात निर्मितीचा हस्तक्षेप केलेला दुसरा प्रतिभावंत नाही. भारतीय पातळीवर विचार केला, तर केवळ रवींद्रनाथ टागोर हे एकच नाव पुढे येते. चित्रे टागोरांपेक्षाही चित्रपट कलेत एक पाऊल पुढे होते

**अर्थात, तो त्यांच्या काळाचा महिमा होता.**

मराठी वाङ्मयव्यवहारावर टीका करणाऱ्या भालचंद्र नेमाडे आणि अशोक शहाणे यांच्यापेक्षाही चित्रे जास्त दाहक आहेत; पण त्यांच्या या लेखनाची फारशी चर्चा झालेली नाही. महाराष्ट्राच्या

जीवन, समाज, वाङ्मय, संस्कृती, संगीत, नाट्य, चित्रपट या सर्व कला व्यवहारांवर चित्रे यांनी या पुस्तकात टीका-टिप्पणी करताना भल्याभल्यांना पासले पाडलेले आहे. हे सगळे त्यांना जागतिक संस्कृतीव्यवहार पाहून, अनुभवून, सूक्ष्म चिंतनातून सुचलेले महाराष्ट्राविषयीचं प्रकट चिंतन आहे.

या मजकुराच्या लेखनावेळी चित्रे ज्ञानदेवांच्या कवितेने आणि कर्तृत्वाने भारावलेले दिसतात. पुढे त्यांच्या आयुष्यात ती जागा तुकारामाने घेतल्याचे दिसते. अर्थात, तुकारामावरच्या त्यांच्या कामाला प्रकाशक मिळाला आणि ते नावाजलेदेखील गेले. पण अमृतानुभवाचे त्यांनी केलेले सभाष्य चिंतन, संपादन अजूनही अप्रकाशित आहे. त्याला प्रकाशक मिळाला नाही.

दि.पु. चित्रे यांचे मराठी वाङ्मयाचे आणि जागतिक वाङ्मयाचं वाचन अफाट आहे आणि त्यांचा स्वतःचा एक विशेष दृष्टिकोन आहे. त्यामुळे त्यांची इथली निरीक्षणे वाचताना सतत वाटत राहते, की चित्रे हे अफाट सागरातला नीरक्षीरविवेकी राजहंस आहेत आणि आपण मात्र डबक्यातल्या पानकवड्या आहोत.

**मराठीतले सर्वश्रेष्ठ कवी**

चित्रे यांनी उच्च दर्जाची चित्रे काढलेली आहेत. पंडित आरोलकर यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतलेले आहेत. संगीत गुरूही त्यांनी चिकित्सा करूनच निवडलेला आहे. त्यांचे ते गुरू निवडीचे निकष वाचताना भारतीय संगीतातले तमाम महान गायक तोकडे वाटायला लागतात. भाऊ पाध्ये यांच्या कथेवर आधारित, धनगरांचे आदिम जगणे चित्रित करणारा, चित्रे यांनी काढलेला 'गोदाम' हा चित्रपट जागतिक ख्याती मिळवून गेला. त्याचे दिग्दर्शन आणि संगीत दिग्दर्शनदेखील चित्रे यांनीच केलेले होते. त्यांच्या आध्यात्मिक जाणिवा आणि अनुभूती कोणाही विभूतीपेक्षा कमी नव्हती आणि ते मराठीतले सर्वश्रेष्ठ कवीही होते. प्रयोगशील कथाकार होते आणि विलक्षण दृष्टी असलेले समीक्षक होते. म्हणूनच मी वर म्हटले आहे, की चित्रे यांच्याइतका चतुरस्त्र मराठीत अन्य कोणी नाही.

चित्रे यांचा 'मराठी लेखकांची मुंबई' हा लेख वाचताना कळते, की चित्रे यांनी मुंबईचा आणि मराठी साहित्याचा किती सखोल अभ्यास केलेला आहे. चित्रे यांना जेवढी मुंबई कळलेली आहे तितकी ती अन्य कुणाला कळली असेल, असे वाटत नाही. याच्या कारणांचा शोध घेतला तर याच पुस्तकातल्या 'परस्त्री, परदेश आणि पुनःप्रत्यय' या लेखात त्याचे उत्तर सापडते. त्या लेखात एका ठिकाणी चित्रे म्हणतात, ''मी बाराव्या वर्षी प्रथम बडोद्याहून मुंबईला आलो. त्यानंतर मुंबईतच वाढलो. हे माझं आवडतं शहर. याचा कानाकोपरा मी हिंडलोय. ज्या वस्त्यांमध्ये मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय मुलं कधीच फिरली नसतील अशाही वस्त्यात. शहराची भौगोलिक आणि सामाजिक माहिती मला दारूच्या आणि चरसाच्या अड्ड्यात झाली. तशीच नातेवाईक आणि मित्रांमध्येही कामगार कार्यकर्त्यांबरोबर इकडे तिकडे फिरून आपोआप झाली. त्यातून माझे मित्र समाजातल्या नाना घरांतले. कोणी पारशी, कोणी मुस्लिम, कोणी गोव्याचे किंवा ईस्ट इंडियन. शाळेत माझ्या वर्गातली मुले धारावीची आणि दलित जमातीतली. कॉलेजात इंग्रजी विषयामुळे कोणी तामिळ, कोणी बंगाली, कोणी मल्याळी, कोणी पंजाबी. वाटेल ते खाण्यापिण्याचा नुसता सरावच नव्हे, तर आवडच. शहरातलं हे सांस्कृतिक अक्करमासेपण मला पुढं जगभर उपयोगी पडलं. मुंबईत वाढलो नसतो तर मला न्यूयॉर्क, लंडन, फ्रॅंकफूट, म्युनिक, पॅरिस, बुडापेस्ट, लॉसएंजेलिससारख्या शहरात पाय ठेवताच बिनधास्त सराईतासारखं फिरता येणं अशक्य होतं.''

'शिबा राणीच्या शोधात' हे चित्रे यांचे प्रवास वर्णनही आता कुणीतरी पुन्हा प्रकाशित करायला हवे. पूर्वी ते मॅजेस्टिक प्रकाशनाने प्रकाशित केलेले होते. ते आता लोक विसरत चाललेत. तेही असेच विलक्षण वेगळे प्रवास वर्णन आहे. तेही सुमतीबाईंनी आम्हाला उपलब्ध करून दिले, तर त्यांचे खूप खूप उपकार होतील.

चित्रे यांच्या समग्र कवितांचं एकत्रित संपादन प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केलेलं आहे. त्याची आता नवी आवृत्तीही पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेली आहे. या श्रेयस आवृत्तीलाही खूप प्रतिसाद मिळाला. मृत्यूनंतर चित्रे यांची कविता जास्त वाचली गेली.

पानांच्या आजूबाजूला ऐसपैस जागा सोडून आणि मोठ्या आकारातला विरळ मजकूर छापूनही हे पुस्तक केवळ ११२ पानांचं झालेय. तरी सुमतीबाईंनी ते हार्ड बाउंड केलेय. नॅचरल शेडचा जाड कागद वापरल्यामुळे इतक्या कमी पानालाही हार्ड बाउंड शोभून दिसते. संदीप सोनवणे या नव्या चित्रकाराने केवळ अक्षरलेखनातून अत्यंत सूचक आणि कलात्मक मुखपृष्ठ साकारलेय. ते सोबत दिलेले आहेच. मजकुरातल्या वैचारिक श्रीमंतीला शोभावी अशीच श्रीमंत निर्मिती भौतिक स्वरूपातही सुमतीबाईंनी केलेली आहे.

'चाव्या' हे पुस्तक आपली झापडे उघडून घेण्यासाठी आणि डोळस होण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने वाचायलाच हवे. हे छोटेखानी पुस्तक प्रचंड शक्तिशाली आहे. आपल्या डोक्याला अज्ञान आणि परंपरेने अनेक कुलुपे लावलेली असतात.त्यांना खाडखाड उघडणाऱ्या २१ चाव्यांचा जुडगा म्हणजे हे पुस्तक. अत्यंत छोटेखानी असलेले हे लेख म्हणजे प्रचंड ज्ञानाची अवतरणेच आहेत. यातले प्रत्येक वाक्य उद्धृत करण्यासारखे आहे. •••

**(लेखक सुप्रसिद्ध साहित्यिक आहेत)**

**चाव्या**

**लेखक : दिलीप पुरुषोत्तम चित्रे**

**प्रकाशक : सुमती लांडे,**

**प्रकाशक : शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर**

**संपर्क-९८ २२ ०० ८७ ९६ / ९८ २२ ५२ ५४ ४४**

कविता

# सारा देश हिरवा किंवा भगवा होईपर्यंत...

ते तुला भोंग्यात आणि हनुमान चालीसात
गुंतवतील...
दंगलीतही तुलाच पुढं करतील...
हिरवा किंवा भगवा झेंडा हातात देतील...
तू जिवाच्या आकांतानं घोषणा देत पुढं धावत
राहा
...यावेळी सकाळी बाप उपाशी पोटानं
मजुरीला गेल्याचं तुला आठवणार नाही...
आई औषधाविना अंथरुणावर असलेली
तुला आठवणार नाही...
झेंड्याची धुंदी तुला हातात तलवार, चाकू
किंवा बंदूक घ्यायला भाग पाडेल...
ते तुला खुशाल लढ म्हणतील,
तुला वाघाचा बछडा म्हणतील,
सिंहाचा छावा म्हणतील...
तुझी छाती अभिमानानं टच्चं फुगेल...
अरे झेंड्यासाठी, धर्मासाठी तू मेल्यावर
तुला ते शहीदही म्हणतील...
ते तुझी समाधी बांधण्यासाठी पुन्हा आंदोलन
करतील
आणि पुन्हा तुझ्या भावाच्या हातात हेच झेंडे
देतील...
ते मात्र राहतील नामानिराळे,
वावरतील अंगरक्षकांच्या गराड्यात
तुला वाऱ्यावर सोडून...
तुझी नशा मात्र कायम राहील धर्मासाठी
मरण्याची आणि मारण्याची
झेंड्यासाठी शहीद होण्याची.....
...तू कधी विचार केला नाही आई-बापाचा
भाऊ-बहिणीचा...
त्यांनी मात्र कधीही आपल्या मुलांना
रस्त्यावर उतरवले नाही,
हातात झेंडा दिला नाही,
जीव तोडून घोषणा देताना पाहिले नाही...
ते शिकवतील आपल्या मुलांना परदेशात
आपल्या देशावरील व धर्मावरील प्रेम
अबाधित ठेवून...
मित्रा तुला आता एकच टार्गेट...
भोंगा किंवा चालिसा
मुर्दाबाद- झिंदाबाद...
मित्रा, स्पीकरचा आवाज कानाचे पडदे फाडून
आत गेला पाहिजे कानामध्ये
अन् डोक्यामध्ये धर्माचं तांडव झालं पाहिजे
हृदयातून उकळी घेऊन भगव्या किंवा हिरव्या
रंगाचं रक्त
नसानसांत भिनलं पाहिजे,
सारा देश हिरवा किंवा भगवा होईपर्यंत...
सारा देश हिरवा किंवा भगवा होईपर्यंत...

**– डॉ. बापू चंदनशिवे, अहमदनगर**

# आपापल्या घरची वाट

चंद्र पाहिजे नव्हं तुला?
मग घे की, तोडून
वटाभर चांदण्यापण बांध
पदरात
इकडं तिकडं काय बघतीस
मीच हाय चौकीदार इथं
येताना एखादी पिशवी
आणायचीस की
रिकामी...
थोडे तारे पण वेचली असतीस
जाता जाता

हे बघ ढगाचे पतंग बांधून
ठेवलेत
या पुढीत...
अन् इंद्रधनुष्याच्या सात रंगीत
गुंड्या
तरंग तुला तरंगायचं तेव्हढं
त्यात काय लाजायचं?

अवखळ खोंडासारखा
उधळत आलाय हा वारा
फुलांच्या गावावरनं
लावतीस काय लाव दावं

फुलपाखराच्या पंखावरची नक्षी
अलगद उचल नजरेनंच
कुणी बघायच्या आधी

होडीचे हळवे हेलकावे
लपवून ठेव काळजात
कुणाला कळायच्या आत
आधीच तोंडात काही राहत
नाही तुझ्या
कशाला मोजतेस
लाटांच्या येरझारा
हकनाक किनाऱ्याला बदनाम
करशील

तुला क्षितिजापर्यंत जायचं तर
आधीच सांग
मी आभाळ आणखी थोडं
वर ढकलून देईन

या कातर उलघालीच्या उरुसात
मार पाकीट
एखाद्या कफल्लक फकिराचं
सी.सी. कॅमेऱ्याच्या कक्षेत
असलीस तरी
तू टाकलेल्या नाजूक निःशस्त्र
दरोड्याचं
फुटेज तपासायला
कुणाकडं वेळ आहे?
इथं ज्याच्या त्याच्या मागं
लागलंय
ज्याचं त्याचं व्याप
पंक्चर झालेली रसिकता
रस्त्याकडेला लावून
लोक घाई घाई तुडवत आहेत
आपापल्या घरची वाट

**–आबासाहेब पाटील,
मंगसुळी, जि. बेळगाव**

# तथागता

हे तथागता,
जनावरी वेशांतली हैवानं
उग्रतेच्या तोंडातून
भिरकावताहेत लोकशाहीवर दगडं
ठेचकाळताहेत बोकांडी बसून
अमानुषपणे...
भळभळताहेत निष्पाप देह
पडताहेत ढिगांवर ढीग... रक्तांचे
सारं काही कसं होतंय
लाल लाल लाल
प्रेयसीच्या ओठांपेक्षाही भडक

हे तथागता,
बघतोहेस ना तू
भडके उडताहेत... भडकवले जाताहेत
शहरं पेटताहेत... पेटवले जाताहेत
रस्ते जळताहेत... जाळले जाताहेत
माणसं मरताहेत... मारले जाताहेत
हैवानं... हैवानं... हैवानं... चौफेर
हैवानियत... हैवानियत... हैवानियत... चौफेर
सारं क्रूर... क्रूर... क्रूर
उजाडण्यापूर्वीच रक्ताळून पडलेलं
आतंकींच्या चिमटीत सापडलेलं

हे तथागता,
लाठीचार्ज
जमावबंदी
संचारबंदी
शूट अॅट साइटचे आदेश
लागू होतात इथं कोणत्याही क्षणी
तरी... निघतात
झुंडीच्या झुंडी
संपूर्ण आवेशात
हत्यारबद्ध होऊन
फडशा पाडायला
धुडगूस घालायला
...जातीयतेचा अंश घेऊन

हे तथागता,
या शहरांची
इथल्या माणसांची अवस्था
गटारीत चिरून फेकलेल्या
अर्धमेल्या डुकरांसारखी झालीये
कानाकोपऱ्यांतले बकासुर काफिले
ओरडताहेत जिवाच्या आकांताने
बकासुरासारखे
मात्र कानाडोळा करून
दशावतारी लुटताहेत मजा

हा देश केव्हाही असतो सज्जच
जळायला... जाळणाऱ्यांसाठी

**– बुद्धभूषण साळवे, नाशिक**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments




Sos. Agrotech Pvt.Ltd

